● पुणे, शुक्रवार, २८ फेब्रुवारी २०२५ ● RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 93 ● वर्ष ४ थे, अंक ९३ ● किंमत ₹ ६ ● पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



मुंबईचा तिसरा विजय

१२




P3

# आरोपी शोधण्यात पोलीस निष्प्रभ

## ३६ तास उलटूनही यंत्रणेचा बार फुसका; हाती काहीच नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्वारगेट बस डेपोतील बसमध्ये झालेल्या बलात्काराच्या घटनेला ३६ तास उलटून गेल्यानंतरही आणि आरोपीचे स्पष्ट छायाचित्र, त्याचे असणारे लागेबांधे, त्यांचे नातेवाईक यांची माहिती समोर आल्यानंतर देखील, पोलिसांना या प्रकरणातील नराधम दत्तात्रय गाडे याला पकडण्यात यश आलेले नाही. यंत्रणेने आणि प्रशासनाने तपास कार्यात काय केले याची जाहिरातबजी करण्यात पोलीस अधिकारी गर्क असून, त्याचवेळी आरोपीच्या गावाला पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आले.

आरोपी गाडे याचे बंधू, मैत्रीण अशा अनेकांना ताब्यात घेण्यात आले असून, गाडे याचा शोध ड्रोन वापरून केला जात आहे. तसेच त्याला पकडून देणाऱ्याला एक लाखाचे बक्षीसही सरकारने जाहीर केले आहे. मात्र, इतकी मोठी कारवाई करूनही ३६ तास झाल्यानंतरही प्रत्यक्षात आरोपीपर्यंत पोहोचण्यात पोलीस प्रशासन साफ अपयशी ठरल्याचे स्पष्ट झाले आहे. पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात स्वारगेट प्रकरणानंतर संतापाची लाट उसळली आहे. पुणे शहर आणि जिल्ह्यात मिळून पाच मंत्री आहेत. असे असतानाही पोलिसांचा वचक नाही, हेच या घटनेने अधोरेखित केले आहे. आरोपीच्या छायाचित्रासह इत्यंभूत माहिती असूनही त्याला पकडण्यात आलेले अपयश ही महाराष्ट्र पोलिसांच्या विशेषतः पुणे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे ठरले आहे. आम्ही काय केले, याचेच कागदी घोडे प्रशासन नाचवताना दिसून येत आहेत.

शिरूर तालुक्यातील सराईत गुन्हेगार असलेल्या दत्तात्रय गाडे या नराधमाने स्वारगेट बसस्थानकात गावी जात असलेल्या एका तरुणीवर 'शिवशाही' बसमध्ये बलात्कार करुन तो पसार झाला होता, त्याच्या शोधासाठी पोलीसांनी १३ पथके तयार केली आहेत. तरीही त्याचा अद्याप तपास लागलेला नाही, त्यामुळे त्याला पकडून देणार्‍यास पोलीसांनी एक लाखांचे बक्षिस जाहीर केले आहे. विशेष म्हणजे त्याच्या गुनाट येथील घरासह संपूर्ण गावातच पोलीसांनी बंदोबस्त तैनात केल्याने गावाला पोलीस छावणीचे स्वरुप आले आहे. त्याच्या भावाला पोलीसांनी तपासासाठी बुधवारी रात्री पोलीस ठाण्यात बोलावून घेतले होते, त्याशिवाय त्याच्या मित्रमैत्रीणींचीही चौकशी करण्यात येत आहे. त्यातून फारसे काही निष्पन्न होउ शकले नाही, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली. गाडे हा उसाच्या शेतात लपून बसला असल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती, परंतु या भागात उसाचे मोठे क्षेत्र असल्याने त्याच्या तपासात मोठ्या प्रमाणात अडचणी येत होत्या. त्यामुळे पोलीसांनी त्यासाठी 'ड्रोन' च्या माध्यमातून त्याचा तपास सुरू केला आहे, विशेष म्हणजे अशा गुन्ह्याच्या प्रकरणात पोलीसांनी पहिल्यादांच ड्रोनचा वापर केला असल्याचे सांगितले जात आहे. परिणामी पुणे पोलीसांची निष्क्रियता समोर आली असून त्यासंदर्भात उलटसुलट चर्चा सुरू झाल्या आहेत.



### सुरक्षा व दक्षता अधिकारीच नाही

● महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या स्वारगेट आगारातील महिलेवर झालेल्या बलात्काराच्या घटनेमुळे गेल्या तीन वर्षांपासून मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी (सीएसव्हीओ) नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. डीआयजी दर्जाचे अधिकारी सीव्हीएसओ एम. के. भोसले ३० जून २०२२ रोजी निवृत्त झाल्यानंतर हे पद सहआयुक्त म्हणून पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाकडे वर्ग करण्यात आले.



"तपासाची दिशा योग्य राहावी यासाठी खबरदारी घेण्यात आली, घटनेच्या पाच तास आधीच पोलिसांनी स्वारगेट बसस्थानकात दोन राऊंड मारले होते. त्यामुळे सुरक्षा यंत्रणा निष्क्रिय असल्याचा आरोप चुकीचा आहे."

**— योगेश कदम,** गृहराज्यमंत्री

# वाल्मिक कराडसह ८ आरोपींविरोधात चार्जशीट दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची बुधवारी नियुक्ती झाली. त्यानंतर या प्रकरणातील तपासाची सूत्रे वेगाने फिरताना दिसत आहेत. आता या प्रकरणी महत्वाची माहिती समोर आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडसह इतर ८ आरोपींच्या विरोधात सीआयडी १४०० पानांचे आरोपपत्र दाखल करणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

**देशमुख हत्या प्रकरण**

बीडच्या विशेष मकोका कोर्टात हे आरोपपत्र दाखल करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे आता दाखल करण्यात येणाऱ्या आरोपपत्रातून मोठे गौप्यस्फोट होण्याची शक्यता देखील व्यक्त करण्यात केली जात आहे. ९ डिसेंबर २०२४ रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. आवादा कंपनीकडे मागितलेल्या खंडणीतूनही हत्या झाल्याचे समोर आले होते. या हत्येची सुरुवात ज्या खंडणी प्रकरणातून झाली होती, त्या खंडणी प्रकरणापासून अपहरणाच्या प्रकरणापर्यंत तपास सीआयडीच्या हाती होता. खूनाचा तपास एसआयटीकडे आहे. त्यामुळे सीआयडीकडून दाखल करण्यात येणाऱ्या १४०० पानी आरोपपत्रात काय खुलासे होणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. यात वाल्मीक कराड, विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतीक घुले, जयराम चाटे, कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे, सिद्धार्थ सोनवणे यांच्या विरोधात असलेले पुरावे आणि गुन्ह्यातला सहभाग या संदर्भातले पुरावे आहेत. बीडच्या विशेष मकोका कोर्टात ही चार्जशीट दाखल होणार असून साक्षीदारांचे जबाब ,खंडणी प्रकरणात मुख्य सूत्रधार कोण? आरोपींना फरार होण्यासाठी कोणी मदत केली? आरोपींना आर्थिक मदत कोणी केली या प्रश्नांचा उलगडा होण्याची शक्यता आहे.

# माणिकडोहमध्ये २८ टक्के पाणीसाठा

## पिण्यासाठी देखील पाणी शिल्लक राहील की नाही अशी भीती व्यक्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** कुकडी प्रकल्पाच्या माणिकडोह धरणामध्ये पाण्याचा साठा अवघा २८.१७ टक्के इतका अत्यल्प शिल्लक राहिल्याने उन्हाळ्यामध्ये परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठीतर सोडाच परंतु पिण्यासाठी देखील पाणी शिल्लक राहील की नाही अशी भीती व्यक्त होत आहे. माणिकडोह धरणासाठी परिसरातील शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात जमिनी गेल्या परंतु दरवर्षी या शेतकऱ्यांना शेतीसाठी उन्हाळ्यात पाणी उपलब्ध होत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात कुचंबणा होत आहे. सध्या कुकडी प्रकल्पांमधून पूर्व भागातील तालुक्यांसाठी पाण्याचे आवर्तन सुरू आहे. तसेच माणिकडोह धरणातून येडगाव धरणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे.



माणिकडोह धरणातील पाण्याचा साठा अत्यल्प. (छाया : सुरेश वाणी.)

दरम्यान, माणिकडोह धरणातील पाण्याचा साठा झपाट्याने कमी होत असल्यामुळे परीसरातील शेतकरी चिंता व्यक्त करीत आहेत. यंदाच्या वर्षी माणिकडोह धरण ८० टक्के भरले होते. सध्या माणिकडोह धरणातून पाण्याचे आवर्तन सुरु असून ते तात्काळ बंद करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते काळू शेळकंदे यांनी केली आहे. ते म्हणाले की, पूर्व भागातील खासदार तसेच मंत्री आपल्या भागातील धरणातील पाणी पळवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सध्या फेब्रुवारी महिना सुरू असून, जुलै अखेर धरणातील पाणीसाठा शिल्लक राहण्याची शक्यता फारच कमी आहे. त्यातच धरणामध्ये अधिकचा गाळ असल्याने धरणामध्ये प्रत्यक्षात पाणी २८% पेक्षा खूप कमी आहे. कुकडी प्रकल्पातील पाण्याचे नियोजन खासदार डॉक्टर अमोल कोल्हे व आमदार शरद सोनवणे यांनी योग्य पद्धतीने करावे, अशी मागणी जुन्नर तालुक्यातील शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे. यंदाच्या वर्षी उन्हाळा कडक असल्याने, पाण्याचे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात होणार आहे, तसेच पाण्याची पूर्व भागातील तालुक्यांसाठी पळवापळवी अधिक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याचे नियोजन

» पान ७ वर

## नाशिक भाजपकडेच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** राज्यातील नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा वाद कायम आहे. एकिकडे रायगड जिल्ह्यातील पालकमंत्रिपदावरून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात वाद सुरू आहे. दुसरीकडे नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्रिपद भाजपकडे राहणार की नाही, यावरून तिढा कायम आहे. अशात दिल्लीतून एक महत्त्वाचा संदेश काढण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकचे पालकमंत्रिपद अन्य कोणाकडे दिले जाणार नाही, असा भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वाने स्पष्ट संदेश दिला आहे. त्यामुळे नाशिकचे पालकमंत्रिपद हे भाजपकडेच राहणार असल्याचे बोलले जात आहे.

राज्यातील पालकमंत्र्यांची नियुक्ती करताना नाशिकच्या पालकमंत्रिपदी गिरीश महाजन तर रायगडच्या पालकमंत्रिपदी आदिती तटकरे यांची नियुक्ती करण्यात आली होती.

» पान ७ वर

# ८० दिवसांत मकोका न्यायालयात दोषारोपपत्र दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** मसाजोग (ता. केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाबरोबरच अवादा कंपनीस मागितलेले खंडणी तसेच सुरक्षारक्षक सोनवणे यांना झालेल्या मारहाण प्रकरणातील ॲट्रॉसिटी या तिन्ही प्रकरणांचे चौदाशे पानांचे दोषारोपपत्र मकोका न्यायालयात गुरुवारी (दि. २७) दाखल करण्यात आले.



एसआयटीचे प्रमुख बसवराज तेली, तपास अधिकारी किरण पाटील तसेच खंडणी प्रकरणाचे तपास अधिकारी अनिल गुजर पाटील यांनी आज दुपारी बीडच्या न्यायालयामध्ये दाखल होत संतोष देशमुख खून प्रकरणाचे चार्जशीट दाखल केले. यावेळी सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे उपस्थित होते.

दि. ९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांची डोणगाव टोलनाक्यावरून अपहरण करून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात आतापर्यंत नऊपैकी आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एक आरोपी कृष्णा आंधळे अद्यापही फरार आहे. मागील ८० दिवसांत सीआयडी तसेच एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासानंतर हे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणावरून राजकीय आरोप प्रत्यारोप देखील होत होते. परंतु, दुसरीकडे सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी आपला तपास वेगाने पूर्ण करत दोषारोपपत्र दाखल केले आहे.

आता न्यायालयीन प्रक्रिया सुरू राहणार आहे. दरम्यान ८० दिवसांच्या आत हे प्रकरण न्यायालयात दाखल झाल्याने आता आरोपींना जामीन सुद्धा मिळणे कठीण होणार आहे. याबद्दल भाजपचे आमदार सुरेश धस यांनी गृहमंत्र्यांचे आभार मानले आहेत. या प्रकरणात सरकार पक्षाची बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ वकील ॲड. उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## एन्काऊंटर बनावट असल्याचा मुद्दा कसा वगळला?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अक्षय शिंदेचं एन्काऊंटर बनावट असल्याचा ठपका ठेवत संबंधित पोलिस अधिकाऱ्यांच्या भुमिकेवर सवाल उठवणारे अहवालातील दोन परिच्छेद कसे वगळले जाऊ शकतात? असा प्रश्न विचारल हायकोर्टाने ठाणे सत्र न्यायालयाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हे प्रकरण हायकोर्टात सुरू आहे याची ठाणे सत्र न्यायाधीशांना कल्पना दिली होतीत का? असा सवालही हायकोर्टाने राज्य सरकारला विचारला. अक्षय शिंदेच्या बनावट चकमक प्रकरणी ठाणे सत्र न्यायालयाच्या

» पान ७ वर

महायुती सरकारचे १०० दिवस

# फडणवीस यांनी घेतला आढावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा अंतरिम आढावा घेण्यात आला. आतापर्यंत केलेल्या चांगल्या कामाचा यामध्ये आढावा घेण्यात आला. ७ जानेवारी ते १६ एप्रिल २०२५ या कालावधीत जी कामे झाली, त्यासंदर्भात चर्चा झाल्याची माहिती मिळत आहे. या बैठकीला मंत्रालय सचिवांपासून ते क्षेत्रीय अधिकाऱ्यांपर्यंत



६८५४ अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते. ऑनलाईन बैठकीला सर्व स्तरातील इतके अधिकारी उपस्थित असण्याचा हा एक विक्रम, तालुका स्तरापर्यंत अधिकाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती होती.

दरम्यान, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना विविध सूचना दिल्या आहेत. नावीन्यपूर्ण उपक्रमांची यादी तयार करा, त्या इतरांनाही सांगा अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. गुंतवणूक येत असताना गुड गव्हर्नन्स द्या, संपूर्ण कालावधीचा आढावा आल्यानंतर १ मे रोजी याचा सार्वजनिक कार्यक्रम करु, असेही फडणवीस म्हणाले. संकेतस्थळे फुलप्रूफ करा. दरम्यान, यावेळी लक्षणीय कामगिरी करणाऱ्या १५ अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली.

## संभल मशिदीसाठी समितीची स्थापना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**प्रयागराज :** उत्तर प्रदेशाच्या संभल येथील जामा मशिदीबद्दल अलाहाबाद उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. न्यायालयाने मशिदीतील रंगरंगोटीचे काम एका समितीच्या देखरेखीखाली करण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाने आदेश दिला की, मशिदीचे रंगकाम आणि देखरेख तीन सदस्यीय तज्ज्ञ समितीच्या देखरेखीखाली केली जाईल, जेणेकरून मशिदीच्या ऐतिहासिक आणि संरचनात्मक महत्त्वाला कोणतेही नुकसान होणार नाही. अलाहाबाद हायकोर्टाने दिलेल्या आदेशानुसार ३ सदस्यीय समितीमध्ये भारतीय पुरातत्व

» पान ७ वर

# युरोपीय महासंघाच्या प्रमुख भारत दौऱ्यावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जगभरात सुरू असलेल्या टॅरिफ वॉरच्या पार्श्वभूमीवर, युरोपीय महासंघाच्या प्रमुख उर्सुला वॉन डेर लेयन युरोपिय महासंघासोबत भारत दौऱ्यावर पोहचल्या आहेत. त्यांनी दिल्लीतील इंडिया गेटचा फोटो त्यांच्या एक्स अकाऊंटवरून शेअर करत भारत दौऱ्याची माहिती दिली आहे. तसेच त्यांनी भारताला संघर्षाच्या काळातील विश्वासू मित्र देखील म्हटले आहे.

युरोपीय महासंघाच्या अध्यक्षा यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे



की, माझ्या आयुक्तांच्या टीमसोबत मी दिल्लीत पोहचले आहे. सध्याच्या संघर्ष आणि तीव्र स्पर्धेच्या युगात तुम्हाला विश्वासू

» पान ७ वर

# मराठी राजभाषा दिनी मराठीचा जागर; दुमदुमला मराठीचा जयघोष

अभिजात मराठी

"मराठी राजभाषा दिनाचे आणि केंद्र सरकारकडून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुलांमध्ये मराठी भाषेविषयी अस्मिता जागृत व्हावी, मराठी बोलण्याचे संस्कार मुलांवर व्हावेत यातूनच मराठी भाषेचे संवर्धन व्हावे आणि मराठी भाषा प्रवाहित रहावी हा कार्यक्रमाचा उद्देश आहे."

**— पियूष शहा**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संत, राष्ट्रपुरुष, क्रांतिकारक, समाजसुधारक यांची वेषभूषा परिधान करून असंख्य शालेय विद्यार्थ्यांनी मराठीचा जयघोष करीत मराठीत बोलण्याची शपथ घेतली. पुण्यातील ऐतिहासिक वास्तू असलेल्या लाल महाल आणि शनिवार वाडा येथे मराठी अभिमान गीत व महाराष्ट्र गीत सादर केले. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय,' 'माय मराठीचा जयजयकार असो' अशा जोशपूर्ण घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

निमित्त होते मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून साईनाथ मंडळ ट्रस्ट व शनिवार पेठेतील नवीन मराठी शाळा आयोजित विशेष कार्यक्रमाचे. सुरुवातीस शनिवार वाडा आणि त्यानंतर लाल महाल येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक वेषभूषेत तसेच संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, पुण्यलोक अहिल्याबाई होळकर, बाजीराव पेशवे, राणी लक्ष्मीबाई, लोकमान्य टिळक, क्रांतीसूर्य ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासह वारकरी, मावळ्यांच्या वेशभूषेत मुले-मुली सहभागी झाले होते.





'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी,' 'मराठी माणसाने मराठी माणसासोबत मराठीतच बोलावे,' 'मराठी राजभाषा दिनाच्या शुभेच्छा' असे मराठी भाषेची अस्मिता दर्शविणारे फलक तसेच कवी कुसुमाग्रज यांचे छायाचित्र असलेले फलकही विद्यार्थ्यांनी हाती घेतले होते. मराठी भाषेची धुरा जणू हा बालचमू आनंदाने स्वीकारत आहे आणि मराठी भाषा प्रवाहित ठेवण्यासाठी कटिबद्ध आहे, असे आश्वासक चित्र या निमित्ताने पहावयास मिळाले.कार्यक्रमाची संकल्पना व आयोजन पियूष शहा व मुख्याध्यापिका कल्पना वाघ यांची होती.

#रा



## क्रांतीवीर स्व.मोहन रानडे यांच्या तैलचित्राचे अनावरण

**पुणे :** सांगलीचे सुपुत्र व गोवा क्रांतीवीर स्व.मोहन रानडे उर्फ मनोहर आपटे यांच्या तैलचित्राचे अनावरण आज गोवा विधानसभेचे अध्यक्ष श्री. रमेश तवडकर यांच्या हस्ते सिटी हायस्कूल सांगली च्या सभागृहात करण्यात आले. हा कार्यक्रम सांगली शिक्षण संस्था आणि स्वामी विवेकानंद जीवन ज्योत संस्था पुणे यांनी संयुक्तपणे आयोजित केला होता. या समारंभाच्या वेळी गोवा भाजपचे प्रदेश अध्यक्ष दामू नाईक, सांगली शहराचे आमदार सुधीर गाडगीळ ,सांगली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीराम कुलकर्णी व विश्वस्त, स्वामी विवेकानंद जीवनज्योत संस्थेचे अध्यक्ष एम.डी. देशपांडे व विश्वस्त , गोव्यातील ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक वामन प्रभु ,शाळेतील विद्यार्थी,पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सांगली शिक्षण संस्थेचे कार्यवाह गोसावी यांनी सर्वांचे स्वागत करुन, समारंभाच्या आयोजनाचे उद्दिष्ट सांगितले एम. डी. देशपांडे यांनी स्वामी विवेकानंद जीवनज्योत संस्था, पुणे ट्रस्ट राबवित असलेल्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परेश पेठे यांनी केले तर कांबळे सर यांनी आभार मानले.

## दस्त नोंदणी कार्यालयाची वेळ वाढवली

**पुणे :** दस्त नोंदणी कार्यालयांवरील भार लक्षात घेता १ ते ३१ मार्चदरम्यान राज्यातील दुय्यम निबंधक कार्यालयांची वेळ दोन तासांनी वाढविण्यात आली आहे.नोंदणी उपमहानिरीक्षक उदयराज चव्हाण यांनी परिपत्रक जारी केले आहे. गेल्या आर्थिक वर्षात राज्य सरकारने नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाला ५० हजार कोटी रुपयांच्या महसुलाचे उद्दिष्ट होते. यंदा हे उद्दिष्ट ५५ हजार कोटी रुपये आहे. फेब्रुवारीत राज्यात ४८ हजार ९९५ कोटी रुपयांचा महसूल गोळा झाला आहे. एकूण उद्दिष्टाच्या तुलनेत हे उत्पन्न ८९ टक्के आहे. त्यातून राज्यात सुमारे २५ लाख एवढी दस्तनोंदणी करण्यात आली. पुढील महिनाभरात आणखी ७ हजार कोटी रुपयांचा महसूल गोळा करण्याचे विभागापुढे उद्दिष्ट आहे.मोठ्या प्रमाणात दस्त नोंदणी व्हावी, यासाठी १ ते ३१ मार्चदरम्यान तीनशेहून अधिक दुय्यम निबंधक कार्यालयांच्या वेळांमध्ये दोन तासांनी वाढ करण्यात आली आहे. सद्यःस्थितीत सकाळी पावणेदहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत कार्यालये सुरू असतात. मात्र, आता दोन तासांनी वाढ केल्याने ही कार्यालये रात्री आठ वाजेपर्यंत सुरू राहतील, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे.

## महालक्ष्मी हॉटेलवर राज्य उत्पादन शुल्क विभागाचा छापा

**पुणे :** पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील लोणी स्टेशन (कदमवाकवस्ती, ता.हवेली) येथील महालक्ष्मी हॉटेलवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने आज बुधवारी (ता.26) दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास छापा टाकला आहे.या छाप्यात विभागाने मोठा दारूचा साठा जप्त केला असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हॉटेल महालक्ष्मी मधून बेकायदा देशी विदेशी दारूची विक्री केली जात आहे. अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला आहे. घटनास्थळी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी व कर्मचारी दाखल असून कारवाई करण्याचे काम सुरू आहे.

## उन्हाळ्यात साखरेचे दर रहाणार तेजीत

**पुणे :** उन्हाळ्याला सुरुवात झालेली आहे. त्यातच लग्नसराई, यात्रा-जत्रा आणि थंडपेय उत्पादकांकडून



नेहमीच्या तुलनेत साखरेचा खप वाढत जातो. मार्च, एप्रिल आणि मे हे साखरेच्या अधिक खपाचे दिवस असल्याने साखरेचा अपेक्षित मागणीनुसार मुबलक कोटा देणे अपेक्षित होते. परंतु केंद्र सरकारने मार्च महिन्यासाठी २३ लाख टन साखरेचा कोटा खुला केला आहे. उन्हाळ्यामुळे साखरेचा खप हा पुढील दोन महिने वाढता राहणार आहे. शिवाय, लग्नसराई, यात्रा-जत्रा आणि थंडपेय उत्पाकांची वाढणारी मागणी लक्षात घेता घोषित कोटा मागणीच्या तुलनेत अपुरा असल्यामुळे साखरेचे दर तेजीत राहण्याचा अंदाज घाऊक बाजारपेठेतून वर्तविण्यात आला. फेब्रुवारी महिन्यातील शिल्लक साखर विक्रीला केंद्राने मुदतवाढ दिलेली नाही. मार्च महिन्यासाठी किमान २४ लाख टनांचा कोटा जाहीर होण्याची अपेक्षा बाजारपेठेला होती.

## मार्च आणि एप्रिल महिन्यात विद्यार्थ्यांना मिळणार सुट्टया

**पुणे :** मार्च आणि एप्रिल महिन्यात मोठ्या सुट्ट्या विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. त्यानुसार पालक फिरायला जायचा प्लान करू शकतात. फेब्रुवारी महिना संपायला अवघी काही दिवस शिल्लक राहिलेले आहेत. मार्च महिन्यात होळी, धूलिवंदन, गुढीपाडवा, रमजान ईद आहेत. तसेच काही शाळांना शनिवारीच्याही सुट्ट्या दिल्या जातात. होळी १३ तारेखला असून त्यापाठोपाठ दुसऱ्या दिवशी १४ तारखेला धूलिवंदन सण आहे. त्याच्यानंतर १७ मार्चला तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आहे. महिन्याच्या शेवटी लागोपाठ दोन सुट्ट्या आहेत. ३० तारखेला गुढीपाडवा आणि ३१ तारखेला रमजान ईद असल्याने या दोन दिवस शाळांना सुट्टी देण्यात येणार आहे. एप्रिल महिन्यात रविवार ६ एप्रिल रोजी राम नवमीची सुट्टी, १० एप्रिलस गुरुवारी महावीर जयंतीची सुट्टी आणि १८ एप्रिल शुक्रवारी गुड फ्रायडेची सुट्टी असणार आहे. याशिवाय महिन्यात चार रविवारी असल्याने त्याही सुट्ट्या असणार आहेत.

## मराठीचा जागर लोककलाद्वारे



पुणे — संगीत क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या संगीतानंद संस्थेतर्फे आज आयोजित मराठी भाषा गौरव दिन या संगीतमय कार्यक्रमात लोककलांचे सादरीकरण करून संगीतमय शोभायात्रेव्दारे मराठीचा जागर करण्यात आला.

## संगीतमय शोभायात्रा आणि लोककलांमधून मराठीचा जागर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मराठमोळ्या पोशाखातील सालंकृत पुणेकरांनी पारंपरिक वाद्यांच्या तालावर लोककलांचे सादरीकरण करीत संगीतमय शोभायात्रेव्दारे मराठीचा जागर केला. निमित्त होते संगीत क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या संगीतानंद संस्थेतर्फे आज आयोजित मराठी भाषा गौरव दिन या संगीतमय कार्यक्रमाचे.

यानिमित्त बालगंधर्व रंगमंदिर येथून काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेत कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्रसिद्ध लेखिका विनिता पिंपळखरे आणि प्रसिद्ध गायिका ज्योती गोराणे, तसेच संगीतानंदच्या संचालक ज्योती देशमुख, द.मा. मिरासदार यांच्या कन्या सुनेत्रा मंकणी, हेमा बेलड यांच्यासह संगीतानंदचे सदस्य आणि मराठीप्रेमी रसिकजन सहभागी झाले होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या गणेश वंदना, नांदी, ओव्या, वासुदेवाची गाणी, अभंग, बालगीते, भोंडला, मंगळागौर आणि नाट्य प्रवेश अशा वैविध्यपूर्ण लोककलांनी रसिकांची मने जिंकली.

# मराठी सारस्वतांना 'प्रतिक्षा' निधीची...!

### मराठी भाषेच्या उन्नतीसाठी अद्याप निधी नाही; लवकर पूर्तता होण्याची अपेक्षा

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा महत्वपूर्ण निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. मात्र; या भाषेच्या उन्नतीसाठी अद्याप अपेक्षित निधी मिळाला नसून मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या अभिजात दर्जासाठी किती आणि कधी निधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, मराठी भाषा दिनाच्यानिमित्ताने तो लवकर मिळावा अशी अपेक्षा मराठी सारस्वत व्यक्त करत आहेत.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता पर्यंत संस्कृत, मल्याळम, कन्नड, तेलगु, उडिया या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. या सर्व भाषांना अभिजात दर्जा मिळाल्यानंतर त्या भाषेच्या विकासासाठीचा निधीही मिळाला आहे.

अभिजात भाषेचा दर्जा मिळालेल्या भाषांमध्ये संस्कृत ही भाषा 28000 लोकं बोलतात, त्यासाठी तिला 262 कोटींचा निधी केंद्र शासन देते. त्यानंतर कन्नड, तेलगु, मल्याळम, उडिया, या चार भाषांना मिळून 64 कोटींचा निधी मिळतो. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, त्यासाठी किती निधी मिळणार आणि तो कधी मिळणार याकडे लक्ष लागले आहे.

केंद्र सरकारने जारी केलेल्या निवेदनात मराठीला आणि अन्य भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे नोकरीच्या संधीत वाढ होतील. विशेषत: सांस्कृतिक आणि संशोधन क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध होतील. त्याचबरोबर संवर्धन, माहिती गोळा करणं, या भाषांमधील पुरातन साहित्याचं डिजिटलायझेशन यामुळे भाषांतर, नोंद, विविध साहित्याचं प्रकाशन तसंच डिजिटल माध्यमात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील, असे म्हटलं आहे. त्यामुळे केंद्र सरकारने निधीही वेळेत उपलब्ध करून द्यावा अशी मागणी मराठी भाषिक

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

करत आहेत.

कोणत्याही भाषेला अभिजात दर्जा देण्याचे अधिकार हे केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाला आहेत. गृह मंत्रालयाने २००५ साली हे अधिकार सांस्कृतिक मंत्रालयाला दिले.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याचा संघर्ष हा आजचा नाही. मराठीच्या अभिजात दर्जाबद्दल संशोधन करून तसा अहवाल केंद्र सरकारला देण्यासाठी २०१२ साली प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली होती.२०१३ साली या समितीने आपला अहवाल प्रकाशित केला. महारट्ठी-महरट्ठी-मऱ्हाटी-मराठी असा मराठीचा उच्चार बदलत गेला असं या अहवालात म्हटलं आहे.

**यासाठी निधी अपेक्षित...!**

- मराठी भाषेच्या विविध बोलींचा अभ्यास, त्यांचे संशोधन
- त्यातील साहित्याचा संग्रह
- हिंदुस्थानातील सर्व 450 विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे
- प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे, महाराष्ट्रातील सर्व १२००० ग्रंथालयांना सशक्त करणे
- मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था
- व्यक्ती, विद्यार्थी अशा साऱ्यांना भरीव मदत करणे अशा सर्व गोष्टी अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर निधीमधून कराव्या लागतात.
- हे सर्व करण्यासाठी निधी वेळेत मिळायला हवा अशी विचारणा केली जात आहे.
- महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागानेही त्यांच्या वेबसाईटवर अभिजात दर्जा मिळण्याचे भाषा संवर्धनासाठी हे फायदे सांगितले आहेत.
- त्यामुळे केंद्र शासन किती वेळेत हा निधी देणार, महाराष्ट्र सरकार त्यासाठी पाठपुरावा करणार का हे महत्वाचे आहे.

> **"मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून साहित्य क्षेत्रातली जुनी, आद्य संस्था महाराष्ट्र साहित्य परिषदेने सातत्याने लढा दिला. राजकीय इच्छाशक्तीमुळे अभिजात दर्जा मिळाला. तशीच राजकीय इच्छाशक्ती निधीच्या बाबतीत दाखविण्याची गरज आहे."**
> – **प्रा. मिलिंद जोशी,** महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष.

## जिल्ह्यातील १३० अंगणवाड्यांचा चेहरामोहरा बदलणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्ह्यातील अंगणवाड्यांचा चेहरामोहरा बदलण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने जिल्हा नियोजन समितीकडे (डीपीसी) ५२ कोटी २५ लाख रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. या निधीतून १३० अंगणवाड्या नव्याने बांधण्यात येणार आहेत, तसेच त्यांचे आधुनिकीकरण केले जाणार आहे.

जिल्ह्यातील १३० अंगणवाड्यांचे बांधकाम करताना, सर्व अंगणवाड्यांची रचना, आकार आणि रंगसंगती एकसारखीच असावी, असा 'पुणे पॅटर्न' राबविण्यात येणार आहे. अंगणवाड्यांच्या बांधकामासाठी महिला बालकल्याण विभागाने 'डीपीसी'कडे प्रस्ताव सादर केला आहे.

जामसिंग गिरासे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, यांनी सांगितले की, 'पुणे जिल्ह्यात नव्याने १३० अंगणवाड्यांचे बांधकाम करण्यात येत आहे. त्या बांधकामाची रचना एकसारखी असावी. त्याच पॅटर्ननुसार, सर्व ठिकाणच्या अंगणवाड्या बांधणे अपेक्षित आहे. पारंपरिक पद्धतीने बांधलेल्या अंगणवाड्यांचे रूपडे बदलणार आहे. नवीन अंगणवाड्यांमध्ये मुलांना खेळण्यासाठी साहित्य, सीमा भिंत आणि आकर्षक रंगसंगती असणार आहे.

- एकूण अंगणवाड्या: ४,३९५
- स्वतंत्र इमारती असलेल्या: ३,७९०
- इमारती नसलेल्या: ३८५
- नव्याने बांधण्यात येणाऱ्या: १२९
- डीपीसीतून निधीची मागणी: ५२ कोटी २५ लाख
- जिल्ह्यातील १०८ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये 'हिरकणी कक्ष' बांधण्यासाठी तीन टक्के निधीची मागणी



जिल्ह्यातील ३८५ अंगणवाड्यांना स्वतःच्या इमारती नाहीत. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार, बांधकाम विभागाने या बांधकामाची जबाबदारी घेणे आवश्यक आहे. पूर्वी बांधलेल्या अंगणवाड्या तोडण्यात येणार नाहीत, तर त्यांना नव्या अंगणवाड्यांसारखा रंग दिला जाईल.

## देवराईमुळेच जैवविविधता टिकून : डॉ. माधव गाडगीळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "जैवविविधता सगळीकडे सारखी नसते. केवळ धार्मिक भावनेने देवराईकडे पाहणे उचित नाही. देवराईमुळेच जैवविविधता टिकून आहे. त्यामुळे तेथील जलस्रोत्र, औषधी वनस्पती, वन्यजीव संरक्षित होतात. हे सर्व वैभव देवराईमुळे आहे. पूर्वी देवराईत शिकार करायची नाही, अशी एक धारणा होती. पण आता धार्मिकताही कमी होत असून तिचे महत्त्व माहिती नसल्याने देवराई नष्ट होऊ लागली आहे," अशी खंत ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी व्यक्त केली.

वनराई प्रकाशित 'लोक - जैवविविधता नोंदवही' हे पुस्तक ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ आणि सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. विजय एदलाबादकर यांनी लिहिले असून या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा वनराई संस्थेत पार पडला. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या शुभहस्ते याचे प्रकाशन झाले. यावेळी डॉ. माधव गाडगीळ, विजय एदलाबादकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. देवाजी तोफा आणि माजी खासदार ॲड. वंदनाताई चव्हाण, वनराईचे विश्वस्त सागर धारिया, सचिव अमित वाडेकर यावेळी उपस्थित होते.



पुणे — 'लोक - जैवविविधता नोंदवही' पुस्तिकेचे प्रकाशन करताना (डावीकडून) सागर धारिया, वंदना चव्हाण, डॉ. माधव गाडगीळ, डॉ. सदानंद मोरे, डॉ. देवाजी तोफा, विजय एदलाबादकर, अमित वाडेकर.

# सध्या वैचारिक गारठा निर्माण झाला आहे : सतीश आळेकर



पुण्यभूषण फाउंडेशन आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या दिवाळी अंक स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात 'पुण्यभूषण सर्वोत्तम दिवाळी अंकाचा' पुरस्कार 'ऋतुरंग' या दिवाळी अंकाला प्रदान करताना ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर.

वाचन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिवाळी अंक आणि मराठीचे वाचन याबाबत फारसे आशावादी राहता येत नाही. मराठी भाषेविषयीची संवेदना विरळ होत चालली आहे की काय आणि ममत्व कमी होत चालले आहे की काय अशी शंका यावी, अशी परिस्थिती सभोवताली दिसत असताना सध्या सभोवताली वैचारिक गारठा निर्माण झाला आहे, असे जाणवत असल्याचे मत ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांनी व्यक्त केले.

पुण्यभूषण फाउंडेशन आणि महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा आळेकर यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर पत्रकार राजीव खांडेकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिध्द लेखक आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, पुण्यभूषण फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेच्या कार्यवाह सुनिताराजे पवार, पुण्यभूषण फौंडेशनचे संयोजक संजय भास्कर जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचे कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी आदी उपस्थित होते.

यावेळी 'पुण्यभूषण सर्वोत्तम दिवाळी अंकाचा' पुरस्कार संपादक अरुण शेवते यांच्या 'ऋतुरंग' या दिवाळी अंकाला प्रदान करण्यात आला. तर पुण्यभूषण उत्कृष्ट 'बालकुमार' दिवाळी अंकासाठीचा पुरस्कार 'साधना बालकुमार' या दिवाळी अंकाला, एकाच विषयाला वाहिलेल्या दिवाळी अंकासाठीचा पुरस्कार 'वास्तव' (भूत विशेषांक) या दिवाळी अंकाला तर इतर विभागातील पुरस्कार 'आर्याबाग' या दिवाळी अंकाला प्रदान करण्यात आला.

> मराठी नाटकांच्या बाबातीत मी प्रचंड आशावादी असून ध्वनीयोजना, प्रकाश योजना, सादरीकरण आणि मग शब्द अशा क्रमाने तरूण पिढी नवीन प्रयोग करीत रंगभूमीवर येत आहे. कोणत्याही प्रकारच्या छापील माध्यमांचा उपयोग न करता यांचे सगळे शो हाऊस फुल असतात, यावरून यांची संवादाची माध्यमे आणि संवाद शैली बदललेली आहे, असे दिसून येते.
> — **सतीश आळेकर, ,** ज्येष्ठ नाटककार



# वासनांध... लिंगपिसाट अन् सराईतही...!

## स्वारगेटचा बलात्कारी दत्ता गाडेची 'कुंडली' बाहेर; लिफ्ट देऊन लुटत होता महिलांना...

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

**३६ तासानंतरही बलात्कारी आरोपीचा पोलीसांना चकवा, कुटुबिंय आणि मित्र मैत्रीणीही पोलीसांच्या रडारवर**

**शिरुर तालुक्यात रंगलाय बलात्कारावरुन राजकीय आखाडा**

**कुटुबिंय भयभीत; गावकरीही हवालदिल**

**दत्ता गाडेच्या गावाला पोलीस छावणीचे स्वरुप**

**कुटुबिंयांसह नातेवाईकांनाही पोलीसांचा 'सांगावा'**



हाच तो बलात्कारी

**पुणे :** स्वारगेट बसस्थानकात शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्काराच्या घटनेनंतर राज्यभरात पडसाद उमटत आहेत. या घटनेतील संशयित आरोपी हा सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर याआधीही वेगवेगळ्या पोलिस स्थानकात गुन्हे दाखल आहेत. तसंच तो राजकीय पक्षाशी संबंधित आहे. आरोपी दत्तात्रय गाडे याच्याबाबत आता धक्कादायक अशी माहिती समोर आलीय. दत्तात्रय गाडे हा शिरूर तालुक्यातल्या गुणाट या गावचा आहे. गुन्ह्यानंतर तो शिरूरला गेल्याची माहिती समोर आली आहे.

दत्तात्रय गाडे हा पुणे ते अहिल्यानगर अशी प्रवासी वाहतूक करायचा. तेव्हा तो वृद्ध महिलांना लिफ्ट देण्याच्या बहाण्याने चारचाकी गाडीत बसवत असे आणि निर्जन स्थळी लुबाडत असे. एका महिलेच्या सतर्कतेमुळे दत्ता गाडे याला पोलिसांनी पकडलं होतं. शिक्रापूर आणि शिरूर पोलीस ठाण्यात त्याच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत. दत्ता गाडे याचं शिरूर तालुक्यातल्या गुणाट गावी पत्र्याचं घर आहे. तर वडिलोपार्जित तीन एकर जमीनही आहे. आई-वडील शेती करतात. दत्ता गाडेला एक भाऊ, पत्नी, लहान मुलही असल्याची माहिती आहे. दत्ता गाडे काही काम करत नसे. त्याला झटपट पैसे कमावण्याचा नाद लागला आणि त्याच नादातून त्यानं चोरी करायला सुरुवात केली. महिलांना, वृद्धांना लुबाडत असल्याची माहिती स्थानिकांनी दिलीय. दत्ता गाडेनं २०१९ मध्ये कर्ज काढून एक चारचाकी गाडी खरेदी केली होती. त्या कारमधून तो पुणे ते अहिल्यानगर अशी प्रवासी वाहतूक करायचा. त्यावेळीच त्यानं चोरी करायला सुरुवात केली. जास्त दागिने अंगावर असणाऱ्या महिलांना लिफ्ट द्यायचा. त्यांना निर्जन स्थळी नेत चाकूचा धाक दाखवून दागिने लुटायचा.गुणाट गावात तंटामुक्तीच्या निवडणुकीसाठीही दत्ता गाडे उभा राहिला होता. मात्र निवडणुकीत त्याला पराभवाचा धक्का बसला होता. निवडणुकीच्या काळात राजकीय नेत्यासाठीही काम केलं होतं. नेत्यांसोबत गाडेचे फोटोही व्हायरल झाले होते.

## आधी ताई म्हणून जवळीक मग अत्याचार

**पुणे:** पुण्यात नोकरी करणारी तरुणी फलटन येथे आपल्या मूळ गावी जाण्यासाठी पहाटे आगारात आली होती. एसटीची वाट पाहत असताना आरोपी दत्तात्रय गाडे हा तिथेच घुटमळत होता. तरुणीला ताई अशी हाक मारत आरोपीने तिचा विश्वास संपादन करत संवाद सुरू केला. ती कुठे जात आहे, याची माहिती घेऊन तिला फलटणला जात असलेली बस दुसरीकडे उभी असल्याचे सांगून शिवशाही बसमध्ये घेऊन गेला आणि तिथे तिच्यावर बलात्कार केला, अशी माहिती पोलीस उपायुक्त डॉ. स्मार्तना पाटील यांनी दिली.

आरोपी गाडेने ताई तू कुठे चालली? असा प्रश्न विचारून आधी तिची माहिती काढली. त्यानंतर तिने फलटणचे नाव घेतल्यानंतर तिला बस दुसरीकडे लागत असल्याचे सांगितले. त्यानंतर तिला बसमध्ये बसवतो, असे सांगून तिला बसमध्ये नेले. हे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले आहे. बसमध्ये अंधार असल्याचे पीडितेने सांगितले होते. मात्र तू मोबाइलचा टॉर्च सुरू करून आतमध्ये प्रवाशी आहेत का? हे बघ असे आरोपीने सांगितले. पीडित तरुणी बसमध्ये चढताच आरोपी मागून गेला आणि दरवाजा बंद करून घेतला. त्यानंतर त्याने पीडितेवर अत्याचार केला.

गाडेच्या संपर्कात असलेल्या दहा मित्रांची पोलिसांनी चौकशी पोलिसांनी बुधवारी रात्री केली. चौकशीत मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांकडून गाडेचा शोध घेण्यात येत आहे. गाडेचे आई-वडील आणि भावाची चौकशी करण्यात येणार आहे. त्यांना चौकशीसाठी स्वारगेट पोलीस ठाण्यात बोलाविण्यात आले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

गाडेची मैत्रीण भोर तालुक्यात राहायला आहे. पोलिसांनी तिची चौकशी केली. "तो माझ्या संपर्कात असलेल्या मैत्रिणींचे नंबर मागायचा. त्याने अनेक तरुणींना त्रास दिला आहे", अशी माहिती तिने दिली. आता यादृष्टीने पोलिसांनी तपास सुरू केला आहे.




## असे आहेत गुन्हे दाखल

**२०२० मध्ये त्यानं करे घाटात लूटमार केली होती.**

दरोड्या प्रकरणी त्याला शिक्षाही झाली होती.

**त्याच्यावर शिक्रापूरमध्ये दोन, अहिल्यानगरमध्ये सुपा, केडगाव आणि कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल.**



## आजी माजी आमदारांशी लागेबांधे

**पुणे :** स्वारगेट येथील शिवशाही बसमधील बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याचे राजकीय नेत्यांशी संबंध असल्याची चर्चा आहे. तो मुळचा शिरूरचा राहणारा असल्याने शिरूरच्या आजी-माजी आमदारांबरोबर त्याचे फोटो असल्याचे समोर आले आहे. शिरूरचे आजी माजी आमदार अनुक्रमे अजित पवार आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील आहेत. पण माझा दत्तात्रय गाडेशी काहीही संबंध नसल्याची प्रतिक्रिया शिरूरचे विद्यमान आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी दिली आहे. या प्रकरणी दत्तात्रय गाडे या आरोपीची ओळख पटली असून तो सराईत गुन्हेगार असल्याचं समोर आलं आहे. तसंच, त्याचे अनेक राजकीय पक्षातील नेत्यांबरोबर संबंध असल्याची चर्चा आहे. शिरूरचे माजी आमदार अशोक पवार यांच्या वाढदिवसाच्या बॅनरवर दत्तात्रय गाडे याचा फोटो आहे. अशोक पवार हे शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षातील आहेत. तर, शिरूरचे विद्यमान आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्याबरोबरही दत्तात्रय गाडेचा फोटो असून तो त्याने त्याच्या डीपीला लावला असल्याचं म्हटलं जातंय. याप्रकरणी ज्ञानेश्वर कटकेंनी आता प्रतिक्रिया दिली आहे.

> **आरोपी शिरूर तालुक्यात राहणारा आहे. तो मतदारसंघ माझा असल्याने अनेकजण येतात आणि माझ्याबरोबर फोटो काढतात. पण माझा त्याच्याशी काहीही संबंध नाही. दिवसभरात असे अनेकजण भेटत असतात, फोटो काढत असतात. पण मी दत्तात्रय गाडेला ओळखत नाही. विकृत असलेल्या अशा लोकांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे.**
>
> **-ज्ञानेश्वर कटके,** आमदार शिरूर- हवेली

> **हा आरोपी उज्जैन यात्रेला कोणाला मदत करत होता, कोणत्या महिला-भगिनींना नेत होता, याची सखोल चौकशी पोलीस खात्याने केली पाहिजे. याचे हितसंबंध कोणा-कोणाशी होते, हे ताबडतोब शोधलं पाहिजे. याचा मोबाईल ताब्यात घेणं किंवा उज्जेनला गेला त्याचे रेकॉर्ड मागा. अशा आरोपीला फाशीची शिक्षा होणं गरजेचं आहे.**
>
> **-ॲड. अशोक पवार,** माजी आमदार शिरूर- हवेली

## हीच पुणे पोलीसांची निष्क्रियता : तृप्ती देसाई



**पुणे :** बलात्कार प्रकरणातील एका आरोपीला अटक करण्यासाठी पोलीसांना एक लाखांचे बक्षिस जाहीर करावे लागते, यातूनच पोलीसांची निष्क्रियता उघड होते असा सनसनाटी आरोप सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केला. राजकीय दबावामुळे पुण्यात अशी अनेक प्रकरणे दाबली जातात असा हल्लाबोलही त्यांनी केला. आज गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी स्वारगेट बस स्थानकातील सुरक्षेचा आढावा घेतला.परंतु योगेश कदम यांची कार अडवण्याचा प्रयत्न सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आला. या प्रकाराने मोठा गोंधळ उडाला. पोलिसांनी तृप्ती देसाई आणि आंदोलक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.यावेळी तृप्ती देसाई म्हणाल्या की, ज्यांनी गुन्हा केला त्यांना पकडले जात नाही. पुण्यातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न उभा राहिला आहे.आरोपीला अटक होत नाही. पोलीस यंत्रणा काय करते, जर आरोपीला अटक होत नाही. लोकशाही मार्गाने आम्ही आंदोलन करत असताना आम्हाला जबरदस्तीने ताब्यात घेतले. आरोपीला वेगळा न्याय आणि आम्हाला वेगळा न्याय दिला जातो. आम्ही योगेश कदम यांना जाब विचारायला गेला होतो. तसेच ५० टक्के महिलांना तिकिट दर असल्याने जास्त महिला एसटीतून प्रवास करतात अशात एसटीमध्ये महिला सुरक्षा नाही. योगेश कदम यांना जनतेने निवडून दिलंय. वाहन थांबवून आम्ही त्यांना जाब विचारू शकतो. आम्हाला धरपकड करून पोलीस ताब्यात घेतात तसे आरोपीला पकडा. वाल्मिकी कराडलाही पुण्यात लपवून ठेवला होता. तसा या गुन्ह्यातील आरोपीलाही लपवलं आहे का, यंत्रणा काय करतेय असा सवाल देसाई यांनी उपस्थित केला. दरम्यान, गृह राज्यमंत्री योगेश कदम इथं आलेत, ते कुठल्या तोंडाने आलेत, काय सांगायला आलेत. आरोपीला पकडून घेऊन या. लोकशाहीत आम्हाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. योगेश कदम यांना आम्हाला भेटायचे होते. त्यांना जाब विचारायचा होता असं सांगत तृप्ती देसाई यांनी योगेश कदम यांच्यावर टीका केली.

# आता 'परिक्षा' वाहतूक कोंडी फोडण्याची...!

## बालहट्ट नडला, कात्रज चौकासाठी पुणेकरांच्या चक्क १९ कोटींचा 'जुगार'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** निकाल विरोदात जाणार हे गृहित असतानाही महापालिका प्रशासनाने पुणेकरांच्या जीवावर कात्रज चौकातील कोंडी फोडण्यासाठी चक्क साडे एकवीस कोटी रुपयांचा अवसानघातकी जुगार खेळला, विशेष म्हणजे जे काम आतबट्ट्यात केवळ तीन ते चार कोटीत होणार होते त्या कामासाठी तब्बल २१ कोटी ५७ लाख रुपये प्रशासनाने मोजले आहेत. मात्र; अद्यापही प्रशासनासाठी हा 'पेपर अवघड'च असून वाहतूक कोंडी फोडण्याचे मोठे आव्हान प्रशासनाच्या समोर असणार आहे.

कात्रज चौकातील ४० गुंठे जागा महापालिकेच्या ताब्यात येताच महापालिकेच्या पथ विभागाने बुधवारी सकाळपासूनच तेथे रस्ता तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. येत्या दोन दिवसांत हे संपूर्ण काम पूर्ण करून डांबरीकरण करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे.

> **कात्रज चौकातील जागा ताब्यात आल्यानंतर येथे साफसफाई केली जात आहे. दोन दिवसांत या जागेवरील साफसफाई पूर्ण केली जाणार आहे. त्यानंतर या जागेवर डांबरीकरण करण्यात येईल, हा रस्ता नागरिकांसाठी आणि वाहतूकीसाठी लवकरात लवकर खुला करण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे.**
>
> **-अनिरुद्ध पावसकर,** पथ विभाग प्रमुख, पुणे महापालिका



### असा आहे या जागेचा इतिहास...

- ४० गुंठे जागा २८ वर्षानंतर महापालिकेच्या ताब्यात
- जागेचा मोबदला रोख स्वरुपात मिळावी अशी जागा मालक संजय गुगळे यांची मागणी
- महापालिका प्रशासनाचा स्पष्ट शब्दात नकार
- जागा मालकाची उच्च न्यायालयात धाव
- शहराच्या १९८७ च्या विकास आराखड्यानुसार (डीपी) ही जागा ३० मीटर डीपी रस्ता
- ६ हजार २०० चौरस मीटर उद्यानासाठी बाधित होती.
- २०१७ च्या विकास आराखड्यात हा रस्ता ३० ऐवजी ६० मीटरचा करण्यात आला.
- २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार २१ कोटी ५७ लाख जागा मालकाला देण्याचे न्यायालयाचे आदेश
- बुधवारी महाशिवरात्रीची सुट्टी असतानाही प्रत्यक्षात कामाला प्रारंभ

कात्रज ते कोंढवा रस्त्यावरील कात्रज चौकात असलेली ४० गुंठे जमीन महापालिकेने रोख मोबदला देत रस्ता करण्यासाठी ताब्यात घेतली आहे. भूसंपादनाची आवश्यक ती प्रक्रिया पार पाडून संबंधित जागामालकाला जागेचा मोबदला देत ही जागा दोन दिवसांपूर्वी महापालिकेच्या ताब्यात देण्यात आली. तब्बल २८ वर्षांनंतर ही जागा महापालिकेला मिळाली आहे. ही जागा महापालिकेच्या ताब्यात येताच बुधवारी पथ विभागाने येथे साफसफाईच्या कामाला सुरुवात केली.

पुढील काही दिवसांत जागेवर रस्ता तयार केला जाणार असून, डांबरीकरणदेखील पूर्ण करण्याचे नियोजन पथ विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. यामुळे कात्रज चौकात होणारी वाहतूककोंडी सुटण्यास मोठी मदत होणार आहे. कात्रज चौकातील ही जागा संजय गुगळे यांच्या मालकीची होती. ही जागा ताब्यात घेण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून महापालिका प्रयत्नशील होती. यापूर्वीच्या आयुक्तांनीदेखील त्यासाठी पाठपुरावा केला होता.

शहराच्या १९८७ च्या विकास आराखड्यानुसार (डीपी) ही जागा ३० मीटर डीपी रस्ता आणि ६ हजार २०० चौरस मीटर उद्यानासाठी बाधित होती. त्यानंतर २०१७ च्या विकास आराखड्यात हा रस्ता ३० ऐवजी ६० मीटरचा करण्यात आला. कात्रज-कोंढवा रस्ता आणि पुणे-सातारा रस्ता या दोन्हींमध्ये ही जागा बाधित होत होती. या जागेबाबत जागेचे मालक गुगळे हे उच्च न्यायालयात गेले होते. न्यायालयाने त्यांना मोबदला देण्याचा आदेश महापालिकेला दिला होता.

न्यायालयाच्या आदेशानुसार २०१३ च्या नवीन भूसंपादन कायद्यानुसार, या जागेचे संपादन करून त्याचा मोबदला देण्याचे निश्चित करण्यात आले. गेल्या अनेक महिन्यांपासून या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होती. या जागेच्या संपादनासाठी पालिकेने रोख मोबदला म्हणून २१ कोटी ५७ लाख रुपये दिले आहेत. ही जागा ताब्यात आल्यानंतर बुधवारी महाशिवरात्रीची सुटी असतानाही महापालिकेने येथे कामाला सुरुवात केली आहे.

# हिंजवडी मेट्रोचा आता 'राज' थाट...!; राजभवनच्या जागेस मान्यता




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिकेत गेल्या अनेक दिवसांपासून सुरक्षा कारणास्तव अडथळा ठरत असलेल्या राजभवनाच्या आवश्यक जागेबाबत अखेर राज्य सरकारकडून मान्यता प्राप्त झाली आहे. त्यामुळे मेट्रो मार्गिकेच्या कामाला आणखी वेग येणार असून, आनंदऋषीजी चौकाजवळील (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रवेशद्वार) विद्यापीठाच्या जागेपासून प्रवाशांसाठी उन्नत पादचारी पूल (फूट ओव्हर ब्रीज) करण्यात येणार आहे. त्यामुळे शिवाजीनगर ते हिंजवडी या मार्गावर धावणारी महामेट्रो आता 'राज' थाटात धावणार असून लाखो प्रवाशांना त्याचा लाभ होणार आहे.

पुण्यातील वाहतूक कोंडीच्या अनुषंगाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत (पीएमआरडीए) हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिका प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. मार्गिकेदरम्यान, पुण्यातील राज्यपालांचे अधिकृत निवासस्थान 'राजभवन' परिसर येत असल्याने या उन्नत प्रकल्पाला सुरक्षेच्या कारणास्तव अडसर निर्माण झाला होता. राजभवनाच्या जागेसमोरून या मेट्रो मार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी १०० टक्के भूसंपादन करून देण्याची जबाबदारी सरकार म्हणजेच पर्यायाने जिल्हाधिकारी आणि 'पीएमआरडीए'ने घेतली आहे. त्यानुसार सुरक्षिततेच्या कारणास्वत आवश्यक परवानग्या घेण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून विविध बैठका पार पडल्या असून परवानग्या घेण्यात आल्या आहे, अशी माहिती प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

मेट्रो मार्गिका प्रकल्पासाठी एक लाख ८६ हजार ५५९ चौरस फूट जागा लागणार असून, राजभवन वगळता सर्व जागा पीएमआरडीने ताब्यात घेऊन काम सुरू केले होते.


> राजभवन'च्या जागेसमोरून जाणाऱ्या मेट्रोच्या अनुषंगाने सुरक्षिततेसाठी पीएमआरडीएने खबरदारी घेऊन मार्गिका मार्ग प्रस्तावित केला आहे. राजभवनासमोरील विद्यापीठाच्या बाजूने प्रवाशांसाठी सुविधा करण्यात आली आहे. त्यासाठी उन्नत पादचारी पूल (फूट ओव्हर ब्रीज) करण्यात येणार आहे.
>
> **— रिनाज पठाण ,** मुख्य अभियंता, पीएमआरडीए

# मराठी भाषा केंद्राच्या शुभारंभाला 'तारीख पे तारीख'...!

## पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण, दुसरा टप्पा अद्यापही प्रतिक्षेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क







पुणे : मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला, तरी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मराठी भाषा भवनाचे काम प्रलंबितच आहे. इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याने प्रस्तावित आंतरराष्ट्रीय दर्जाचे मराठी भाषा केंद्र सुरू होण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे.

मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची स्थापना करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर विद्यापीठामध्ये काही वर्षांपूर्वी मराठी भाषा भवन प्रस्तावित करण्यात आले होते. मात्र, बराच काळ हे काम प्रलंबित राहिले होते. मराठी भाषा भवनासाठी बराच काळ पाठपुरावा केल्यानंतर गेल्या वर्षी महाराष्ट्र दिनी मराठी भाषा भवनाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन करण्यात आले. मात्र, त्यानंतर पुढील काम अद्याप पूर्ण झालेले नाही.

कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी मराठी भाषा भवनाच्या अनुषंगाने समिती नियुक्त केली. त्यात ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. राजेश्वरी देशपांडे यांचा समावेश होता. समितीने अंतरिम अहवाल सादर केला आहे. त्यानुसार मराठी भाषा भवनांतर्गत आंतरराष्ट्रीय दर्जाचे मराठी केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. समितीने अंतरिम अहवालात १५ ते १६ उपविभाग सुचवले आहेत. त्यात पाठ्यपुस्तकनिर्मिती, कोशनिर्मिती, अनुवाद, शालेय ते उच्च शिक्षणातील शिक्षकांना प्रशिक्षण, प्रशिक्षणासाठीची पाठ्यपुस्तके, बोली भाषांचा अभ्यास, मराठी भाषा संग्रहालय, प्रयोगशाळा अशा घटकांचा समावेश होता. मराठीमध्ये ज्ञाननिर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यानुसार मराठी भाषा भवनात मराठी भाषा केंद्र स्थापनेची प्रक्रिया सुरू झाली आहे, असे भाषा आणि साहित्य प्रशालेचे संचालक प्रा. प्रभाकर देसाई यांनी सांगितले.

> मराठी भाषा भवनाच्या उर्वरित कामाला गती देण्यात आहे. मात्र, इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत थांबून राहण्यापेक्षा प्रत्यक्ष कामकाज सुरू करण्यात आले आहे. विद्यापीठात पाली, प्राकृत भाषा विभागही असल्याने मराठी भाषा केंद्र उत्तम पद्धतीने काम करू शकेल. हे केंद्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे होण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.
> **- डॉ. सुरेश गोसावी,** कुलगुरु सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# शनिपार येथे 'मी मराठी स्वाक्षरी मराठी' उपक्रम

## महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे आयोजन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना, कसबा विभाग आणि महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना यांच्या वतीने शनिपार चौक, बाजीराव रस्ता येथे 'मी मराठी स्वाक्षरी मराठी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुमारे ३००० हून अधिक आबालवृद्धांनी भव्य फलकावर मराठी स्वाक्षरी करून उपक्रमात सहभाग नोंदवला.

उपक्रमाला राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी, मनसे नेते राजेंद्र वागस्कर, प्रदेश सरचिटणीस बाळा शेडगे, गणेश सातपुते, किशोर शिंदे, शहराध्यक्ष साईनाथ बाबर, प्रवक्ते योगेश खैरे, संघटक प्रल्हाद गवळी, मनविसेचे प्रशांत कनोजिया, आशिष साबळे, अभिषेक थिटे, धनंजय दळवी यांनी भेट दिली.

मनसे शहर सचिव वसंत खुटवड, मनविसे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य सारंग सराफ यांनी उपक्रमाचे आयोजन केले. तर, रुपेश चांदेकर, ऋषिकेश करंदीकर, करण मेहता, चंद्रकांत राजगुरु, प्रमोद उमरदंड, राहूल मुंगले यांनी उपक्रमाला सहकार्य केले.

मराठीत स्वाक्षरी करणाऱ्याला यावेळी पेढा देखील देण्यात आला. या उपक्रमाचे यंदाचे १६ वे वर्ष होते. यावेळी कॅलिग्राफी करणारे कलाकार देखील सहभागी झाले होते. मराठी भाषेचे महत्व आणि महती या उपक्रमाद्वारे सर्वांपर्यंत पोहोचविण्यात आली.

# 'छत्रपती शिवाजी महाराज एक युगप्रवर्तक सेनानी' पुस्तक प्रकाशन



**पुणे :** प्राचार्य रमणलाल शहा लिखित 'छत्रपती शिवाजी महाराज एका युगप्रवर्तक सेनानी' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवार, दिनांक १ मार्च रोजी होणार आहे. टिळक रस्त्यावरील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात सकाळी १०.३० वाजता होणाऱ्या कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा.डॉ. श्रीपाल सबनीस हे अध्यक्षस्थानी असणार आहेत.

दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीचे चेअरमन डॉ. पी.डी.पाटील, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ.शिवाजीराव कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ, अर्थतज्ज्ञ अभय टिळक, उद्योगपती संजय इनामदार, उत्कर्ष प्रकाशन चे सुधाकर जोशी, मसाप च्या प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार आदी उपस्थित राहणार आहेत. या ग्रंथामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वातंत्र्यप्रेम, स्वाभिमान, मनाची विशुद्धता, पराक्रम, शौर्य, निर्भयता, युद्धकौशल्य, आरमार निर्मिती तसेच सर्व मावळ्यांचे त्यांनी केलेले संघटन आणि चतुरंग सैन्य या गोष्टी मराठी समाजाला आणि देश व जगाला स्वातंत्र्याचा संदेश देणारे ठरले.

# विकसित भारतासाठी संकल्पना' अभियान यशस्वी !



**पुणे :** हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) आयोजित देशव्यापी 'एचपी पॉवर लॅब - विकसित भारतासाठी संकल्पना' या उपक्रमात संपूर्ण भारतभरातुन १,२९,२८८ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या अनोख्या उपक्रमाचा उद्देश नवोन्मेषाला चालना देणे आणि भारताच्या विकासविषयक दृष्टिकोनास हातभार लावणे हा होता.देशभरातील आयआयटी, एनआयटी आणि आयआयएम सारख्या नामांकित संस्थांसह ७ हजारहून अधिक शैक्षणिक संस्थांचा समावेश होता.एचपीसीएलचे शुद्धीकरण विभागचे संचालक एस. भरतन आणि मानव संसाधन विभागाचे संचालक के. एस. शेट्टी, तसेच इतर मान्यवर आणि उद्योग क्षेत्रातील दिग्गजांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.दि.२६ फेब्रुवारी २०२५ रोजी हा कार्यक्रम सिम्बायोसिस(लवळे) येथे झाला.विद्यार्थ्यांनी या नाविन्यपूर्ण स्पर्धेत भाग घेतला.ऊर्जा, समानता आणि समावेशन, ग्रामीण भारतासाठी ऊर्जा, हरित ऊर्जा, टिकाऊपणा आणि तांत्रिक नवकल्पना यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांनी विचार मांडले.

# खडकी शिक्षण संस्थेने घेतला विद्यार्थी विकासाचा ध्यास : मंत्री चंद्रकांत पाटील

## एमएनजीतर्फे दिलेल्या बसचे लोकार्पण



> विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीमध्ये संस्था सदैव अग्रस्थानी आहे. कोणत्याही अडचणीमुळे त्यांनी आपले शिक्षण थांबवू नये, या हेतूने शाळेमध्ये ये-जा करण्यासाठी विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेता संस्थेने तात्काळ पावले उचलली आहेत.
> **— कृष्णकुमार गोयल,,** अध्यक्ष खडकी शिक्षण संस्था



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यार्थ्यांच्या विकासाकरिता सरकारने अनेक ठोस पावले उचलली आहेत. मुलींचे शैक्षणिक प्रमाण वाढवण्याच्या हेतूने इंजीनियरिंग आणि वैद्यकीयसारख्या कोर्सेसमध्ये फीमध्ये सवलत देण्यात आल्या आहेत. खडकी शिक्षण संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सदैव तत्पर असून, भविष्यामध्ये लागणाऱ्या इतर सोयी सुविधांसाठी प्रयत्नशील राहीन, असे प्रतिपादन उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

खडकी शिक्षण संस्थेमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असून या विद्यार्थ्यांच्या शाळेमध्ये जाण्या येण्याच्या अडचणी लक्षात घेऊन एमएलजीएलकडून बस देण्यात आली. या बसचा लोकार्पण सोहळा (बुधवार, दि. २६) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी पुस्तक न्यासाचे संचालक राजेश पांडे, व्यवस्थापन परिषद सदस्य बागेश्री मंठाळकर, एमएनजीएलचे ऋतुजा पायगुडे, केसीबी उपाध्यक्ष अभय सावंत, सचिव आनंद छाजेड, अजय सूर्यवंशी, रमेश अवस्थी, ज्ञानेश्वर मुरकुटे, सुधीर फेंगसे, कमलेश पंगूडवाले, राजेंद्र भुतडा, काशिनाथ देवधर, संजय चाकणे, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

एमएनजीएल च्या माध्यमातून आज संस्थेस बस मिळालेली आहे. या उपक्रमामध्ये सहभागी सर्वांचे त्यांनी आभार मानले. प्रा. सुग्रीव सावंत यांनी सूत्रसंचालन केले. आनंद छाजेड यांनी आभार मानले

# पेट्रोल फेकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारती विद्यापीठ परिसरात एका हॉटेलच्या बाहेर पंधरा-वीस तरुणांमध्ये वाद निर्माण होऊन मारहाणीची घटना घडते त्यावेळी हॉटेल चालक हॉटेलच्या बाहेर जाऊन भांडण करावीत हॉटेलमध्ये भांडण करू नये अशी विनंती करत असताना जमलेल्या टोळक्यांकडून, गुंडा कडून हॉटेल चालकाला बेदम मारहाण करण्यात आली. गुन्हेगारी टोळके एवढ्यावरच न थांबता काही वेळाने हॉटेल चालक ससून रुग्णालयात मेडिकलसाठी जात असताना त्याला रस्त्यातच अडून त्याच्या अंगावर बाटलीतील पेट्रोल फेकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला . सुदैवाने हॉटेल चालक व त्याचा मित्र तिथून पळाला मात्र त्याच्या गाडीवर या गुन्हेगारी टॉळक्यांकडून पेट्रोल टाकून त्याची गाडी पेटवून देण्यात आली.

याबाबत अमित खैरे या हॉटेल चालकांनी सविस्तर सांगितले की हॉटेलमध्ये काही टोळके एकमेकांना मारण्याचा प्रयत्न करत होते त्यांचा वाद विकोपाला जाणार होता हे लक्षात आल्यावर त्यांना बाहेर थांबण्याची विनंती केली त्यावेळी हॉटेलमध्ये नुकसान होऊ नये यासाठी मी त्यांना बाहेर जाण्याची विनंती केली परंतु त्यांनी मला घाणेरड्या पद्धतीने शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मी त्यांना विनंती करत असताना काही गुंडांनी मला मारण्याचा प्रयत्न केला. मला त्यांनी मारहाण केली त्यानंतर मी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे तात्काळ फोन करून कळवले असता त्यांनी मला ससून रुग्णालय येथे मेडिकल करण्यासाठी जाण्यास सांगितले. मी मेडिकल करण्यासाठी जात असताना माझ्या रस्त्यात दबा धरून बसलेले काही गुन्हेगार यांनी मला अडवले व आमच्या विरोधात तू गुन्हा दाखल करतो का? तुला आमची दहशत माहित नाही का?

असे बोलून त्यांनी माझ्या अंगावर पेट्रोलने भरलेली बाटली फेकली मी व माझा मित्र आमच्या अंगावर पूर्णपणे पेट्रोल पडले होते त्यातच त्यांच्यातील एकाने माचिसची एक काडी पेटून आमच्या अंगावर फेकली ती चुकून आम्ही रस्त्याने गाडी रस्त्यात टाकून पळत सुटलो होतो. गाडी सोडून आम्ही तेथून पळालो परंतु त्यांनी आमच्या गाडीवर पेट्रोल ओतून गाडी पूर्णपणे जाळून टाकली अशी फिर्याद अमित खैरे यांनी पोलीस ठाण्यात दिली आहे.

# रायसोनीच्या विद्यार्थ्यांना रतन टाटा इनोव्हेशन माइंड्स पुरस्कार



**पुणे :** जी एच रायसोनी स्किल टेक युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी अर्जुन शर्मा, देवांश सिंग, अर्पित मौर्य, आरुष सिंग यांनी ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीचे (एआयएसएसएमएस) अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे द्वारा आयोजित राष्ट्रीय स्तरावरील टेकाथॉन २.० स्पर्धेत उत्तम कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावरील दिवंगत रतन टाटा इनोव्हेशन पुरस्कार जिंकला. विजेत्यांना २५,००० रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेत एकूण १३०० विद्यार्थी आणि ३२० संघ सहभागी झाले होते. यातून एक हजार नवीन कल्पना नोंदणीकृत झाल्या, तर ३२० कल्पना अंतिम फेरीसाठी निवडल्या गेल्या होत्या. यात रायसोनी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट "वाहतूक सुरक्षा - मेट्रो शहरांभोवती महामार्गांवर अपघातांसाठी आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा वाढवणे" या समस्येचे निराकरण करण्यासाठीचा प्रोजेक्टद्वारे सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण कल्पना सादर करत वरील पुरस्कार जिंकला. रायसोनी एज्युकेशनचे अध्यक्ष सुनील रायसोनी आणि रायसोनी एज्युकेशनचे कार्यकारी संचालक श्रेयस रायसोनी व कुलगुरू डॉ. एम. यू. खरात यांनी सर्व विद्यार्थ्यांचे या यशाबद्दल अभिनंदन केले.

# वार्षिक सांस्कृतिक सप्ताह 'कारवाँ' जल्लोषात साजरा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एम.सी.इ.एस., डॉ.पी.ए.इनामदार विद्यापीठाचे एच.जी.एम. आझम कॉलेज ऑफ एज्युकेशन, येथे वार्षिक सांस्कृतिक सप्ताह- कारवाँ १७ ते २४ फेब्रुवारी या काळात अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सप्ताहामधे महाविद्यालयात विविध आकर्षक व नाविन्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.त्यामधे रांगोळी स्पर्धा,रील मेकिंग स्पर्धा, मेहंदी स्पर्धा,टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू स्पर्धा , पाककला, फनी गेम्स,ब्रायडल, केश रचना स्पर्धा,शायरी स्पर्धा, पुष्परचना स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या याशिवाय रेट्रो ,इंडो वेस्टर्न, मिक्स अँड मॅच, तसेच पारंपरिक वेशभूषा अशा विविध दिवसांचे आयोजन करण्यात आले होते यास विद्यार्थ्यांचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वर्षी प्राध्यापक व विद्यार्थ्यांकडून वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमास नावीन्य पूर्ण नावे मागवण्यात आली होती ज्यातून कारवाँ- द जर्नी टु चेरिश टॅलेंट हे नाव कार्यक्रमास देण्यात आले.

या कार्यक्रमासाठी डॉ. पी . ए.इनामदार विद्यापीठाचे कुलगुरू आदरणीय एम्. डी.लॉरेन्स सर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते व बिलबॉन्ग हायस्कूल च्या एच. आर.एक्झिक्युटिव्ह श्रीमती तेजश्री सोळंकी व मिरची मुरगा प्रँक कॉल फेम,स्टँडअप कॉमेडियन, रेडियो जॉकी श्री.राहुल वाल्हेकर या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते .तेजश्री यांनी बोलताना अभ्यासासोबतच महत्वपूर्ण असणाऱ्या सह अभ्यासक्रम ॲक्टिव्हिटी, स्पर्धांचे महत्व विषद केले.

तर राहुल यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील गुरुची महती सांगत विद्यार्थ्यांना त्यांच्या नैतिक जाबबादरीची जाणीव करून देत प्रोत्साहित केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या व शिक्षणशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता डॉ.अनिता बेलापूरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत केले. या शैक्षणिक वर्षाच्या जी.एम.सी. अध्यक्षा सहाय्यक प्राध्यापक डॉ. दिपाली मेहकरकर यांनी आभार प्रदर्शनाचे काम केले. विद्यार्थ्यांमध्ये अतिशय उत्साहाचे वातावरण होते.याच दिवशी वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय जल्लोषात असेम्ब्ली हॉल आझम कॅम्पस येथे पार पडला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व विविध कला गुणदर्शनाचा दुहेरी संगम या दिवशी पाहण्यास मिळाला.

# 'क्लायंट कौन्सिलिंग स्पर्धा-२०२५' ला चांगला प्रतिसाद

**पुणे :** भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेजमध्ये २५ आणि २६ फेब्रुवारीरोजी तृतीय' इन्ट्रा मल्टिलिंग्विस्टिक क्लायंट कौन्सिलिंग स्पर्धा 'आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा कॉलेजची मंथन समिती आणि आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली. सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी कायदेशीर ज्ञानाने समृद्ध उत्कृष्ट समुपदेशन कौशल्य दाखवले.निमिषा जैन हिने अमृत चषक जिंकून स्पर्धेत प्रथम स्थान मिळवले. पहिल्या उपविजेत्या बरीन जहेरा हिला कल्पवृक्ष चषक प्रदान करण्यात आला. दुसऱ्या उपविजेत्या निनाद गोळे याने कौस्तुभ चषक जिंकला, तर कमल किशोर याने ऐरावत चषक मिळवला.सान्या ओबेरॉय हिला केशव चषक, तर राघव अग्रवाल याला माधव चषक प्रदान करण्यात आला. भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. उज्वला बेंडाळे आणि मंथन समितीने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# लेखनाच्या माध्यमातून महिलांचे अव्यक्त जग उलगडले

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महिला साहित्यिकांचा सन्मान




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महिला लेखकांनी केवळ महिला किंवा त्यांच्या समस्येविषयी लिहायला पाहिजे असे नाही. महिलांचे जग वेगळे आहे. महिलांनी निम्मे अवकाश व्यापले आहे परंतु या अवकाशाची कल्पना कोणालाही नाही. महिला लिहितात त्याला खूप आयाम असतात. महिलांना गृहीत धरले जात होते परंतु लेखनाच्या माध्यमातून त्यांचे अव्यक्त जग उलगडत आहे, असे मत खासदार मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

मानाचा चौथा गणपती श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने मंडळाच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आणि मराठी भाषा गौरव दिनानिमित्त साहित्य क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल महिला साहित्यिकांचा सन्मान करण्यात आला. टिळक रस्त्यावरील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ अनुवादिका उमा कुलकर्णी, शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षाचे स्वागताध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मंडळाचे अध्यक्ष विकास पवार, कोषाध्यक्ष नितीन पंडित, विनायक कदम महिला विश्वस्त अभिनेत्री वाळके उपस्थित होत्या.

स्नेहा अवसरीकर, वसुंधरा काशीकर, विनया खडपेकर, चित्रलेखा पुरंदरे, डॉ.स्मिता डोळे, ऋता पंडित या महिला साहित्यिकांचा सन्मान यावेळी करण्यात आला. प्रा. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, मुलांना कोणत्याही भाषेच्या शाळेत टाका, परंतु घरी मराठीतच बोला. आपल्या भाषेवर आपण प्रेम करायला पाहिजे त्या सोबतच इतर भाषांमधील साहित्य देखील वाचायला पाहिजे, असे त्यांनी यावेळी सांगितले.



> मुलांना कोणत्याही भाषेच्या शाळेत टाका, परंतु घरी मराठीतच बोला. आपल्या भाषेवर आपण प्रेम करायला पाहिजे त्या सोबतच इतर भाषांमधील साहित्य देखील वाचायला पाहिजे, त्यासाठी त्यांच्या पालकांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.
> **— प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी,** खासदार राज्यसभा

# लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी!

## वैविध्यपूर्ण कार्यक्रमातून मराठीचा जागर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी तसेच मराठी संस्कृतीचे जतन व्हावे यासाठी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने गुरूवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने सुरुवात झाली. यामध्ये महाराष्ट्रातील बोली भाषांमधील गीते सादर करण्यात आली. त्यानंतर 'सुलेखन' या मराठी भाषेतील अक्षरांना स्वभाव देणाऱ्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. सुप्रसिद्ध सुलेखनकार शरद कुंजीर यांनी उपस्थितांना याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. शिवचरित्र किर्तनकार ज्ञानेश्वरी ढगे यांच्या सुश्राव्य किर्तनाचा कार्यक्रमात पार पडला . व्याख्याते डॉ. शिवप्रसाद महाले यांचे 'युवा शक्तीची स्वर्णिम भारताकडे वाटचाल' या विषयावर युवांना प्रेरणादायी ठरणारे व्याख्यान अत्यंत मार्गदर्शक होते. राष्ट्रीय भारूडकार हमीद अमीन सय्यद यांच्या पारंपरिक लोककलेचा अविष्कार असलेल्या भारुडाने कार्यक्रमाने सांगता झाली.



**माझ्या मराठी मातीचा...!:** पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमाचे उद्घाटन विधानपरिषद आमदार अमित गोरखे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. या कार्यक्रमची सुरुवात राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत गायन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.



**भारताचे स्वर्णिम भविष्य, नव युवकांच्या हातात...! :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्त डॉ. शिवप्रसाद महाले यांचे 'युवा शक्तीची स्वर्णिम भारताकडे वाटचाल' हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



**शब्दांना भाव देणारी कला...! :** मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयोजित विशेष कार्यक्रमात सुलेखनकार शरद कुंजीर यांच्या शब्दांना भाव देणारी कला 'सुलेखन' चे सादर करण्यात आले.

## नियमबाह्य शाळांवर हवी कारवाई

### शहर काँग्रेसची मागणी

मनपा प्रशासनाकडून वारंवार मागणी करूनही माहिती लपवली जात आहे २०२४ पासून महानगरपालिका शिक्षण मंडळ प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहे शिक्षण मंडळ प्रशासन अधिकाऱ्यांनी वारंवार नोटीस काढूनही, सुनावणी लावून ही त्यास अनुपस्थित राहणे, माहिती लपवणे, मागवलेली माहिती अपुऱ्या स्वरूपात आणि दिशाभूल करणाऱ्या स्वरूपात पाठवणे, असे प्रकार निदर्शनास आले आहेत.







"महापा मनपाच्या शिक्षण विभागाचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांना निवेदन दिले आहे. येत्या काही दिवसात या गैरप्रकारांबद्दल संबंधित शाळांची मान्यता रद्द करण्याचे प्रस्ताव शिक्षण विभागाच्या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात आले नाहीत तर याबाबत सातत्याने जन आंदोलन केले जाईल. -

**- नरेंद्र बनसोडे**
वरिष्ठ उपाध्यक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील नियमबाह्य कारभार करणाऱ्या बेजबाबदार शाळांवर कारवाईची मागणी शहर काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

नागरिकांना आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सुरू होत आहे, मागील काही घटना पाहता शहरात अनेक शाळा ह्या बेकायदा आणि अनधिकृत कारभार करणाऱ्या असलेल्या यापूर्वीच आढळल्या गेल्या आहेत त्यांच्यावर फौजदारी गुन्हे देखील दाखल झालेले आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर शाळांची प्रशासकीय पारदर्शकता पडताळणी साठी मागील आठ-दहा महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करत असणारे शहर काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांनी याबाबत पत्राद्वारे सविस्तर माहिती देत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांना शाळांना मनपा प्रशासनाकडून वारंवार मागणी करूनही माहिती लपवली जात आहे.

काही शाळांकडून अपुरी आणि चुकीची माहिती सादर केली जात आहे. बेकायदेशीर प्रचंड वाढीव फी घेत नागरिकांना लुटले जात आहे, प्रशासकीय सुनावनीस देखील शाळा उपस्थित राहत नाहीत.

### हा तर फसवणुकीचा धंदा ..

जानेवारी महिन्यापासूनच इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे प्रवेश सुरू होतात. दरवर्षी शहरातील अनधिकृत शाळांच्या संख्येत भरच पडत आहे. शासनाची कोणतीही परवानगी न घेता संबंधितांनी आपल्या शाळा बिनबोभाट सुरूच ठेवल्या आहेत. या अनधिकृत शाळा बंद करण्यासाठी संबंधितांना दरवर्षी नोटीसही बजावल्या जातात. पालकांकडून या शाळा वारेमाप फी गोळा करून त्यांची फसवणूक करतात.

### अनेक गैरप्रकार सर्रास सुरू आहेत ...

- शाळांकडून सातत्याने अपारदर्शक प्रवेश प्रक्रिया राबवणे
- बेकायदेशीर रित्या प्रचंड शुल्क उकळून नागरिकांची आर्थिक पिळवणूक करणे
- प्रशासकीय नियमांची सर्रास पायमल्ली करणे
- शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रशासन न राबवता मनमानी पद्धतीने प्रशासन राबवणे
- विद्यार्थ्यांना सुरक्षा सुविधांनी सुद्धा परिपूर्ण न ठेवणे
- काही शाळांकडून अपुरी आणि चुकीची माहिती सादर
- बेकायदेशीर प्रचंड वाढीव फी घेत नागरिकांना लुटले जात आहे
- प्रशासकीय सुनावनीस देखील शाळांची अनुपस्थिती

## एमआयडीसीचा विकास रखडलेलाच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव :** तळेगाव परिसरातील जागेला उद्योगांची वाढती मागणी लक्षात घेऊन एमआयडीसीने तळेगाव येथील औद्योगिक क्षेत्र विविध टप्प्यांमध्ये विकसित केले. जनरल मोटर्स कंपनीच्या जागेवर हुंदाई कंपनी सुरू झाल्यानंतर या क्षेत्रात अनेक उपकंपन्या आणि सहाय्यक युनिट्स येण्यासाठी उत्सुक आहेत. सुमारे आठ वर्षांपूर्वी म्हणजेच १३ मे २०१७ रोजी काढलेल्या राजपत्रानुसार निगडे औद्योगिक क्षेत्र तळेगाव एमआयडीसी टप्पा क्रमांक चारसाठी २,३९० हेक्टर क्षेत्र अधिसूचित करण्यात आले होते.

शेतकऱ्यांच्या हरकती व भूमिअभिलेख विभागाकडून आलेला मोजणी नकाशा व विवरण पत्रानुसार चार गावांतील जमीन संपादनाची अंतिम अधिसूचना ३२(१) च्या तरतुदी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव ३ नोव्हेंबर २०२० रोजी सरकारकडे पाठविण्यात आला. तत्पूर्वी स्थानिकांनी एमआयडीसीला विरोध केला. त्यानंतर पत्रव्यवहार व अधिकाऱ्यांबरोबर समाधानकारक चर्चेनंतर शेतकरी आणि स्थानिकांनी समन्वयाची भूमिका घेतली. २७ डिसेंबर २०१८ रोजी भूसंपादनासाठी एकरी ७३ लाख रुपये तर; प्रति हेक्टरी १ कोटी ८२ लाख ५० हजार असा दरही निश्चित करण्यात आला. मात्र, कल्हाट व निगडे ही गावे पश्चिम घाट पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रातील असल्याने जमीन अधिग्रहण प्रक्रिया रखडली.

मावळ तालुक्यातील प्रस्तावित तळेगाव एमआयडीसी (निगडे) टप्पा क्रमांक चारसाठी आंबळे, निगडे, कल्हाट व पवळेवाडी ही चार गावे अधिसूचित करण्यात आली आहेत. त्यातील सुमारे दोन हजार हेक्टर क्षेत्रापैकी निगडे व कल्हाट या दोन गावांतील सुमारे दीड हजार हेक्टर क्षेत्र पश्चिम घाट पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील (इको सेन्सिटिव्ह झोन)च्या कचाट्यात अडकले आहे. परिणामी, चौथ्या टप्प्याचा विकास व औद्योगिकीकरण रखडले आहे. या दोन्ही गावांतील सुमारे सोळाशे शेतकरी गेल्या आठ वर्षांपासून मोबदल्याच्या प्रतीक्षेत आहेत.

### शेतकऱ्यांची मागणी

- एकीकडे मोबदला नाही, तर दुसरीकडे सात-बारा उताऱ्यावर एमआयडीसीचे शिक्के असल्याने जमीन विकसित करता येत नाही, अशा दुहेरी चक्रव्यूहात सापडलेल्या या शेतकऱ्यांचे भवितव्य केंद्रीय पर्यावरण मंत्रालयावर अवलंबून असल्याने त्यांचा जीव टांगणीला लागला आहे. राज्य व केंद्र सरकारने समन्वयातून हा 'इको सेन्सिटिव्ह झोन'चा पेच सोडवून न्याय मिळवून द्यावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

## शिवशंभो कार्यभूषण पुरस्कार प्रदान सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शिवशंभो फाउंडेशन आयोजित महाशिवरात्री महोत्सव २०२५ अंतर्गत शिवशंभो कार्यभूषण पुरस्कार माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार यांना बुधवारी शिवशंभो मंदिर प्रांगण, शाहूनगर, चिंचवड येथे प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर विधानपरिषद आमदार उमा खापरे, पिंपरी - चिंचवड नवनगर प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, शिवशंभो फाउंडेशनचे संस्थापक केशव घोळवे, अध्यक्ष संजय तोरखडे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्योजक महेंद्र पाटील आणि उद्योजिका सिंधू बंडगर यांना शिवशंभो कार्यगौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

पुरस्कारार्थींनी मनोगतातून कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी महाशिवरात्री महोत्सव २०२५ अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस आणि प्रशस्तिपत्रक प्रदान करून सन्मानित करण्यात आले.फाउंडेशनचे संस्थापक केशव घोळवे यांनी प्रास्ताविक केले. शिवशंभोचे सर्व पदाधिकारी, युवा मंच कार्यकर्ते व महिला मंडळ यांनी संयोजनात परिश्रम घेतले. राजेंद्र पवार यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले.



## धर्मरक्षणासाठी संभाजीराजेंचे चरित्र अंगीकारा : ॲड. निकम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगवी :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या आत्मार्पण दिनानिमित्त निगडी प्राधिकरणातील स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आले. ज्येष्ठ विधिज्ञ पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम यांच्या हस्ते ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, निगडी येथे बुधवारी हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.



याप्रसंगी सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. हरि शंकर जैन आणि विधिज्ञ ॲड. विष्णु शंकर जैन या पितापुत्रांना यंदाचा स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले; तसेच हिंदुत्ववादी सामाजिक कार्यकर्त्या मीरा अ. कडबे यांनाही स्वातंत्र्यवीर सावरकर राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाचे अध्यक्ष विश्वनाथन नायर, कार्याध्यक्ष रमेश बनगोंडे, सचिव सागर पाटील यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

हिंदुत्व आणि हिंदू धर्मासाठी अनेक वर्षांपासून कायदेशीर संघर्ष करणारे ॲड. हरि शंकर जैन आणि ॲड. विष्णु शंकर जैन या पितापुत्रांना एक लक्ष रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह प्रदान करून राष्ट्रीय पारितोषिक पुरस्काराच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला; तर विदर्भ प्रांतात लव्ह जिहाद, कौटुंबिक हिंसाचार, नारी सुरक्षितता यासाठी सुमारे चौतीस वर्षांपासून कार्यरत असलेल्या मीरा अ. कडबे यांना एकावन्न हजार रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांच्या कार्याचा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मान करण्यात आला.



"धर्मरक्षणासाठी संभाजीराजे यांचे चरित्र अंगीकारले पाहिजे. जोपर्यंत पाल्यांशी मैत्रीपूर्ण सुसंवादाची भूमिका नसेल, तोपर्यंत लव्ह जिहाद होत राहतील. आत्मविश्वास हा संघर्ष करण्याचे बळ देतो. न्यायालयात फौजदारी स्वरूपाचे खटले मी लढवत असलो तरी हिंदुत्वाच्या कायदेशीर लढाईसाठी कटिबद्ध आहे!'

**— ॲड. उज्ज्वल निकम**
ज्येष्ठ विधिज्ञ

## नदीपात्रात राडारोडा टाकणारा टेम्पो पकडला; सुरक्षारक्षकाचा युवासेनेकडून सत्कार



**फुगेवाडी :** येथील नदीपात्रात राडारोडा टाकणारा टेम्पो सुरक्षारक्षकाने पकडून दिला आहे. सुरक्षारक्षक विनोद शिंदे यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या भरारी पथकाने हा टेम्पो जप्त करत कारवाई केली आहे. फुगेवाडी येथील हिंदू स्मशानभूमीत सैनिक कंपनीचे सुरक्षारक्षक विनोद शिंदे हे ड्युटीवर होते. त्यावेळेस एका मोठ्या टेम्पो मधून कचरा, राडारोडा नदीच्या पात्रात टाकण्यात येत होता. त्यावेळेस विनोद शिंदे यांनी त्या टेम्पो चालकाला विचारणा केली, तुम्ही कचरा राडारोडा नदीच्या पात्रात का टाकता? त्यावेळेस त्या टेम्पोतील तिघा चौघांनी त्यांना शिवीगाळ केली, दमदाटीही केली. विनोद शिंदे यांनी याबाबत आरोग्य विभागाकडे तक्रार केली. पर्यावरण विभागाने तात्काळ फ्लाईंग स्क्वाड घटनास्थळी पाठवला. त्यानंतर या पथकाने हा राडारोडा टाकणारा टेम्पो जप्त केला आहे. विनोद शिंदे यांच्या चांगल्या कार्यामुळे आरोग्य विभाग व युवासेना, शिवसेना शाखेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळेस आरोग्य अधिकारी सचिन जाधव, मुकादम सतीश घोलप, प्रकाश खंडागळे, युवासेना पिंपरी चिंचवड शहर संघटक निलेश हाके व शिवसैनिक उपस्थित होते.

## गणेश इंटरनॅशनल स्कूलला सीबीएसईची मान्यता


**दापोडी :** दापोडीतील गणेश इंटरनॅशनल स्कूलला केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची (सीबीएसई ) अधिकृत मान्यता सीबीएसई मान्यता क्रमांक: 1131459 नुकतीच प्राप्त झाली आहे. ही मान्यता १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०३० या कालावधीसाठी देण्यात आली असून, शाळेच्या शैक्षणिक प्रवासातील हा एक मोठा महत्त्वाचा टप्पा आहे. या मान्यतेसाठी एस. एस. पी. ग्रुप ऑफ इंस्टीट्यूटचे अध्यक्ष एस. बी. पाटील यांचे अमूल्य योगदान आहे. या यशाचे श्रेय संस्थेचे संचालक एस .बी. पाटील, संस्थेचे विश्वस्त गणेश पाटील, आकाश पाटील, मंगेश पाटील, सचिव चंद्रकांत पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रकाश गायकवाड, सहयोगी संचालक सुनील शेवाळे , शाळेच्या मुख्याध्यापिका सिओना त्रिभुवन यांना जाते.



## राडारोडा पडून असल्याने अपघाताचा धोका

**पिंपरी :** इंदिरानगर भागात सांडपाण्याच्या चेंबरच्या दुरुस्ती करण्यात आली. या दरम्यानचा राडारोडा महिनाभरापासून रस्त्याकडेला पडून आहे. येथून दुचाकी घसरून अपघात होण्याचा आहे. काही चेंबरच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले आहे व अजून काही चेंबर बाकी आहेत. या कामात निघालेली खडी, माती व राडारोडा हटवण्याची जबाबदारी प्रशासन किंवा ठेकेदाराने घेतलेली नाही. त्यामुळे परिसर अस्वच्छ दिसत आहे. स्थानिक रहिवाशी विश्वनाथ धनवे यांनी या परिस्थितीची दखल घ्यावी. तसेच, भविष्यात असे प्रकार पुन्हा होऊ नयेत यासाठी कठोर उपाययोजना करण्यात याव्यात, अशीही मागणी केली आहे. याबाबत विचारणा केली असता, "संबंधित ठिकाणचा राडारोडा लवकरच उचलला जाईल," असे आश्वासन 'ब' क्षेत्रीय कार्यालय उपअभियंता दीपक करपे यांनी दिले.

## एलबीटी ची २८०० कोटी थकबाकी पाण्यात



**चिंचवड :** राज्य सरकारने महापालिकांना स्थानिक संस्था कर विभाग (एलबीटी) बंद करण्याचा आदेश दिला आहे. या आदेशामुळे पुणे महापालिकेच्या हद्दीतील व्यापाऱ्यांकडे असलेली २०० कोटी रुपयांची, तर पिंपरी-चिंचवडमधील उद्योजक, व्यापाऱ्यांकडे असलेल्या २८०० कोटी रुपयांच्या थकबाकीचा प्रश्न निर्माण झाला आहे. केंद्र शासनाने देशात वस्तू व सेवाकराची अंमलबजावणी १ जुलै २०१७ पासून सुरू केल्यामुळे जकात, स्थानिक संस्था कर रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे हा विभाग बंद करण्याचा आदेश राज्य सरकारने दिला आहे. मात्र, दोन्ही महापालिका हद्दीतील व्यापाऱ्यांकडे स्थानिक संस्था कराची कोट्यवधी रुपयांची थकबाकी आहे. हा विभाग बंद झाल्यास या थकबाकीवर पाणी सोडावे लागण्याची भीती दोन्ही महापालिकांच्या अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. पुणे महापालिकेची एलबीटीची २०० कोटी रुपयांची, तर पिंपरी-चिंचवड महापालिकेची २८०० कोटी रुपयांची थकबाकी शहरातील व्यापारी, उद्योजकांकडे आहे.

संपादकीय विशेष

# पाण्याच्या समस्येचे नवे रुप

अलिकडेच समोर आलेल्या एका अभ्यासानुसार भारत, अल्जेरिया, पाकिस्तान, सौदी अरेबिया, इटली, स्पेन, मेक्सिको, अमेरिका, ट्युनिशिया, इराण आदींसह जगातील १५६ देशांच्या भूजलात सल्फेटचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. भूजलात सल्फेटचे प्रमाण जास्त असल्याने सुमारे सात कोटी लोकांना पोटासंबंधीचे आजार जडले आहेत. अभ्यासानुसार, जगातील सुमारे १९४ दशलक्ष लोक प्रति लीटर २५० मिलीग्रॅमपेक्षा जास्त सल्फेट असलेल्या पाण्याच्या संपर्कात आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने हे मान्य केले आहे. 'हाँगकाँग युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी' या अहवालानुसार, जगातील १.७० कोटी लोक प्रति लिटर ५०० मिलीग्रॅमपेक्षा जास्त सल्फेट असलेले पाणी पीत आहेत. यातील ८२ टक्के लोक भारत, अमेरिका, मेक्सिको, स्पेनसह दहा देशांमध्ये राहतात. संशोधकांच्या मते सल्फेटयुक्त पाणी आरोग्यासोबतच पर्यावरणासाठीही घातक ठरते. सल्फेटमुळे पाईप गंजतात. एवढेच नाही, तर ते फॉस्फरससारखे पोषक घटक काढून पर्यावरणाला हानी पोहोचवते. याव्यतिरिक्त, हवामानबदल आणि शहरीकरणामुळे सल्फेटचे प्रमाण वाढले असून त्याचा जागतिक स्तरावर पाण्याच्या गुणवत्तेवर गंभीर परिणाम होत आहे.

भारतातील बहुतांश लोकसंख्या पिण्याच्या पाण्यासाठी भूजलावर अवलंबून आहे. २०५० पर्यंत पाण्याची मागणी २५ टक्क्यांहून अधिक वाढेल. भूजल शोषणाच्या बाबतीत आपला देश अव्वल आहे हे सर्वश्रुत आहे. देशाच्या उत्तर गंगेच्या प्रदेशातील भूजल कमी होण्याच्या मार्गावर आहे. देशाची राजधानी दिल्लीसह देशातील अनेक शहरे 'डार्क झोन'मध्ये आहेत. 'एनसीआर'मधील तीव्र पाणीसंकट हा याचा जिवंत पुरावा आहे. भूजलाच्या बाबतीत पंजाबमधील परिस्थिती सर्वात गंभीर आहे, कारण तेथील ९४ टक्के लोक पिण्याच्या पाण्यासाठी भूजलावर अवलंबून आहेत. त्यामुळे भूजलात जड धातू आणि किरणोत्सर्गी पदार्थांची उपस्थिती झपाट्याने वाढली. पंजाबप्रमाणे हरियाणाही मागे नाही. हरियाणामध्ये भूजल उपसा १३७ टक्क्यांहून अधिक आहे, तर देशातील भूजल उपसा ६३ टक्के आहे. देशातील सर्वात मोठे राज्य असलेल्या उत्तर प्रदेशमधील दहा महानगरे अतिशोषितांच्या श्रेणीत आहेत. आर्सेनिक, नायट्रेट, सोडियम, युरेनियम, फ्लोराईड इत्यादींच्या अतिरेकामुळे भूगर्भातील पाणी मानवी आरोग्यासाठी तसेच सिंचनासाठी हानिकारक ठरत आहे. आंध्र प्रदेश, राजस्थान, पंजाब, हरियाणा, गुजरात आणि उत्तर प्रदेशमधील १२.५ टक्के भूजल नमुने उच्च सोडियमच्या उपस्थितीमुळे सिंचनासाठी योग्य नसल्याचे आढळले आहे.

देशातील ४४० जिल्ह्यांमधील भूजलातील नायट्रेटच्या वाढत्या पातळीमुळे आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत. एका अहवालानुसार ९.०४ टक्के पाण्याच्या नमुन्यांमध्ये फ्लोराईडची पातळी सुरक्षित मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आणि पाण्याच्या ३.५५ टक्के नमुन्यांमध्ये आर्सेनिक आढळून आले. राजस्थान, कर्नाटक, तामिळनाडूमध्ये ४० टक्क्यांहून अधिक नमुने सुरक्षित मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. पाण्यातील नायट्रेटची पातळी महाराष्ट्रामध्ये ३५.७४, तेलंगणामध्ये २७.४८, आंध्र प्रदेशमध्ये २३.५ आणि मध्य प्रदेशमध्ये २२.५८ टक्क्यांपेक्षा जास्त नोंदवली गेली आहे तर हरियाणा, तामिळनाडू, आंध्र प्रदेशमध्ये ही पातळी सातत्याने वाढत आहे. हे प्रदूषण पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्य या दोन्हीसाठी हानिकारक आहे. त्यामुळे कॅन्सर, किडनी, हाडे, त्वचारोगांचा धोका झपाट्याने वाढत आहे. नवजात बाळासाठी ते जीवघेणे ठरले आहे. उद्योगांमधून बाहेर पडणाऱ्या दूषित पाण्यावर प्रक्रिया करण्याची व्यवस्था नसणे, शेतीतून जास्तीत जास्त उत्पादन मिळवण्याच्या हव्यासापोटी खतांचा अंदाधुंद वापर, वाढते शहरीकरण, सांडपाण्याची गळती, घरगुती कचरा आणि कचऱ्याचे डोंगर यामुळे देशातील भूजलाच्या दर्जात झपाट्याने घट होत आहे.

जगातील सुमारे एक चतुर्थांश भूजल भारताकडून वापरले जाते. देशाच्या कृषी उत्पादकतेत लक्षणीय वाढ व्हावी, यासाठी खते आणि कीटकनाशकांचा व्यापक वापर करण्यात आला. १९५० च्या दशकापासून भारताने मोठ्या प्रमाणात भूजल उपसण्यासाठी प्रोत्साहन देत अनुदान दिले. त्यामुळे खोदलेल्या कूपनलिकांची संख्या दहा लाखांवरुन तीन कोटींपर्यंत वाढली. अलिकडच्या वर्षांमध्ये सघन भूजल वापरामुळे जलद औद्योगिकीकरण साध्य झाले आहे. हरित क्रांतीने अन्नसुरक्षेत कमालीची सुधारणा केली आणि २००६ आणि २०१६ च्या दरम्यान अलीकडील आर्थिक विस्तारामुळे २७१ दशलक्ष लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यास मदत झाली; पण त्यामुळे भूजल पातळीही घसरली, हे लक्षात घ्यायला हवे.

जागतिक बँकेच्या म्हणण्यानुसार, भूजलाची भरपाई होण्यापेक्षा जलद गतीने शोषण केले जात आहे. त्यामुळे भारतातील ६० टक्के जिल्हे दोन दशकांमध्ये भूजल कमी होण्याच्या गंभीर पातळीपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. भारतीय जिल्ह्यांचा आणखी एक अभ्यास दर्शवतो, की त्यापैकी ६० टक्के भूजल आधीच संपलेले, दूषित किंवा दोन्हीही आहे. यामुळे देशातील शेतकऱ्यांपुढे एक गंभीर संकट उभे राहिले आहे. ते भूजलावर अवलंबून आहेत. भारतात वापरल्या जाणाऱ्या भूजलापैकी सुमारे ९० टक्के पाणी पिकांना सिंचनासाठी वापरले जाते. शेतकरी मौल्यवान पाण्याच्या शोधात आणखी खोलवर जात आहेत. तथापि, बहुतेक लहान शेतकऱ्यांसाठी हा एक व्यवहार्य पर्याय नाही. अलिकडच्या वर्षांमध्ये अनेक शेतकऱ्यांनी शहरांकडे स्थलांतर केले आहे. भूजलतज्ज्ञ डॉ. वीणा श्रीनिवासन यांच्या मते, भारतातील पाण्याचे वाढते संकट हे शहरी भागात मोठ्या प्रमाणावर स्थलांतराचे प्रमुख कारण आहे; परंतु त्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. शहरात नवीन जीवन सुरू करण्यासाठी शेती सोडणाऱ्यांपैकी अनेकांनी आता आपली नोकरी गमावली आहे आणि त्यांना पुन्हा खेड्याकडे ढकलले जात आहे; परंतु प्रश्न असा आहे की ते आता स्वतःचे पोट कसे भरतील? खेड्यांमध्ये राहणारे सुमारे ७०० दशलक्ष भारतीय दैनंदिन गरजांसाठी भूजलावर अवलंबून असून ८५ टक्के ग्रामीण कुटुंबे भूजलावर अवलंबून आहेत. शहरांमध्ये हे प्रमाण ४५ टक्के आहे. भारताने भूजलाची स्थिती अधिक गांभीर्याने घेण्यास सुरुवात केली पाहिजे. ही केवळ पाण्याची समस्या नाही, तर उपजीविकेची समस्या असून आणखी बिकट होणार आहे. भारताने भूजलाची स्थिती अधिक गांभीर्याने घेतली पाहिजे. ही केवळ पाण्याची समस्या नाही, तर उपजीविकेची समस्या आहे आणि ती आणखी बिकट होणार आहे.

# रेवडी संस्कृतीवर प्रहार

**भाजपा आणि दस्तुरखुद्द नरेंद्र मोदी जाहीर सभांमधून रेवडी संस्कृतीवर टीका करत. मात्र आता तेच निवडणुकांमध्ये रेवडी संस्कृतीचा पुरस्कार करतात. दुसरीकडे, निवडणूक आयोगाची याबाबतची भूमिका दुसऱ्यांवर जबाबदारी ढकलण्याची आहे. परिणामी, ही सवंग लोकप्रियता मिळवण्याची क्लृप्ती देशभर चर्चेत रहात आहे. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत अनेकदा नाराजी व्यक्त करूनही गांभीर्याने दखल का घेतली जात नाही?**

नोंद

शिवाजी कराळे, विधिज्ञ



सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने रेवडी संस्कृतीवर केलेले भाष्य राजकीय पक्षांच्या डोळ्यांमध्ये अंजन घालणारे आहे. लोकांना चांगल्या सवयी लावण्याची जबाबदारी असणाऱ्या राजकीय पक्षांनी तर याबाबतीत कंबरेचे सोडले आहे. भारताच्या महालेखा नियंत्रकांनी अनेकदा मोफतच्या संस्कृतीमुळे राज्यांच्या तिजोऱ्यांवर कसा दबाव येतो आणि कल्याणकारी योजना तसेच पायाभूत सुविधांना पैसे कसे उरत नाहीत, यावर कठोर टिप्पण्या केल्या आहेत. वित्तीय तूट वाढत चालली असताना राज्यांना अनेक योजना बंद कराव्या लागत आहेत. पायाभूत सुविधांची कामे निधीअभावी ठप्प झाली आहेत, दुसरीकडे मोफत धान्य, दरमहा रोख रक्कम अशा योजनांमुळे लोकांना फुकटची सवय लागत आहे. ती अतिशय वाईट आहे. लोकांचे कल्याण झाले पाहिजे, त्यांच्या राहणीमानाचा दर्जाही उंचावला पाहिजे, याबाबत दुमत नाही; परंतु मोफत मिळते असल्यास कष्ट कशाला करायचे, अशी वृत्ती दुर्दैवाने निर्माण होत आहे. लोक आळशी बनत आहेत. ग्रामीण भागात शेतीला जसे मजूर मिळत नाहीत तसेच शहरी भागातही छोट्या मोठ्या कामांना मजूर मिळत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने अलिकडील एका सुनावणीच्या वेळी नेमके त्यावर बोट ठेवले. मागे याच खंडपीठाने महाराष्ट्र सरकारच्या 'लाडकी बहीण योजने'वरही अप्रत्यक्ष टीका केली होती. मोफत सुविधा आणि थेट निधी उपलब्ध करून देणाऱ्या योजना लोकांना आळशी बनवत आहेत. एका याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणाचा राजकीय पक्षांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे.

आज परिस्थिती अशी आहे की काही उद्योगांमध्ये कामगारांच्या कमतरतेच्या तक्रारी आहेत. काहीजण सर्वोच्च न्यायालयाच्या टिप्पणीवर काही 'किंतु-परंतु' व्यक्त करतील; परंतु काहीही न करता लोकांना पैसे किंवा फुकट सुविधा दिल्या गेल्यास काही लोक काम टाळतील, या वस्तुस्थितीपासून आपण दूर जाऊ शकत नाही. शेवटी धान्य, वीज, पाणी आणि रोख रकमेसह इतर सुविधा मोफत मिळतील, तेव्हा त्यांना काम करायला का आवडेल, असा सर्वोच्च न्यायायाचा निरुत्तर करणारा प्रश्न होता. सर्वोच्च न्यायालय लोककल्याणकारी योजनांच्या उपयुक्ततेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण करत असल्याचा कोणताही निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल, कारण लोकांना गटांमध्ये विभागण्यापेक्षा मुख्य प्रवाहाचा भाग बनवणे चांगले आहे, असे म्हटले आहे.

दुर्बल लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी योजना चालवल्या पाहिजेत. लोकांच्या उत्पन्नात वाढ करून स्वावलंबी बनण्यास मदत करणाऱ्या योजनांना प्रोत्साहन दिले पाहिजे. ते स्वतःच्या आणि देशाच्या आर्थिक उन्नतीसाठी उपयुक्त ठरू शकते. सध्या लोककल्याण आणि गरिबी निर्मूलनाच्या नावाखाली अशा अनेक योजना चालवल्या जात आहेत, ज्या लोकांना आर्थिकदृष्ट्या त्यांच्या पायावर उभे राहण्यास प्रवृत्त करत नाहीत. दुर्बल घटकांना त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी मदत करण्याऐवजी अशा योजना त्यांना परावलंबी बनवतात. लोकांना कायमस्वरूपी सरकारी योजनांवर अवलंबून ठेवणे म्हणजे त्यांना पंगू करणे होय. गरीब मच्छीमाराला मासे देण्यापेक्षा मासे पकडण्यास सक्षम करणे अधिक चांगले आहे, हे आपल्या धोरणकर्त्यांनी समजून घेतले तर बरे होईल. सर्वोच्च न्यायालयाने कोणतेही आदेश वा निर्देश न देता केवळ रेवडी योजनांवर भाष्य केले आहे, हे खरे असले तरी त्यामुळे त्याचे गांभीर्य कमी होत नाही. मत मिळवण्यासाठी राजकीय पक्षांनी मोफत योजना जाहीर करणे योग्य नसल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. दुर्दैवाने त्याचा राजकीय पक्षांवर काहीही परिणाम झालेला नाही. उलट, अशा योजना जाहीर करण्याची स्पर्धा त्यांच्यात लागली होती. शहरी बेघरांना आश्रय देण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर अलिकडेच झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूत भूषण गवई यांनी राजकीय पक्षांच्या खोडसाळ योजनांवर निशाणा साधला. ते म्हणाले की लोकांना परजीवी बनवण्याऐवजी समाजाच्या मुख्य प्रवाहाशी जोडणे चांगले होईल; जेणेकरून ते देशाच्या कल्याणासाठीही योगदान देऊ शकतील.

सर्वोच्च न्यायालयाच्या या टिप्पणीनंतर 'रेवडी संस्कृती' आणि मोफत योजनांबाबत देशभर चर्चा सुरू आहे. ई. आर. कुमार विरुद्ध केंद्र सरकार या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. हा खटला शहरांमध्ये घरे नसलेल्या लोकांसाठी निवारा सुनिश्चित करण्याशी संबंधित आहे. ऑक्टोबर 2022 मध्ये या प्रकरणावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना शहरी बेघरांसाठी आश्रयस्थानांशी संबंधित स्थिती अहवाल दाखल करण्यास सांगितले होते. गेल्या वष सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणा, पंजाब, दिल्ली, जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि बिहार या राज्यांकडून हिवाळ्यात शहरी बेघरांसाठी केलेल्या तात्पुरत्या व्यवस्थेची माहिती मागवली होती. तीन डिसेंबर रोजी प्रशांत भूषण यांनी या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सांगितले होते की दिल्लीतील निवारागृहांमध्ये केवळ 17 हजार लोकांना राहण्यासाठी जागा आहे. ही क्षमता दोन लाखांपेक्षा जास्त लोकांसाठी असावी.

निवारागृहांमध्ये बेघरांना कोणत्या सुविधा दिल्या जाणार आहेत, हे स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र सरकारकडून दाखल करण्यात आले. या मुद्द्यावरून न्या. गवई संतप्त झाले. या मुद्द्याला सरकारच्या मोफत योजना देण्याच्या धोरणाशी जोडत त्यांनी एकापाठोपाठ एक प्रतिक्रिया दिल्या. या प्रकरणात स्वत: वकील प्रशांत भूषण यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडताना सांगितले, की देशात कोणीही काम करू इच्छित नाही. आपला वैयक्तिक अनुभव सांगताना न्यायमूत म्हणाले, 'मी शेतकरी कुटुंबातून आलो आहे. निवडणुकीपूव जाहीर झालेल्या मोफत योजनांमुळे आता महाराष्ट्रात शेतकऱ्यांना मजूर मिळत नाहीत. प्रत्येकाला घरी बसून मोफत गोष्टी मिळत आहेत.' सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेशाच्या योजनेवर निशाणा साधला.

'लाडली बहन योजना' मध्य प्रदेशात लागू केली गेली. या योजनेअंतर्गत विवाहित, विधवा, घटस्फोटित आणि इतर महिलांना दरमहा १२५० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. तथापि, या योजनांचा लाभ घेण्यासाठी काही अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. दुसरीकडे, महाराष्ट्रातही गरीब कुटुंबांना मदत करण्यासाठी अनेक योजना सुरू आहेत. यापैकी महिलांशी संबंधित 'लाडकी बहीण योजना' आहे. यातून २१ ते ६५ वर्षे वयोगटातील महिलांना दरमहा १५०० रुपयांची मदत मिळते. निवडणूक प्रचारादरम्यान महायुतीच्या नेत्यांनी या योजनेंतर्गत देण्यात येणारी मदत १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्याचे आश्वासन दिले होते.

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने मोफत रेशन योजनेचाही उल्लेख केला होता. केंद्र सरकार कोरोना व्हायरसच्या साथीच्या काळापासून देशभरातील गरजू आणि गरिबांना मोफत अन्नधान्य पुरवत आहे. ही योजना यापूव किमान तीन वेळा वाढवण्यात आली आणि शेवटी डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू ठेवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते; मात्र नंतर ती १ जानेवारी २०२४ पासून पाच वर्षांसाठी वाढवण्यात आली. या योजनेंतर्गत लोकांना मोफत धान्य दिले जाते. 'ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशन' (ओआरएफ) च्या अभ्यासानुसार २०२२ पर्यंत सुरू झाल्यापासून २०१३ मध्ये पहिल्यांदा महिला बँक खातेधारकांसाठी सुरू केलेल्या थेट हस्तांतरण सुविधेद्वारे 16.8 लाख कोटी रुपये लाभार्थींच्या नावावर हस्तांतरित केले गेले आहेत. यातील ३३ टक्के रक्कम २०२०-२१ दरम्यान म्हणजेच कोरोनाच्या टाळेबंदीच्या काळात हस्तांतरित करण्यात आली. ३१६ सरकारी योजनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या 'डीबीटी'ने महिलांना घरातील निर्णय घेण्यास मदत केली आहे आणि त्यांचे शिक्षण आणि नोकरीच्या संधी वाढवण्यास मदत केली आहे. प्रधानमंत्री जन धन योजना, मूलभूत बचत बँक खाते उघडण्यासाठी केंद्राच्या प्रमुख आर्थिक समावेशन योजनेने केंद्राला 'डीबीटी'साठी महिला लाभार्थींची सहज ओळख पटवण्याची सोय केली आहे; परंतु आता त्याची उपयुक्तता राहिली का, हा खरा प्रश्न आहे.

## खर्चाचं हवं नियोजन

कारकिर्द

आजकाल कॉलेजचं शिक्षण सुरू असताना पार्ट टाईम जॉब करणाऱ्यांची संख्याही अधिक आहे. त्याच बरोबर कॉलेजचं शिक्षण पूर्ण झाल्याबरोबर नोकरी लागावी असाही अनेकांचा प्रयत्न असतो. मात्र, एकदा नोकरी लागली आणि हातात पैसा खेळू लागला की, बचतीपेक्षा चैनीवर बरेच पैसे उडवण्याकडे अनेकांचा कल असतो. पण असं करून चालण्यासारखं नाही. गरज नसताना ते खर्च करणं घातक ठरू शकतं. प्रयत्न केला तर खर्च कमी करु शकता. कसे वाचवायचे पैसे?



* दिवसभराच्या छोट्या खर्चांची नोंद ठेवा. चहाच्या कपापासून सुरूवात करा. दिवसभरात कशाकशावर खर्च करता हे जाणून घ्या. घरी जाण्यासाठी खाजगी टॅक्सीचा वापर किती वेळा करता हे तपासा. मनोरंजनासाठी होणाऱ्या खर्चाचा विचार करा. * पिकनिकला जाण्यासाठी किंवा छंद जोपासण्यासाठी होणाऱ्या खर्चाचा हिशेब ठेवा. * भविष्यात गाडी, घर घ्यायचं किंवा पुढच्या शिक्षणासाठी कर्ज घ्यायचं तर स्वत:चं क्रेडिट प्रोफाइल तयार करा. सुरूवातीला एखादं क्रेडिट कार्ड घ्या. वैयक्तिक कर्जही घेता येईल. कर्जाचे हप्ते तसंच क्रेडिट कार्डाचे हप्ते वेळेत फेडा. यामुळे सिबिल स्कोअर वाढेल आणि कर्ज सुलभपणे मिळू शकेल. * आर्थिक विषयांबद्दल माहिती घ्या. तुमचं ज्ञान वाढवा. गुंतवणूक कशी करायची, किती करायची याबाबत जाणून घ्या. त्याचा फायदा होईल.

खेचाखेची

## प्रथा नाही...

राजू एका लग्नाला गेला होता. तिथे प्लेट देणारा माणूस ती घेणाऱ्याच्या कपाळावर टिळा लावत होता. हे बघून राजूला खूप आनंद झाला.

राजू यजमानांना म्हणाला : अरे वा, तुम्ही खूप चांगली प्रथा पाळत आहात.

**यजमान** : अहो, लोक दोनदा प्लेट घेतात. एका प्लेटसाठी ८०० रुपये मोजले आहेत. आता दुसऱ्यांदा प्लेट घेणाऱ्यांना ओळखणं सोपं जाईल ना!!!

## वेगळं काही

वाचलेलं लक्षात कसं ठेवायचं याचा शास्त्रज्ञांनी शोध घेतला. त्यावरून त्यांनी एक निष्कर्षही काढला आहे. उपाय खूप सोपा आहे. मनातल्या मनात वाचण्यापेक्षा मोठ्याने वाचल्याने बरंच काही लक्षात राहतं असं तज्ज्ञांचं मत आहे. या संशोधनासाठी शास्त्रज्ञांनी ७५ विद्यार्थ्यांची निवड केली होती. त्यांना १६० शब्द मोठ्याने वाचायला सांगितले तर काही विद्यार्थ्यांना हेच शब्द मनातल्या मनात वाचायला सांगितले. ज्या मुलांनी शब्द मोठ्याने वाचले होते त्यांच्या ते व्यवस्थित लक्षात होते तर मनातल्या मनात वाचलेल्या मुलांना शब्द नीट सांगता आले नाहीत. यावरूनच शास्त्रज्ञांनी हा निष्कर्ष काढला आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : अचानक अधिक खर्च होईल. महत्त्वाची कामं अकारण रखडतील. बोलण्यातून गैरसमज संभवतात.
- **वृषभ** : मनाजोगी वार्ता कानी येईल. नव्या जबाबदाऱ्या विचारानं घ्याव्या. प्रकृतीच्या तक्रारी राहतील.
- **मिथुन** : आजचा दिवस उत्साहवर्धक राहील. प्रियजनांच्या भेटी होतील. विद्यार्थ्यांना सुसंधी लाभतील.
- **कर्क** : कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. स्थावर बाबतीत सावध रहावं. कायदेशीर कटकटी संभवतात.
- **सिंह** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. विवाहाचे प्रयत्न सफल ठरतील. छोटा-मोठा प्रवास घडेल.
- **कन्या** : मन विचलित करणाऱ्या घटना संभवतात. विचारानं रहावं. यंत्र, वाहनाचा वापर जपून करावा.
- **तूळ** : नव्या विचारांना चालना मिळेल. सरकारी कामं मार्गी लागतील. प्रेम प्रकरणात मतभेद टाळावेत.
- **वृश्चिक** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. आत्मविश्वास वाढेल. नोकरीत पदोन्नतीबाबत विचार होईल.
- **धनु** : मनाविरूध्द घटना संभवतात. रागावर नियंत्रण ठेवावं. ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्यायला हवी.
- **मकर** : महत्त्वपूर्ण घडामोडी होतील. व्यवसायात उत्कर्षाच्या संधी लाभतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : कलाकारांना मानसन्मान प्राप्त होईल. महत्त्वाच्या भेटीने समाधान लाभेल. व्यापारवृध्दी होईल.
- **मीन** : अडचणींवर मात करू शकाल. आर्थिक स्थिती साधारण राहील. कौटुंबिक सौख्य लाभेल.

सल्ला मोलाचा

## डान्स करा, फिट राहा

डाएट प्लॅन्स, जीमच्या बरोबरीने फिटनेसप्रेमींमध्ये एरोबिक्स, झुंबा, साल्सा आदी नृत्यप्रकार लोकप्रिय होत आहेत. नृत्य करताना संपूर्ण शरीराला हालचाल घडते. वर्कआऊटमध्ये व्यायामाऐवजी पारंपरिक नृत्यप्रकारांचा समावेश केल्यास बॉडी टोन अप होतेच शिवाय ताण हलका होण्यासही मदत होते. जाणून घेऊ अशाच काही नृत्यप्रकारांबाबत...

* **भरतनाट्यम** – रोजच्या व्यायामामध्ये भरतनाट्यमचा समावेश केल्यास मानसिक आणि शारीरिक असे अनेक लाभ मिळू शकतात. भरतनाट्यमच्या विविध मुद्रा, हावभाव, हालचाल नियंत्रणाच्या वेगवेगळ्या लकबी या सगळ्यामुळे फिट राहण्यास मदत होते.

* **कथ्थक**– तुम्ही वजन कमी करण्याच्या प्रयत्नात असाल तर कथ्थक हा सर्वोत्कृष्ट पर्याय समोर आहे. कथ्थकसाठी वापरल्या जाणाऱ्या एनर्जीने वजन कमी होण्यास मदत होते.

* **ओडिसी**– ओडिसीमधील शारीरिक हालचालींमुळे रक्ताभिसरण सुधारतं. लवचिकता टिकते.

## २८ फेब्रुवारी

दिनविशेष

१९६३ : भारताचे पहिले राष्ट्रपती बाबू राजेंद्रप्रसाद यांचे निधन.
२०१४ : सहारा उद्योगसमूहाचे प्रमुख सुब्रत रॉय यांना लखनौमध्ये अटक.
२०१६ : रोहित वेमुला आत्महत्येप्रकरणी संसदेची दिशाभूल केल्याबद्दल स्मृती इराणी यांच्याविरूद्ध हक्कभंग प्रस्ताव आणण्याचे विरोधकांचे मनसुबे सरकारने उधळून लावले.
२०१८ : कांची कामकोटी पीठाचे ६९ वे शंकराचार्य जयेंद्र सरस्वती यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन.

महत्त्वपूर्ण काही...

## मांजर कसं खाली पडतं?

उंचीवरून पडलेलं मांजर धडधाकट कसं राहू शकतं? यामागचं विज्ञान समजून घेऊ या. उंचीवरून खाली पडत असल्याची जाणीव मांजराला होते. यामुळे त्यांचं शरीर परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या तयारीला लागतं. खाली पडताना मांजराची शारीरिक स्थिती बदलते. त्याचं वजन कमी असतं. स्नायू पिळदार असतात. तसंच ते खूप चपळही असतात. या सगळ्याचा फायदा मांजरांना होतो. मांजर शरीर ताणू शकतं आणि खाली येताना जमिनीवर पाय टेकवू शकतं.

मांजराचं वजन कमी असल्याकारणाने खाली पडण्याची गती, हवेचा वरचा दाब समान होतात आणि या दोन्ही गोष्टींचं संतुलन साधलं जातं. मांजर ठराविक गतीत खाली येतं. मांजर आपले पाय फाकवतं. यामुळे पॅराशूटच्या स्थितीत येतं. आपण खाली पडत असल्याच्या सूचना मेंदूला दिल्या जातात आणि मांजर सुरक्षित उतरण्याच्या तयारीला लागतं. खाली पडण्याचा धक्का सहन करण्याची ताकद हाडांलगतच्या स्नायूंमध्ये असल्यामुळे पडल्यानंतरही मांजराला फार लागत नाही.

## पंचांग

शुक्रवार, २८ फेब्रुवारी २०२५
क्रोधीनाम संवत्सर शके १९४६
फाल्गुन शु. १, नक्षत्र : शततारका
चंद्रराशी : कुंभ , योग : सिद्ध
सूर्योदय ०७.०१ सूर्यास्त ६.४२

## लक्षात असावे

दिवसभरात किती आणि कधी पाणी प्यावे याविषयी अनेकींना संभ्रम असतो. पण तज्ज्ञांच्या मते, सकाळी उठल्यावर सर्वात आधी पाणी प्यावे. त्यामुळे शरीरातील सर्व अवयव सक्रिय होतात.

अर्थचर्चा

## इंडिया डिजिटल होतोय

व्यक्ती अथवा संस्थांना वाढीव खर्चाची तरतूद करण्यासाठी उत्पन्नाविरहित आयस्त्रोताची गरज असतेच. ती भागवण्यासाठी बँकांनी कर्जाऊ रक्कम देणे सुरू केले आणि एका मोठ्या व्यवसायाचा जन्म झाला. आता तर या व्यवसायाने व्यापक रुप धारण केले असून जनतेला सहजतेने क्रेडिट देण्यासाठी सरकार एकापाठोपाठ एक मोठी पावले उचलत आहे. दूरसंचार आणि माहिती तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांनी अलिकडेच यासंबंधीची महत्त्वपूर्ण घोषणा केली असून त्यानुसार सरकार या वर्षी डिजिटल क्रेडिट सेवा सुरू करणार आहे. यामुळे आता रस्त्यावरील लहान विक्रेतेही मोठ्या बँकांकडून सहजतेने कर्ज घेऊ शकतील. दुसरीकडे, यूपीआयचा वापर वाढवण्यासाठी ते स्थानिक भाषेतही आणण्याची तयारी सुरू आहे. त्याचबरोबर अनिवासी भारतीयांनाही UPI सेवेचा लाभ घेता येणार असल्याची घोषणाही लक्षवेधी म्हणावी लागेल. पहिल्या टप्प्यात १० देशांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार आता यूपीआय सेवा ऑस्ट्रेलिया, कॅनडा, हाँगकाँग, ओमान, कतार, सौदी अरेबिया या देशांमधील अनिवासी भारतीयांसाठी उपलब्ध असेल. तसेच, भारताच्या UPI चे सिंगापूरच्या पे नाऊ प्रणालीसोबत एकीकरण प्रक्रियाही सुरू आहे. त्याला यश आल्यास हादेखील अर्थविश्वातला एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणावा लागेल. या सर्व सेवा 'डिजिटल इंडिया' अंतर्गत विस्तारित केल्या जाणाऱ्या पायऱ्या आहेत, असे म्हणावे लागेल.



## वाचा तर खरं

स्किईंग करताना: स्नायूंची क्षमता वाढवण्यावर भर द्या. शरीरातला ओलावा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करा. * स्कीईंग, स्नोबोर्डिंगसाठीच्या उपकरणांच्या वापराची माहिती करून घ्या. * खास स्कीईंगसाठी तयार करण्यात आलेल्या बुटांचा वापर करा. * स्कीईज किंवा स्नोबोर्डच्या कडा सपाट आणि टोकदार असायला हव्यात. यामुळे दुखापत टाळता येऊ शकते. * हे क्रीडाप्रकार करताना कायम हेल्मेट घाला. * थांबण्याचा आणि गती कमी करण्याचा सराव करा. * खराब हवामानात विशेष काळजी घ्या. * या खेळांशी संबंधित खाणाखुणा समजून घ्या.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### कोल्हापुरात बंदुकीचा धाक दाखवून बलात्कार



**कोल्हापूर :** पुण्यातील स्वारगेट बस स्थानकावर शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर सराईत गुन्हेगार दत्ता गाडेने जीवे मारण्याची धमकी देत बलात्कार केल्याची घटना ताजी असताना आता कोल्हापूरमध्ये सुद्धा असाच धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बंदुकीचा धाक दाखवून तरुणीवर बलात्कार केल्याची घटना घडली आहे. इतकेच नव्हे, तर नराधम आरोपीने शरीरसंबंधाचे व्हीडीओ व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार बलात्कार केल्याची फिर्याद दाखल करण्यात आली आहे. दरम्यान, कोल्हापूर येथील नराधम आरोपी कोल्हापुरातील लक्षतीर्थ वसाहतीतील असून त्याचे नाव विश्वजीत सचिन जाधव असे आहे. त्याच्या विरोधात शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान पीडित तरुणीने २०१८ पासून वेगवेगळ्या ठिकाणी बलात्कार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. बंदुकीचा धाक दाखवून बलात्कार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दोनवेळा इच्छेविरुध्द गर्भपात करायला लावल्याचे म्हटले आहे.

# अध्यापकांच्या भरती प्रक्रियेस मान्यता

## नवीन कार्यपद्धतीचा होणार अवलंब; उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांची माहिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील अध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेस मान्यता देण्यात येत आहे. निवड प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षता येण्यासाठी यापुढे राज्यात अध्यापक पदांची भरती प्रक्रियेसाठी नवीन कार्यपद्धतीचा अवलंब होणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले , मा.राज्यपाल तथा कुलपती यांच्या मार्गदर्शनानुसार राज्यातील विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवड प्रक्रियेसाठी गुणांकन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये शैक्षणिक क्रेडेन्शियल आणि त्यांची मुलाखतीमधील कामगिरी गृहीत धरण्यात येणार आहे. या दोन्ही बाबी एकत्रित करून अधिक पारदर्शक, निष्पक्ष निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापनाला ८० टक्के गुण (वेटेज) तर मुलाखतीसाठी २०टक्के गुण (वेटेज) देण्यात येणार आहे. एकत्रित १०० गुणांपैकी किमान ५० टक्के गुण मिळवलेल्या उमेदवारांनाच अंतिम निवडीसाठी पात्र असतील.

अध्यापन क्षमता अथवा संशोधन प्राविण्य यांचे मुल्यमापन परिसंवाद अथवा व्याख्यान प्रात्यक्षिक अथवा अध्यापन आणि संशोधन यामधील नवीनतम तंत्रज्ञान वापरण्याच्या क्षमतेवरील चर्चा या बाबी मुलाखतीच्या टप्प्यावर विचारात घेण्यात येतील. निवड समितीच्या बैठकांचे दृक-श्राव्य चित्रिकरण करण्यात येणार आहे. निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दृक-श्राव्य चित्रिकरण,बैठकीला उपस्थित असलेल्या निवड समितीच्या सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीने सीलबंद करण्यात येईल.

मुलाखती पूर्ण होताच त्याच दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी निकाल जाहीर करण्यात येईल. ही सर्व निवड प्रकिया सहायक प्राध्यापक पदासह सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवड प्रक्रियेसाठी लागू राहील. नवीन निवडप्रक्रियेच्या अधीन राहून विद्यापीठांमधील सध्या सुरू असलेली अध्यापकांची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच भविष्यात होणाऱ्या विद्यापीठांमधील अध्यापकांच्या निवड प्रक्रियेकरिता याच कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. यामुळे विद्यापीठांमध्ये पारदर्शक आणि जलद निवड प्रक्रिया राबविणे शक्य होणार आहे. या सुधारित कार्यपद्धतीमुळे गुणवत्ताधिष्ठित अध्यपकांची निवड होईल. तसेच उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

### मळा बाई अंबिका विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित

**भांबर्डे तालुका शिरूर जिल्हा पुणे**

या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा वार बुधवार दिनांक ०५/०३/ २०२५ रोजी सकाळी ११ वाजता संस्था ऑफिसमध्ये सहाय्यक निबंधक सहकारी संस्था शिरूर यांचे कार्यालया कडील प्राधिकृत अधिकारी श्री डी. वाय. वराळ सहकारी अधिकारी श्रेणी २ यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सभेस उपस्थित राहावे ही विनंती सदर सभेमध्ये दिनांक १४ /११ /२०२४ रोजी झालेल्या सभेमधील विषय कर्जाची तडजोड केलेल्या सभासदांना संस्थेकडून कर्ज पुरवठा न करणे या विषयावर फेर चर्चा करण्याबाबत याच विषयावर सभा होणार आहे

# दिल्ली विमानतळावर १.३ कोटींचे सोने जप्त; तस्कराला अटक



**नवी दिल्ली :** दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर १.३ कोटी रुपयांच्या सोन्याची तस्करी करणाऱ्या एका व्यक्तीला अटक करण्यात आली, असे कस्टम्स विभागाने गुरुवारी सांगितले. आरोपी २४ फेब्रुवारी रोजी सौदी अरेबियातील जेद्दाह शहरावरून कुवेतमार्गे येताच त्याला अटक करण्यात आली.

सदर व्यक्तीची वैयक्तिक आणि सामानाची कसून तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्यांच्याकडे सोने सापडले. सोन्याची पेस्ट पांढऱ्या चिकट टेपने गुंडाळलेल्या एका थैलीत, प्रवाशाकडे असलेल्या सामानात ठेवलेल्या मोज्यांच्या जोडीमध्ये लपवण्यात आली होती, असे कस्टम्स विभागाने 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

# योगी यांच्याकडून मोदींचे कौतुक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**प्रयागराज :** मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गुरुवारी महाकुंभमेळ्यासाठी मार्गदर्शन केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी झालेल्या सामूहिक प्रयत्नांचे कौतुक केले, थोडी राजकीय इच्छाशक्ती आणि योग्य पाठिंब्याने कोणतीही गोष्ट साध्य करता येते, असे ते म्हणाले.

एक्सवरील एका पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, आदरणीय पंतप्रधान, तुमच्या यशस्वी मार्गदर्शनाचेच परिणाम म्हणजे प्रयागराज येथील 'एकता, समता, सौहार्दाचा महायज्ञ' महाकुंभ-२०२५ आज सुरक्षा, स्वच्छता आणि सुशासनाचे नवीन मानके तसेच भव्यता आणि दिव्यता स्थापित करून संपन्न झाला आहे. या कार्यक्रमाचे प्रमाण अधोरेखित करताना ते म्हणाले, "गेल्या ४५ पवित्र दिवसांत, आदरणीय साधू आणि संतांसह ६६ कोटींहून अधिक भाविकांनी पवित्र त्रिवेणीत पवित्र स्नान करून आशीर्वाद मिळवला आहे."

आदित्यनाथ यांनी या कार्यक्रमाचे महत्त्व सांगून, मानवतेचा हा उत्सव 'वसुधैव कुटुंबकम' या भावनेने संपूर्ण जगाला एकतेच्या धाग्यात बांधत आहे, असे नमूद केले.

पंतप्रधान मोदींच्या पाठिंब्याची त्यांनी प्रशंसा केली असून असे म्हटले, "तुमचे मार्गदर्शन आणि शुभेच्छा नेहमीच आपल्या सर्वांना नवीन ऊर्जा देतात, पंतप्रधान तुमचे मनापासून आभार!"

तत्पूर्वी, एका ब्लॉग पोस्टमध्ये पंतप्रधान मोदींनी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले आणि म्हटले की, "उत्तर प्रदेशचा खासदार म्हणून मी अभिमानाने सांगू शकतो की आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली सरकार, प्रशासन आणि लोकांनी एकत्रितपणे हा 'एकतेचा महाकुंभ' यशस्वी केला."

पान १ वरून

## नाशिक भाजपकडेच

परंतु, या नियुक्तीनंतर शिवसेना शिंदे गटाने दोन्ही नियुक्त्यांवर आक्षेप घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या दिल्लीतील उच्चपदस्थांकडे तक्रार केल्यावर २४ तासांत नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली होती.

त्यानुसार, १९ जानेवारीला स्थगिती देण्यात आल्यापासून महिनाभरापेक्षा जास्त काळ उलटला तरी अद्याप रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावर तोडगा निघालेला नाही. यावर तोडगा काढण्यासाठी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. या वादावर पडदा टाकण्याचे प्रयत्न केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या पातळीवरही सुरू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसने नाशिकचे पालकमंत्रिपद मिळणार नसल्यास रायगडचे पालकमंत्रिपद कायम राहावे, अशी भूमिका मांडल्याचे सांगण्यात येते. नाशिकचे पालकमंत्रिपद भाजपच्या गिरीश महाजन यांच्याकडे कायम राहणार हे कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे झालेल्या बैठकीवरून स्पष्ट झाले. या बैठकीला गिरीश महाजन उपस्थित होते.

## युरोपीय महासंघाच्या प्रमुख...

मित्रांची आवश्यकत आहे. त्यामुळे युरोपीयन महासंघासाठी भारत हा एक मित्र आणि धोरणात्मक सहयोगी असल्याचे उर्सुला यांनी म्हटले आहे. तसेच दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी पुढील स्तरावर कशी नेता येईल यावर मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करणार असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे.

मुक्त व्यापारावर द्विपक्षीय चर्चा

भारत आणि युरोपीय महासंघ यांच्यातील संबंधांसाठी ही भेट खूप महत्त्वाची मानली जात आहे. उर्सुला यांच्या भारत भेटीदरम्यान मुक्त व्यापार करार, युरोपीय महासंघ-भारत व्यापार यासह अनेक मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा होण्याची शक्यता आहे. परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून भारत दौऱ्यावर आलेल्या उर्सुला यांच्या भेटीचा अजेंडा म्हणजे मुक्त व्यापार करारासह इतर मुद्दे. भारत आणि युरोपीय महासंघाने जून २०२२ मध्ये व्यापार करारासाठी वाटाघाटी पुन्हा सुरू केल्या आहेत.

## एन्काऊंटर बनावट असल्याचा मुद्दा कसा वगळला?

भूमिकेवर हायकोर्टाने नाराजी व्यक्त केली. दंडाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालातील दोन प्रमुख मुद्दे कसे काय स्थगित केले जाऊ शकतात? असा सवाल विचारला. 5 मार्चच्या पुढील सुनावणीत राज्य सरकारने यावर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. याशिवाय याप्रकरणी जेष्ठ वकील मंजुला राव यांची अमायकस क्युरी म्हणून नियुक्ती करण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. दंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालात अक्षय शिंदे एन्काऊंटर बनावट असल्याचा निर्वाळा देत संबंधित पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले होते. राज्य सरकारने सीआयडी चौकशी सुरू असल्यानं अद्याप संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर अक्षय शिंदेच्या हत्येचा गुन्हा नोंदवलेला नाही. तसेच अण्णा शिंदे यांनी याप्रकरणी आता खटला चालवायचा नसल्याचं सांगितलंय. या मुद्यांवर अमायकस क्युरी हायकोर्टाला मदत करणार आहे.

## संभल मशिदीसाठी समितीची स्थापना



सर्वेक्षण विभागाच्या एका तज्ज्ञाचा समावेश असेल, जो मशिदीच्या ऐतिहासिक संरचनेला कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेईल. तसेच एक वैज्ञानिक देखील असेल जो रंगकामात वापरल्या जाणाऱ्या साहित्याचे विश्लेषण करेल. तसेच प्रशासनातील एक अधिकारी असेल जो या संपूर्ण कामावर देखरेख ठेवेल.

उच्च न्यायालयाने संभल जामा मशिदीचे रंगकाम समितीच्या देखरेखीखालीच होणार, त्याशिवाय हे काम केले जाणार नाही असे स्पष्ट केले आहे. तसेच न्यायालयाने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने यासाठी मशिदीचे निरीक्षण करावे असे निर्देश देखील न्यायालयाने दिले आहेत. आज झालेल्या सुनावणी वेळी न्यायालयाने सांगितले की, रमजानचा महिना सुरू होत आहे, त्यामुळे मशिदीचे रंगकाम करण्याची आवश्यकता आहे.

मात्र या काळात मशिदीच्या इमारतीला नुकसान पोहचणार नाही अशा पद्धतीने रंगकाम कसे केले जाईल हे समितीच्या रिपोर्टनंतर न्यायालय निश्चित करेल. न्यायालयात या प्रकरणी शुक्रवारी सुनावणी केली जाणार आहे. न्यायमूर्ती रोहित रंजन अग्रवाल यांच्या एकल खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी केली जाईल.

## माणिकडोहमध्ये २८ टक्के...

योग्य पद्धतीने व काळजीपूर्वक व्हावे अशी मागणी शेतकरी संघटनेचे नेते सचिन थोरवे यांनी केली आहे.

दरम्यान, तालुक्यामध्ये माणिकडोह, वडज, येडगाव,पिंपळगाव जोगा, चिल्हेवाडी ही पाच धरणे आहेत, परंतु पाचही धरणामध्ये यंदाच्या वर्षी पाण्याचा साठा सध्या खूपच कमी आहे. तसेच आवर्तनामुळे पाण्याचा साठा झपाट्याने कमी होत असल्यामुळे शेतकरी वर्ग चिंता व्यक्त करीत आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेला फ्लॅट गंगा ग्लिट्झ कॉम्प्लेक्स बिल्डिंग नं. एच सहकारी गृहरचना संस्था मर्यादित चे सभासद म्हणून सौ. कॅरोलिन डीआने रॉस रा. पुणे यांनी धारण केलेला असून, सदर फ्लॅट वर HDFC बँकेचा बोजा असून सदर बँके व्यतिरिक्त इतर कोणाचा ही कोणता बोजा नसून तो निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवंसा देवून, आता त्या सदर फ्लॅट आमचे अशिलांस कायमखुष खरेदीने देण्याबाबत वाटाघाटी चालू केलेली आहे. तरी सदर फ्लॅट वर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबध व अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसांत आमची खालील पत्यावर समक्ष भेट घेवून कागदपत्रांसह खात्री करुन द्यावी व तशी लेखी पोहोच घ्यावी, अन्यथा सदर फ्लॅट वर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार करतील. तदनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, कृपया यांची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका हवेली, मा. दुय्यम निबंधक हवेली यांचे कार्येक्षेत्रातील तसेच पुणे महानगरपालिका यांचे हददीतील मौजे उंड्री येथील सर्व्हे नं. 16 / 3, 16 / 4क, 16/5, 17/2 + 4, 17/3अ, 17/7अ/10, 17/23/1, 17/23/2, 17/2अ / 3, 17/3ब, 17/7 अ/10 पार्ट, 17/ 8अ / 10क व 17 / 2अ / 4 पार्ट, 17 / 5पार्ट 17 / 6पार्ट, 16 / 4अ आणि सर्व्हे नं. 16 / 4 या मिळकतीवर उभ्या असलेल्या गंगा ग्लिट्झ कॉम्प्लेक्स बिल्डिंग नं. एच सहकारी गृहरचना संस्था मर्यादित मधील इमारत नं. एच मधील दहाव्या मजल्यावरील फ्लॅट नं. 1004 यांसी क्षेत्र 74.96 चौ.मी कारपेट म्हणजेच 806.65 चौ.फु लगतचे ओपन टेरेस क्षेत्र 11.85 चौ.मी. म्हणजेच 127.55 चौ. फू कारपेट व सिंगल ओपन कार पार्किंग स्पेस नं.124 सह तसेच इतर समाईक सुखसुविधांसह काही एक राखुन न ठेवता.

**पुणे,**
**दिनांक:** 28/02/2025

**चेतन गांधी,** ॲडव्होकेट,
7 / ओ, अत्रेय को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, गोखलेनगर रोड,
ऑफ सेनापती बापट रोड,
शिवाजीनगर पुणे : 411016
मो.नं. 98222 81577

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५२२ / २०२४ / ५१९८

**अर्जदार**
शुभम सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं. ८२/१अ/२/६ (पैकी), आदर्शनगर, नवी सांगवी, ता. हवेली जि. पुणे- ४११०२७.
तर्फे अध्यक्षः श्री. योगेश विजय पाटील, सचिव : श्री. सुहास आनंदराव जाधव

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

विकसक / जागा मालक / जाब देणार नं. १
१. श्री. ज्ञानेश्वर महादेव जगताप पत्ता- ५६१, नाना पेठ, जि. पुणे- ४११०११. तर्फे, कु.मु. धारक-, अ. श्री. किशोर शंकर गारवे, ब. श्री. राजेश शंकर गारवे दोघे रा. ६२६/२१, गारवे बिल्डींग, नवी सांगवी, ता. हवेली जि. पुणे - ४११०२७.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये शुभम सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: स.नं. ८२/१अ/२/६ (पैकी), आदर्शनगर, नवी सांगवी, ता. हवेली जि. पुणे- ४११०२७ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५२२/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १३/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी **दिनांक ०४/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा.** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : २१/०२/२०२५

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५२७/२०२४ / ५७९२

**अर्जदार**
राजगृह - बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं.१८/१/२, सिटीएस नं. ६४०, कोंढवा खुर्द, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४८
तर्फे, अध्यक्षः श्री. इकबाल सिंग सिद्धू, सचिव : श्री. निलेश पुंडे

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

विकसक / प्रवर्तक/जाब देणार नं. १
१. मे. रतानी कन्स्ट्रक्शन्स नोंदणीकृत भागीदारी संस्था तर्फे भागीदार
श्री. सुरेश आर. अय्यर, ऑफीस पत्ता: "कसाब", १९-के/२, सोमवार पेठ, पुणे- ४११०११. इतर सहकारी संस्था / जाब देणार नं. २
२. राजगृह सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं.१८/१/२, सिटीएस नं. ६४०, कोंढवा खुर्द, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४८.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये राजगृह - बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: स.नं.१८/१/२, सिटीएस नं. ६४०, कोंढवा खुर्द, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४८ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५२७/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १२/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक **क्र. १ व २** गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक **क्र. १ व २** यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी **दिनांक ०४/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा.** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : २१/०२/२०२५

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५१८/२०२४ / ५१९५

**अर्जदार**
अक्षय अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. ८१/१अ/१/४, स.नं. ८१/१/१/५, सांगवी, ता. हवेली, जि. पुणे- ४११०२७
तर्फे, अध्यक्षः श्री. सत्यजित बाळासाहेब नाईक, सचिव : श्री. हर्षल प्रकाश अहिरे

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. मे. जोशी असोसिएट्स तर्फे प्रोप्रायटर, श्री. ज्ञानेश्वर महादेव जोशी
रा. ५५, जोशी निवास, शितोळे नगर, सांगवी, ता. हवेली, पुणे- ४११०२७ अनु क. २ ते ३
तर्फे कु. मु. म्हणुन जाब देणार नं. १
जागा मालक / जाब देणार नं. २
२. सौ. मिनल धनंजय वारवले, रा. एरंडवणा, पुणे- ४११००४
३. सौ. मंदा चिन्ना सूर्यनारायण, रा. शंकरशेट रोड, पुणे- ४११०४२.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये अक्षय अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: सर्वे नं. ८१९/१/१/४, स.नं. ८१ / १अ / १/५, सांगवी, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०२७ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५१८/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १२/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. **१ ते ३** गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी **दिनांक ०४/०३/२०२५ रोजी दु. ३.००** वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : २१/०२/२०२५

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५६८/२०२४/५१९६

**अर्जदार**
ॲक्सीसा विंग बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं. ८८/१बी/२/३, स.नं.८८/६ (पैकी) व स.नं. ८८/७/२, साळुंके वस्ती, किवळे पब्लिक शाळे जवळ, किवळे, ता. हवेली, जि. पुणे - ४१२१०१.
तर्फे, अध्यक्ष : श्री. संतोष रघुनाथ अलगुले, सचिव : श्री. संदिप साहेबराव ओव्हाळ

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

गैरअर्जदार / जमिनमालक
विकसक /प्रवर्तक/ जाब देणार नं. १
१. मे. माहेश्वरी डेव्हलपर्स, तर्फे भागीदार,
अ. श्री. सचिन वसंत जरे, रा. मनिषा हौसिंग सोसायटी, चिखली, ता. हवेली जि. पुणे - ४१२११४.
ब. श्री. राजकुमार जयरामशर्मा, रा. सेक्टर नं. २८, प्राधिकरण, निगडी, ता. हवेली जि. पुणे - ४११०२७. जागा मालक / जाब देणार नं. २.
२. ए. बेबीताई किसन साळुंके, बी. श्री. दामु नथु साळुंके, सी. श्री. महेंद्र किसन साळुंके
डी. श्री. रामचंद्र नथु साळुंके, ई. श्री. बळीराम सिताराम तरस
जा. देणार नं.२ ए ते ई रा. स.नं. ८८ / १बी / २ / ३, स.नं. ८८/६ (पैकी) व स.नं. ८८/७/२, साळुंके वस्ती, किवळे पब्लिक शाळे जवळ, किवळे, ता. हवेली, जि. पुणे - ४१२१०१.
एफ. मे. माहेश्वरी डेव्हलपर्स, तर्फे भागीदार,
१. श्री. सचिन वसंत जरे, रा. मनिषा हौसिंग सोसायटी, चिखली, ता. हवेली जि. पुणे - ४१२११४.
२. श्री. राजकुमार जयरामशर्मा, रा. सेक्टर नं. २८, प्राधिकरण, निगडी, ता. हवेली जि. पुणे - ४११०२७. इतर इमारत / इतर संस्था/ जाब देणार नं.३
३. ए. ॲक्सीसा विंग ए सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
बी. इमारत सी, सी. इमारत डी
पत्ताः स.नं. ८८/१ बी/ २/३, स.नं. ८८/६ (पैकी) व स.नं. ८८/७/२, साळुंके वस्ती, किवळे पब्लिक शाळे जवळ, किवळे, ता. हवेली, जि. पुणे - ४१२१०१.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये ॲक्सीसा विंग बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: स.नं. ८८ / १ बी / २ / ३, स.नं. ८८/६ (पैकी) व स.नं. ८८/७/२, साळुंके वस्ती, किवळे पब्लिक शाळे जवळ, किवळे, ता. हवेली, जि. पुणे - 412101 या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ३८५/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १३/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. प्रज्ञा पाटील हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी **दिनांक ०४/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा.** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक **क्र. १ व २** यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
**पुणे दिनांक : २१/०२/२०२५**

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५२३/२०२४/५७९०

**अर्जदार**
कल्पतरू सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. २६, हिस्सा नं. २/२/१/१/६८, कळस, ता. हवेली, जि. पुणे- ४११०१५
तर्फे, अध्यक्षः सौ. सरोजा दुंडप्पा कुंडुक, सचिवः श्री यल्लाप्पा शंकर बिर्जे

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

प्रवर्तक/ जाब देणार नं. १
मे. कल्पतरु डेव्हलपर्स नोंदणीकृत भागीदारी संस्था तर्फे भागीदार
अ. श्री. सुजित निवृत्ती झपके, ब. सौ. कृष्णाबाई निवृत्ती झपके
पत्ताः रा. झपके वाडा, रामनगर, पाण्याच्या टाकीजवळ, बोपखेल, सि. एम. ई. ता. हवेली, पुणे- ४११०३१
जागा मालक / जाब देणार नं. १
२. सौ. कृष्णाबाई निवृत्ती झपके, ३. श्री. निवृत्ती रंगनाथ झपके
पत्ताः रा. झपके वाडा, रामनगर, पाण्याच्या टाकीजवळ, बोपखेल, सि.एम.ई. ता. हवेली, पुणे- ४११०३१.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये कल्पतरू सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: सर्वे नं. २६, हिस्सा नं. २/२/१/१/६८, कळस, ता. हवेली, जि. पुणे - ४११०१५ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५२३/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १२/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. **१ ते ३** गैरहजर, गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी **दिनांक ०४/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा.** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : २१/०२/२०२५

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५२५/२०२४/५१९४

**अर्जदार**
मरुधर रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स. नं. ६६/५ (पैकी), कोंढवा बु., ता. हवेली, जि. पुणे - ४११०४८.
तर्फे, अध्यक्ष : श्री. बाबाराव दलपतराव राठोड, सचिव : श्री. स्वप्नील प्रभाकर निऱ्हाळी

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

विकसक / जागा मालक / जाब देणार नं. १
१. मे. परमार प्रॉपर्टीज, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफिस पत्ता- ऑफिस नं. ११९, पोर्णिमा टॉवर, ३९७, शंकर शेठ रोड, ता. हवेली जि. पुणे- ४११०३७.
तर्फे अधिकृत भागीदार, श्री. निर्मल निहालचंद परमार
रा. निर्मल टेरेस, फ्लॅट नं. २०, ५ वा मजला, ३९७, शंकर शेठ रोड, ता. हवेली जि. पुणे- ४११०३७.
जागा मालक / मान्यता देणार / जाब देणार नं. १
२. ए. सौ. इंदुमती निहालचंद परमार, बी. श्री. निहालचंद चंदुलाल परमार,
सी. श्री. निर्मल निहालचंद परमार, डी. सौ. सुनिता निर्मल परमार
जाब देणार नं.२ ए ते डी. रा. निर्मल टेरेस, फ्लॅट नं. २०,५ वा मजला, ३९७, शंकर शेठ रोड, ता. हवेली जि. पुणे-
ई. श्री. हरेष निहालचंद परमार, जाब देणार नं. २ ई रा. एच-१६, गीता सोसायटी, १०, कॅम्प, पुणे- ४११००१.
(जाब देणार नं. २ तर्फे कु. मु. धारक म्हणुन जा. देणार नं. १)
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये मरुधर रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः स. नं. ६६ / ५ (पैकी), कोंढवा बु., ता. हवेली, जि. पुणे- ४११०४८ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५२५/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १२/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २(ए ते ई) गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ (ए ते ई) यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०४/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व २ (ए ते ई) यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे दिनांक : २१/०२/२०२५

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५६५/२०२४/५१९७

**अर्जदार**
पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. सी- २ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. ११७/१, वारजे (माळवाडी), मुंबई- बेंगलोर हायवे जवळ, ता. हवेली, जि. पुणे- ४११०५८.
तर्फे, अध्यक्षः श्री. अशोक नामदेव चव्हाण, सचिव : श्री. सतीश पद्मनाथ इंगळे

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

गैरअर्जदार / जमिनमालक
विकसक /प्रवर्तक/ जाब देणार नं. १
१. मे. पॉप्युलर कन्स्ट्रक्शन्स नोंदणीकृत प्रोप्रायटरी संस्था, तर्फे प्रोप्रायटर, श्री. मनोज मोहनलाल शर्मा, रा. २६१, रस्ता पेठ, पुणे - ४११०११
2. मे. शर्मा असोसिएट्स नोंदणीकृत भागीदारी संस्था, तर्फे भागीदार
अ. श्री. मोतीलाल गिरधारीलाल शर्मा, ब. श्री. सुरेश मोहनलाल शर्मा ऑफिस पत्ताः 1992, कॉन्व्हेंट स्ट्रीट, पुणे - ४११००१.
जागा मालक / जाब देणार नं. २
३. सौ. विशाखाबाई पुरुषोत्तम दुबे, ४. श्री. विश्वनाथ पुरुषोत्तम दुबे, ५. श्री. मनोहर पुरुषोत्तम दुबे
६. श्री. विनायक पुरुषोत्तम दुबे, ७. श्री. मोहन पुरुषोत्तम दुबे, ८. सौ. सुमती कमलाकर तिवारी
९. सौ. विमल नरेंद्र दुबे, १०. सौ. मीरा शरद दुबे, अनु क. ३ ते १० रा. ३७१, शुकवार पेठ, पुणे - ४११००२.
जाब देणार नं.३ / इतर सहकारी गृहरचना संस्था
११. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी तर्फे चेअरमन गजानन रमाकांत एकबोटे
सेक्रेटरी दिलीपसिंग गुलाबसिंग परदेशी
१२. पुनाकर कंस्ट्रक्शन प्रा. लि. तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर सुरेश मोहनलाल शर्मा
१३. बालाजी गॅस सप्लायर्स, तर्फे भागीदार, शाम मोहनलाल शर्मा
१४. मे. स्टार शारदा अलाईन्स, तर्फे भागीदार, विलास रखमाजी यादव, राकेश मोतीलाल शर्मा
१५. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. ई-२ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
१६. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. बी- ८ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
१७. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. डि-२ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
१८. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. बी- १० सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
१९. गिरीधरनगर बिल्डिंग नं. डी-१७ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
२०. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. डी-१ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
२१. गिरीधरनगर बिल्डिंग नं. बी - 18 सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
२२. गिरीधरनगर बिल्डिंग नं. सी १ बी को. ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड
२३. गिरीधरनगर आंगण नं. ई-५ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित तर्फे चेअरमन
श्री. हुकमाराम स्वरुपाराम भदरेचा, सेक्रेटरी सौ. नयना हितेंद्र मोहरीर
२४. गिरीधरनगर आंगण नं. बी-२० सहकारी गृहरचना संस्था मर्यादित तर्फे
चेअरमन श्री. पप्पुराम जी देवासी सेक्रेटरी श्री. संकेत संजय जोशी
२५. गिरीधरनगर आंगण नं. बी-२१ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित तर्फे चेअरमन
श्री. भाऊसाहेब विठ्ठलराव शितोळे, सेक्रेटरी सौ. शिवानी आर चौधरी
२६. गिरीधरनगर बिल्डिंग नं. बी-१६ को. ओप. हौसिंग सोसायटी, लि. तर्फे,
अथोराईज्ड निळकंठ प्रल्हाद शिंदे, ज्ञानदेव प्रभाकर चाबुकस्वार
२७. गिरीधरनगर बिल्डिंग नं. बी- १५ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
२८. गिरीधरनगर बिल्डिंग नं. बी-३ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
२९. गिरीधरनगर बिल्डिंग नं. सीआरए को. ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड
३०. गिरीधरनगर बिल्डिंग नं. डी- १६ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
३१. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. ए-२ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
३२. गिरीधरनगर बिल्डिंग नं. ओ-१ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
३३. गिरीधरनगर बिल्डिंग नं. बी- १९ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
३४. स्पंदन रेसिडेन्सी को. ऑप. हौ. सोसायटी लि. बिल्डींग डी- ११
अनु क. ११ ते ३४ पत्ताः सर्वे नं. ११७ / १, वारजे (माळवाडी), मुंबई- बेंगलोर हायवे जवळ, ता. हवेली, जि. पुणे ४११०५८.
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये **पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. सी- २ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः सर्वे नं. ११७/१, वारजे (माळवाडी), मुंबई- बेंगलोर हायवे जवळ, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०५८** या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५६५/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १३/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार **संस्थेतर्फे ॲड. समृध्दी कोठारी हजर.** गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ व ३४ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व ३४ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी **दिनांक ०४/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा.** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. **१ व ३४** यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
**पुणे दिनांक : २१/०२/२०२५**

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

# मावळ मधील कामे मार्गी लावा

## उपमुख्यमंत्री अजित पवारांचे निर्देश, वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील लोणावळा व वडगाव (कान्हे) उपजिल्हा रुग्णालयांची कामे गतीने पूर्ण करावी. मौजे जांभूळ येथील क्रीडा संकूल सर्व सुविधायुक्त, मावळ तालुक्याचा गौरव वाढवणारे असावे, देहू नगरपंचायतीसह, खडकाळे, वराळे, डोणे आढळे, डोंगरगाव कुसगाव, पाटण, कार्ला व परिसरातील पाणीपुरवठा योजना गतीने पूर्ण कराव्यात. मौजे कार्ला येथे फनिक्युलर रोपवे उभारण्यासह श्री एकवीरा मंदिर परिसराच्या विकासाची कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले.

लोणावळ्यातील पर्यटकांची आणि कार्ला येथील भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन दोन्ही ठिकाणी सुरक्षेच्यादृष्टीने पर्यटन पोलिस ठाणी स्थापन करण्यात येतील. महामार्गांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तळेगाव, चाकण, शिक्रापूर परिसरातल्या महामार्गाचे रुंदीकरण, महामार्गावर उड्डाणपूल उभारण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्यात येईल, यासाठी मी स्वत: पुढाकार घेईन, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बैठकीत स्पष्ट केले.

पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करुन या प्रकल्पांना गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर (व्हीसीद्वारे), स्थानिक आमदार सुनील शेळके यांच्यासह नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, वित्त व नियोजन, पाणीपुरवठा- स्वच्छता, आरोग्य, एमएसआरडीसी, एमएसआयडीसी, गृह, क्रीडा आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी, पुण्याचे जिल्हाधिकारी, पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय तसेच पुणे ग्रामीण पोलीसचे वरिष्ठ अधिकारी (व्हीसीद्वारे) उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, कार्ला येथील आई एकविरा देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक येतात. मंदिर परिसरात भाविकांना चांगल्या सोयीसुविधा देण्यासाठी मंदिर परिसराच्या विकासाची कामे करण्यात येत आहेत. वेहेरगाव येथील श्री एकवीरा देवी मंदिर येथे फनिक्युलर रोपवे उभारण्यासंदर्भातील कामांना मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पामुळे भाविकांना अल्पावधीत मंदिरात पोहोचता येणार आहे. प्रकल्पाची गतीने उभारणी करावी, अशा सूचना दिल्या. लोणावळा व वडगाव (कान्हे) उपजिल्हा रूग्णालयाचे सुरुवातीच्या टप्प्यांचे बांधकाम तातडीने पूर्ण करावे. उर्वरित कामांचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. तालुका क्रीडासंकुल बांधण्यासाठी मावळ तालुक्यातील मौजे जांभुळ येथे २ हेक्टर ६० आर क्षेत्र मंजूर करण्यात आले आहे. यात कबड्डी, खो खो, व्हॉलीबॉल, फूटबॉल, टेनिस, धावपट्टी, प्रेक्षागार आदी सोयी सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. ही कामे मंजूर निधीतून तातडीने सुरु करावीत, ज्या कामांना अतिरिक्त निधी लागेल तो तातडीने उपलब्ध केला जाईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

### पाणीपुरवठा योजनांच्या कामांना गती द्यावी

● उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातंर्गत मंजूर डोणे आढळे, वाढीव डोंगरगाव कुसगाव, पाटण व ८ गावे, कार्ला व ७ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना, खडकाळे, वराळे, देहू नगरपंचायत पाणीयोजनांच्या कामांच्या सद्यस्थितीचाही आढावा घेतला. या सर्व पाणीयोजनांच्या कामांना गती द्यावी, असे निर्देश दिले.



**प्योंगयांग, उत्तर कोरिया :** उत्तर कोरियाचे नेते किम जोंग उन, उत्तर कोरियातील प्योंगयांग येथील कांग कोन मिलिटरी अकादमीला भेट देताना समांतर बारवर सराव करणाऱ्या एका कॅडेटला पाहताना.

## सुरतमधील कापड बाजारात भीषण आग

**सुरत :** गुजरातच्या सुरत येथे कापड बाजारात भीषण आग लागली. गेल्या २४ तासांत दुस-यांदा ही आग लागली. या आगीत लक्षणीय वाढ झाल्याने ही आग मार्केटच्या पाचव्या मजल्यावर पसरली. आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाच्या ५० हून अधिक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. सुरतमधील शिवशक्ती कापड बाजारात भीषण आग लागली. मार्केटमध्ये सुमारे ८०० दुकाने असून, ती सर्व कपड्याची आहेत. त्यामुळे आग वेगाने पसरली आणि जवळपास संपूर्ण इमारतीला आग लागली.


सूरतमध्ये लागलेल्या या आगीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याचा व्हीडीओही समोर आला आहे, ज्यामध्ये आग किती प्रमाणात पसरली आहे, हे पाहायला मिळत आहे. अग्निशमन विभागाच्या पथकाने आग आणखी पसरण्यापासून रोखले असले तरी या आगीमुळे शिवशक्ती टेक्सटाईल मार्केटचे मोठे नुकसान झाले आहे. ज्या इमारतीला आग लागली तेथे सुमारे ८०० दुकाने असल्याने आग आटोक्यात आणण्याचे हे आव्हान होते.



## भारतीय मच्छीमार मायदेशी परतले

**चेन्नई :** श्रीलंकेने परत पाठवलेले २७ भारतीय मच्छीमार मायदेशी परतले आहेत. सागरी सीमा रेषा ओलांडल्याच्या आरोपाखाली श्रीलंकेच्या नौदलाने यापूर्वी अटक केलेले मच्छीमार बुधवारी हवाई मार्गाने येथे दाखल झाले. कोलंबो येथील भारतीय उच्चायुक्तालयाने मच्छीमारांना त्यांच्या परतीच्या प्रवासात मदत केली.

## धनुषचा 'कुबेर' २० जूनला प्रदर्शित होणार



**चेन्नई :** धनुषचा 'कुबेर' २० जूनला प्रदर्शित होणार तमिळ सुपरस्टार धनुषचा आगामी चित्रपट 'कुबेरा' येत्या २० जून रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. शेखर कंमुला दिग्दर्शित हा चित्रपट तमिळ, तेलुगू, हिंदी, कन्नड आणि मल्याळम या पाच भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. यात नागार्जुन, रश्मिका मंदाना आणि जिम सरभ यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. अखिल भारतीय सिनेमॅटिक तमाशा म्हणून डब करण्यात आलेल्या या चित्रपटाला श्री वेंकटेश्वर सिनेमाज एलएलपी आणि अमिगोस क्रिएशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे सहकार्य लाभले आहे.

## सरपंचाचा दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार

**नाशिक :** नाशिकमध्ये क्रूरतेचा कळस गाठणारी अमानुष घटना उघडकीस आली आहे. येथील एका सरपंचाने गावातील दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केला आहे. आरोपीने अहिल्यानगर, शिर्डी, त्र्यंबकेश्वरसह विविध ठिकाणी घेऊन जात मुलींवर अत्याचार केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे आरोपी सरपंचाला पीडित मुलींच्या आजीनेच साथ दिली आहे. आजीच्या संगनमतानेच आरोपीने पीडित मुलींचे लैंगिक शोषण केले आहे. आरोपीच्या सततच्या त्रासाला कंटाळल्यानंतर अखेर पीडित मुलींनी पोलिस ठाण्यात धाव घेत या घटनेला वाचा फोडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी अ‍ॅट्रॉसिटीसह बाल लैंगिक अत्याचार कायद्याअंतर्गत तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

# 'वक्फ' बदलांना मंत्रिमंडळाची मान्यता

## संसदेत सुधारित विधेयक सादर होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळाने वक्फ विधेयकातील प्रस्तावित बदलांना मान्यता दिली आहे. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात हे विधेयक संसदेत मांडले जाऊ शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली. वक्फ विधेयकात व्यवस्थापन करणाऱ्या केंद्रीय आणि राज्य वक्फ बोर्डांचे नियमन करणाऱ्या कायद्यांमध्ये ४४ बदल प्रस्तावित आहेत. केंद्र सरकार अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात संसदेत सुधारित विधेयक सादर होण्याची शक्यता असल्याचे वृत्त आहे.

वक्फ विधेयकाबाबत केंद्रीय मंत्रिमंडळाने संयुक्त संसदीय समितीने म्हणजेच जेपीसीने केलेले १४ बदल स्वीकारले आहेत. अलिकडेच, विरोधकांनी जेपीसी अहवालाबाबत प्रश्न उपस्थित केले होते. त्यामध्ये त्यांनी सुचवलेल्या बदलाचा समाविष्ट नसल्याचा आरोप केला होता.

अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये लोकसभेत वक्फ विधेयक सादर केले. यानंतर ते 'जेपीसी'कडे पाठवण्यात आले होते. 'जेपीसी'मध्ये भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांचे १६ खासदार होते, तर विरोधी पक्षांचे १० खासदार होते. ६५५ पानांचा हा अहवाल फेब्रुवारीच्या सुरुवातीला संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात आला. भाजप खासदार जगदंबिका पाल आणि संजय जयस्वाल यांनी लोकसभेत 'जेपीसी' अहवाल सादर केला होता. त्यांनी संयुक्त समितीसमोर दिलेल्या पुराव्यांची नोंदही सभागृहाच्या पटलावर ठेवली. मेधा कुलकर्णी यांनी राज्यसभेत जेपीसी अहवाल सादर केला. संसदीय समितीने बहुमताने अहवाल स्वीकारला, जरी समितीतील विरोधी पक्षांच्या सर्व ११ खासदारांनी अहवालावर आक्षेप घेतला होता. त्यांनी असहमती नोट्स देखील सादर केल्या होत्या. जेपीसी अहवाल सभागृहात मांडला गेला तेव्हा बराच गोंधळ झाला होता.

### काय बदल होतील?

● या विधेयकानुसार आता वक्फ मालमत्तेची नोंदणी जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात अनिवार्य करण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे मालमत्तेचे मूल्यांकन करता येईल. या कायद्याच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर वक्फ मालमत्ता म्हणून ओळखली गेलेली किंवा घोषित केलेली कोणतीही सरकारी मालमत्ता वक्फ मालमत्ता मानली जाणार नाही'. एखादी मालमत्ता वक्फ मालमत्ता आहे की सरकारी जमीन हे ठरवण्यासाठी जिल्हाधिकारी मध्यस्थ असतील. त्यांचा निर्णय अंतिम असेल. एकदा निर्णय घेतल्यानंतर जिल्हाधिकारी महसूल नोंदींमध्ये आवश्यक बदल करू शकतात आणि राज्य सरकारला अहवाल सादर करू शकतात. विधेयकात असेही म्हटले आहे की, जोपर्यंत जिल्हाधिकारी राज्य सरकारला त्यांचा अहवाल सादर करत नाहीत तोपर्यंत अशी मालमत्ता वक्फ मालमत्ता म्हणून गणली जाणार नाही.

# जग्गी वासुदेवांचे 'आमंत्रण' काँग्रेसला नाही रुचलं!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** ईशा फाउंडेशनचे संस्थापक, सद्गुरू जग्गी वासुदेव यांनी महाशिवरात्री कार्यक्रमाचे आमंत्रण कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांना दिले. बुधवारी झालेल्या कार्यक्रमात शिवकुमार हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत एका व्यासपीठावरही बसले. मात्र जग्गी वासुदेवांचे निमंत्रण काँग्रेसला रुचले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अखिल भारतीय काँग्रेस समिती (एआयसीसी) सचिव पीव्ही मोहन यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत आपली नापसंती व्यक्त केली. तसेच काही सवालही उपस्थित केले आहेत. दरम्यान, शिवकुमार यांनी आमंत्रण स्वीकारण्यामागील आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

महाशिवरात्रीनिमित्ता कोइम्बतूर येथील सद्गुरूंच्या ईशा योग केंद्रात ईशा फाउंडेशनच्या वतीने उत्सवाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमाचे आंमत्रण कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनाही देण्यात आले होते. त्यांनीही ते स्वीकारत सोशल मीडियावर पोस्ट करत सद्गुरू जग्गी वासुदेव यांचे आभार मानले. शिवकुमार यांनी ईशा योग केंद्रातील त्यांच्या अनुभवाबद्दल सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केले. तसेच आमंत्रणाचा फोटो आणि सद्गुरुंना "धन्यवाद" अशी पोस्टही केली.

डी. के. शिवकुमारांनी केलेल्या पोस्टवर अखिल भारतीय काँग्रेस समिती (एआयसीसी) सचिव पीव्ही मोहन यांनी नाराजी व्यक्त केली. एक्स वर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी शिवकुमार यांच्या कृतीमुळे पक्षाच्या गाभाला नुकसान होते, असे म्हटलं. तसेच शिवकुमार यांना टॅग करून त्यांनी त्यांच्या पोस्टमध्ये विचारले की, "एका धर्मनिरपेक्ष पक्षाचे अध्यक्ष असताना राहुल गांधींची खिल्ली उडवणाऱ्या व्यक्तीचे ते आभार कसे मानू शकतात, असा सवालही केला आहे.

## काशी विश्वनाथ मंदिरात ११ लाखांहून अधिक भाविक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाराणसी (उत्तर प्रदेश) :** महाशिवरात्रीला वाराणसीत भाविकांची मोठी गर्दी झाली असून ११.६९ लाखांहून अधिक लोकांनी काशी विश्वनाथ मंदिराचे दर्शन घेतले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या निर्देशानुसार स्थानिक प्रशासनाने भाविकांसाठी सर्वंकष सुरक्षा, गर्दीचे सुरळीत व्यवस्थापन आणि आवश्यक सुविधा सुनिश्चित केल्या. काशी विश्वनाथ मंदिर प्रशासनाच्या देखरेखीखाली अखंड दर्शनाचा अनुभव घेता यावा यासाठी पद्धतशीर व्यवस्था करण्यात आली होती.



# शशी थरूर यांचे पक्षांतरावर संदिग्ध उत्तर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** "पक्षाला माझी गरज असेल तर मी पक्षात राहीन. अन्यथा माझ्याकडे इतर पर्याय आहेत. तुम्ही असे समजू नका की, माझ्याकडे दुसरा कोणताही मार्ग नाही," असे विधान करत ज्येष्ठ नेते शशि थरुर यांनी केरळ काँग्रेसमध्ये खळबळ माजवली आहे. आता काँग्रेस पक्षात राहणार का, या प्रश्नावरही त्यांनी संदिग्ध उत्तर दिल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि तिरुअनंतपुरमचे खासदार शशी थरूर हे राजधानी दिल्लीत शुक्रवारी (दि. २८) होणाऱ्या पक्षश्रेष्ठींच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. या बैठकीसाठी केरळमधील वरिष्ठ नेत्यांनाही आमंत्रित करण्यात आले आहे. राज्यात पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांवर चर्चा, तसेच पक्षांतर्गत वादावर तोडगा काढण्यासाठी ही बैठक होत असल्याचे मानले जात आहे. या बैठकीपूर्वी 'माझ्याकडे इतर पर्याय आहेत', असे विधान केल्याने थरूर काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देणार, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

"मी शुक्रवारी दिल्लीत होणाऱ्या पक्षाच्या बैठकीला जाईन. काय होते ते पाहूया," असे शशि थरुर यांनी म्हटले. दरम्यान, मागील काही दिवसांपासून केरळ काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद समोर आले आहेत. शशी थरुर यांनी नुकतेच स्टार्टअप धोरणाचे कौतुक केले. यानंतर एका पॉडकास्ट मुलाखतीत दिलेल्या "जर पक्षाला माझी गरज असेल तर मी राहीन. नसेल तर माझ्याकडे इतर पर्याय आहेत. तुम्ही असे समजू नका की माझ्याकडे दुसरा कोणताही मार्ग नाही.", असे त्यांनी स्पष्ट केल्याने चर्चेला आणखी उधाण आले. केरळ काँग्रेसमधील सर्व घडामोडींनंतरही शशी थरूर हे काँग्रेस पक्ष सोडणार का, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. आता सर्वांच्या नजरा शुक्रवार, २८ फेब्रुवारी रोजी दिल्लीत होणाऱ्या बैठकीकडे लागले आहे.

"माझे कोणत्याही राज्यातील नेत्याशी कोणतेही मतभेद नाहीत. कोणाला माझ्याविषयी काही समस्या असेल तर ती सोडवायची की नाही, हे त्यांच्यावर अवलंबून आहे. माझी कोणाविरुद्धही तक्रार नाही. माझे मत कोणत्याही डाव्या विचारसरणीच्या कागदपत्रांवर आधारित नाही. ते ग्लोबल स्टार्टअप अहवाल आणि केंद्र सरकारच्या व्यवसाय सुलभता अहवालावर आधारित आहे. कोणाकडे यापेक्षा अधिक विश्वासार्ह स्रोत असेल तर मी माझ्या लेखात दुरुस्त करण्यास तयार आहे."

— **शशी थरूर,** काँग्रेस नेते

# सासवडमधील शिवालये फुलली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** महाशिवरात्रीच्या निमित्ताने बुधवारी सासवड परिसरातील सिद्धेश्वर, चांगा वटेश्वर, शहरातील शिवालय, संगमेश्वर आदी मंदिरातून हजारो भाविकांच्या दर्शनासाठी दिवसभर रांगा लागल्याचे चित्र पाहावयास मिळाले. शिवपूजा, अभिषेक, महाप्रसाद वाटप अशा स्वरुपातील अनेक कार्यक्रम दिवसभर सुरूच होते.

सासवडच्या पश्चिमेकडील पांडवकालीन व वास्तूशास्त्राचा उत्तम नमुना असणाऱ्या श्री सिद्धेश्वर मंदिरात काल मध्यरात्री सिद्धेश्वर भजनी मंडळाच्या एकतारी भजनाचा कार्यक्रम झाला त्यानंतर पहाटे चार वाजता मंदीर व्यवस्थापनाकडून महारुद्र अभिषेक संपन्न झाला. प्रवीण खळदकर यांनी यावेळी पौराहित्य केले. अनेक भाविकांनी शिवालयात अभिषेक केले. संदीप व राजेंद्र जगताप यांनी दिवसभर उत्तम संयोजन केले. नंदूबापू जगताप व त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने मंदिराची फुलांनी व फळांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती तर प्रशांत ज्ञानोबा जगताप यांनी





येणाऱ्या सर्व भाविकांसाठी खिचडी व ताक तर दीपकअप्पा जगताप यांनी गुडदाणी वाटप केले. सासवड पोलिस स्टेशनने दर्शन रांगा साठी दोन कर्मचारी नेमल्याचे संदिप जगताप यांनी सांगितले. केतकावळे येथील बालाजी मंदिर व्यवस्थापनाकडून देखील सिद्धेश्वर मंदिरात नित्यपुजा, स्वच्छता यासाठी विशेष सहकार्य लाभले असेही जगताप यांनी सांगितले. पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप यांनी भेट देऊन शिव दर्शन घेतले. निसर्गरम्य अशा मंदीर परिसरात भाविकांनी दर्शनाबरोबर सेल्फीचा आनंद घेतला

सासवडच्या पालखी तळावर प्रजापिता ब्रम्हाकुमारी विद्यालयाच्या वतीने बारा ज्योतिर्लिंग दर्शन, ध्यान धारणा आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे नीलिमा दिदी यांनी सांगीतले. सासवडच्या मानाच्या समजल्या जाणाऱ्या शिखर शिंगणापूर कावडीचे प्रस्थान होणाऱ्या शहरातील शिवालय या मंदीरात दर्शनाला भाविकांनी गर्दी केली. तेथेही भाविकांना खिचडी वाटप करण्यात आले. पुरातन चांगा वटेश्वर मंदिरात मध्यरात्री प्रथम प्रहरी रुद्र अभिषेक अमोल बेलसरे यांच्या पौराहित्याखाली कऱण्यात आला देवस्थानचे प्रसाद जगताप यांनी मंदिरात सपत्नीक महापूजा व अभिषेक केला. देवस्थानं सुधार समितीचे परशुराम देशमुख, धनंजय गाडेकर, रोहित जगताप, विशाल जंगम, शुभांगी न्हालवे यांसह डॉ राजेश दळवी, डॉ संजय रावळ, डॉ अशोक माईनकर व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. संगमेश्वर मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी दिवसभर गर्दी केल्याचे पाहावयास मिळाले. एकूणच सर्व परिसरात महा शिवरात्री मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

## नीरा येथे महाशिवरात्र उत्साहात साजरी



**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरा येथे महाशिवरात्रीनिमित्त बुधवारी नीरा नदीकाठावर असलेल्या शंभू महादेवाच्या मंदिरामध्ये भाविकांनी दर्शनासाठी सकाळपासून मोठी गर्दी केली होती. महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, तर महादेव मंदिराला विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

नीरा येथील शंभू महादेवाला बुधवारी पहाटे पाच वाजता अभिषेक करण्यात आला. सकाळी सहा ते दुपारी बारा वाजे पर्यंत शिवलिलामृत पारायण झाले. संध्याकाळी चार ते साडेसात वाजेपर्यंत स्थानिक भजनी मंडळाचे भजन व भक्तीगीत गायन, सामुहिक आरती व ह.भ.प. राकेश महाराज मोरे यांचे किर्तन अशा विविध कार्यक्रमांचे दिवसभर मंदिर परिसरात आयोजन करण्यात आले होते. भाविकांना दर्शनासाठी मंदिर दिवसभर खुले करण्यात आले होते. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. गुरूवारी (दि. २७) दुपारी बारा ते तीन वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरिता गारोळे परिवाराने परिश्रम घेतले.

## शिक्षकाकडून विद्यार्थिनीचा विनयभंग

**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यातील कारेगाव येथे काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषद शाळेतील शाळकरी मुलींचा विनयभंग शिक्षकाने विनयभंग केल्याची घटना ताजी असताना नुकतेच कोळगाव डोळस येथे शिक्षकाने अल्पवयीन शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली असल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे बाळासाहेब धोंडीबा गुंजाळ या शिक्षकावर बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोळगाव डोळस येथील जिल्हा परिषद शाळेतील पिडीत मुलगी काही मानसिक तणावात राहत शाळेमध्ये जाण्यास नकार देत असल्याने, मुलीच्या पालकांनी तिला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, शाळेतील गुंजाळ गुरुजी हे शाळेच्या ऑफिसमध्ये बोलावून घेऊन झाडू मारण्यास सांगून अश्लील गैरवर्तन करत असून, वेळोवेळी पट्ट्याने मारण्याची धमकी देत असल्याचे तिने पालकांना सांगितले. मुलीने सांगितलेल्या प्रकाराने संतप्त झालेल्या पालकांनी शाळेमध्ये जात संताप व्यक्त केला. याबाबत पालकांनी शिरुर पोलीस स्टेशन फिर्याद दिल्याने, पोलिसांनी बाळासाहेब धोंडीबा गुंजाळ (रा. कोळगाव डोळस ता. शिरुर) या शिक्षकावर बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

कोळगाव डोळस येथील घडलेल्या घटनेबाबत गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर यांच्याशी संपर्क साधला असताना सदर घटनेबाबत शिक्षण विभागाने चौकशी समिती नेमली असून चौकशी अहवाल नंतर त्या शिक्षकावर निलंबनाची कारवाई केली जाणार असल्याचे गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर यांनी सांगितले.

## तारीख काही ठरेना! पुन्हा इच्छुकांच्या पदरी निराशा

**पुणे :** गेल्या चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. ओबीसी आरक्षण आणि इतर कारणांमुळे या निवडणुका अद्यापर्यंत झालेल्या नाहीत. राज्यात विधानसभेच्या निवडणुका झाल्यानंतर पुढच्या काही महिन्यांतच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तारीखा जाहीर केल्या जाणार असे बोलले जात होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयात तारीख पे तारीख अशी परिस्थिती या निवडणुकीविषयी झालेली दिसत आहे.



नुकत्याच जाहीर झालेल्या तारखेत निवडणुकीच्या तारखांची घोषणा करण्यात येईल असे दिसत होते. मात्र, परत एकदा ५ मार्चला याची सुनावणी होणार आहे. यामुळे पुन्हा एकदा इच्छुकांचा हिरमूड झाला आहे. विधानसभेची धामधुम संपल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने अनेकांनी तेव्हापासूनच सुरूवात केली. निवडणुका लांबणीवर पडल्याने पुन्हा एकदा इच्छुकांच्या पदरी निराशा आली आहे. राज्यातील सर्व स्थानिक संस्थांचा कारभार सध्या प्रशासनाच्या हाती असल्याने राजकीय पक्षांमध्ये चलबिचल सुरू आहे. ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी घेऊन निकाल दिल्यानंतर पुढील काही महिन्यात निवडणुका होतील, अशी आशा निवडणूक लढवणाऱ्यांना आहे. त्यामुळे राजकीय मंडळींच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी इच्छुकांकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. काही इच्छुकांनी तर गेल्या काही दिवसांपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. मकरसंक्राती निमित्त हळदी कुंकवाचे कार्यक्रम, देव दर्शन यात्रांचे नियोजन करण्यात आले आहे. ऑक्टोबरमध्ये या निवडणुका होऊ शकतात असे सांगण्यात आले आहे. ५ मार्चला सर्वोच्च न्यायालय निवडणुकीची तारीख जाहीर करणार का की पुन्हा एकदा पुढची तारीख मिळणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

# आळंदी पंचक्रोशीत भाविकांची गर्दी

## शिवमंदिरांत महाशिवरात्र परंपरेने मोठ्या भक्तिमय उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** येथील अलंकापुरी पंचक्रोशीतील विविध तसेच माऊली मंदिरातील पुरातन श्री सिद्धेश्वर, श्री काशीविश्वेश्वर, श्री काळ भैरवनाथ दीर, श्री वैतागेश्वर महाराज मंदिर, श्री वाघेश्वर महाराज मंदिर, श्री महादेव बेली आदी शिवमंदिरांत महाशिवरात्र परंपरेने मोठ्या भक्तिमय उत्साहात धार्मिक मंगलमय वातावरणात महाशिवरात्र साजरी करण्यात आली.

शिवरात्री दिनी विविध व्रत, उपवास करीत आळंदी पंचक्रोशीतील शिव मंदिरांत महाप्रसादाचे वाटप करत साजरी करण्यात आली. महाशिवरात्री निमित्त आळंदी मधील पुरातन वैतागेश्वर मंदिरात देखील परंपरेने महाशिवरात साजरी करण्यात आली. येथे अतुल लोणकर यांचे वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला. येथील जय गणेश मंदिरात शिरात्री निमित्त धार्मिक कार्यक्रम करत दूध महाप्रसाद वाटप झाले.

आळंदी पंचक्रोशीतील शिवमंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम झाले. माऊली मंदिरात हजारो भाविकांनी रांगा लावून श्रींचे दर्शन घेतले. आळंदी पंचक्रोशीतील शिवमंदिर श्री वाघेश्वर महाराज मंदिर, श्री नागेश्वर महाराज मंदिर, श्री धनेश्वर महाराज मंदिर, श्री चक्रेश्वर महाराज मंदिर, वडगाव घेनंद येथील पुरातन पांडव कालीन श्री बेली महादेव मंदिर आदी मंदिरात भक्तांनी दर्शनासाठी अलोट गर्दी केली होती. तसेच येथील माऊली मंदिरात असणारे पुरातन श्री सिद्धेश्वराचे मंदिर, आळंदीतील सिध्दबेटातील शिव मंदिरात देखील भाविकांनी गर्दी केली होती. येथील मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने फुलला होता. शिवभक्तीमय वातावरण सर्वत्र पाहण्यास मिळाले. भाविकांचे गर्दीने मंदिर प्रागंण फुलून गेले होते. परिसरातील शिवमंदिरात भक्तांनी दिवसभर दर्शनासास गर्दी केली होती. माऊली मंदिरात भक्तांचा उत्साह होता. भक्तांचे दर्शनास व्यवस्था आळंदी देवस्थानचे मुख्य व्यवस्थापक माऊली वीर, उपव्यवस्थापक तुकाराम माने यांनी सेवक कर्मचारी, सुरक्षा रक्षक यांचे सहकार्याने उत्तम ठेवली. कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना श्रींचे दर्शनाचा लाभ देण्यात आल्याचे व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले. माऊली मंदिरात पहाटे श्रीना अभिषेख पूजा, महानैवेद्य, कीर्तन, ११ ब्रम्हवृंदांचे वतीने महाशिवरात्रीचा रुद्राभिषेख प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथ गुरु शांतीनाथ यांचे हस्ते मंदिरातील परंपरेने होत आहे.



### आळंदी देवस्थानतर्फे महाप्रसाद

● आळंदी देवस्थान तर्फे देखील महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. काळेवाडी येथील श्री काशीविश्वेश्वर शिव मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम शिवलिलाअमृत पारायण, महाप्रसाद वाटप, कीर्तन, पारायण सेवा झाली. यासाठी संयोजन सुवर्णाताई काळे, मेघाताई काळे यांनी केले.

यावेळी परायणासह महापूजा अभिषेक पूजा उत्साहात झाली. यासाठी महिलांची मोठी उपस्थिती होती. यावेळी श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती अध्यक्ष प्रकाश काळे, महिला बचत गट महासंघ अध्यक्षा सुवर्णा काळे, बाबुलाल काळे, आळंदी जनहित फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, गोविंद ठाकूर तौर, बंडूनाना काळे आदींसह भाविक उपस्थित होते.

### साडेसात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

# गोमांस विक्री प्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** कत्तल करुन दोन लाख रुपये किमतीचे एक हजार किलो गोमांस घेवून जाणा-या पाच जणांवर गुन्हा दाखल करुन इंदापूर पोलीसांनी त्यांच्याकडील गोमांस, गुन्ह्यात वापरण्यात आलेली वाहने व इतर सुमारे ७ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

मंगळवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास राजवडी गावच्या हद्दीत गायरान जागेत ही कारवाई करण्यात आली. बुधवारी पहाटे दोन वाजता गुन्हा दाखल करण्यात आला. फरीद मोहमद शेख (वय २७ वर्षे रा.सरस्वतीनगर, इंदापूर) वासिम मनेर कुरेशी (वय २७ वर्षे रा.कुरेशी गल्ली इंदापूर), रेहान बशीर कुरेशी (वय २४ वर्षे रा. कासारपटटा इंदापूर), सलीम रज्जाक बेपारी (वय ३६ वर्षे),मुस्तफा शकील कुरेशी (वय २४ वर्षे दोघे रा. श्रीराम चौक इंदापूर) अशी आरोपींची नावे आहेत. पोलीस कर्मचारी गणेश डेरे यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलीसांनी त्यांच्याकडून २ लाख रुपये किमतीचे १ हजार किलो गोमांस, प्रत्येकी १ हजार रुपये किमतीची ५ जर्सी वासरे, दोनशे रुपयांचा वजनकाटा, अडीच लाख रुपये किंमतीचा अशोक लेलंड कंपनीचा चार चाकी टेम्पो, ३ लाख रुपयांची महेंद्र कंपनीची पांढऱ्या रंगाची स्कार्पिओ गाडी असा एकूण ७ लाख ५५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोग्य विभागाचा कोणता ही परवाना नसताना, स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी संगनमत करुन जनावरांची कत्तल करुन गोमांस घेवून जात असताना आरोपी सापडले. जनावरांच्या चारापाण्याची कोणती ही सोय न करता त्यांना वाहनात दाटीवाटीने कोंबून वाहतुक केली या आरोपावरुन इंदापूर पोलीसांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांनी दिली.

# कारेगावात महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी भाविकांची गर्दी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** 'कारेश्वर महाराज कि जय, ॐ नमः शिवाय' चा जयघोष करत महाशिवरात्रीनिमित्त हजारो भाविकांनी कारेगाव, ता.शिरुर येथील ग्रामदैवत श्री कारेश्वर महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले. मंगळवारी, दि. २५ रोजी रात्री सव्वा बारा वाजता आळंदी देवस्थानचे विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे,पंचायत समितीचे माजी सभापती विश्वास कोहकडे,युवा उद्योजक शुभम नवले आणि संदीप गवारे यांच्या हस्ते सपत्नीक श्रींचा महारुद्राभिषेक संपन्न झाल्यानंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. यावेळी प्रदेश राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या कार्याध्यक्षा निर्मला नवले, सरपंच वृषाली गवारे, वनिता कोहकडे, उद्योजक सुनिल ओस्तवाल, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष रामजी नवले, उपाध्यक्ष ॲड हिरामण गावडे, सचिव गुलाबराव नवले, शांताराम तळेकर, डॉ. आत्माराम गावडे, शहाजी तळेकर यांसह ग्रामस्थ व भाविक यावेळी उपस्थित होते.

शिवरात्रीनिमित्त मंदिर गाभारा व परिसरात फुलांची आकर्षक सजावट गुरुकुल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोक नवले, उद्योजक आदिनाथ नवले व पोपटराव फलके यांसह तळेकर कुटुंबियांच्या वतीने करण्यात आली होती.तर देवस्थान ट्रस्टच्या वतीने मंदिर व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. स्थानिकांसह परप्रांतीय कामगारांनी श्री कारेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी दिवसभर गर्दी केली होती.



**कारेगाव** येथील ग्रामदैवत श्री कारेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी महाशिवरात्रीनिमित्त भाविकांनी गर्दी केली होती. शिवरात्रीनिमित्त मंदिर गाभारा व परिसरात फुलांची आकर्षक सजावट केली होती. (छायाचित्र - पोपट पाचंगे, कारेगाव.)

# शिरूरमध्ये रासायनिक खतांची अधिक दराने विक्री




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** शिरुर तालुक्यात रासायनिक खतविक्री दुकानदार खते किंमती पेक्षा अधिक दराने विक्री करत असून दुसरीकडे युरियाचा मोठा साठा शिल्लक असताना शेतकऱ्यांना युरिया शिल्लक नसल्याचे कारण रासायनिक खत विक्री दुकानदार देत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमधून नाराजीचा सुर उमटत आहे. शिरूर तालुक्यात चाललय तरी काय? कृषी विभाग आर्थिक तडजोडीमुळे निद्रीस्त अवस्थेत असून दुकानदार मात्र बिनधास्त असून शेतकऱ्यांचा खतांसाठी छळ होत आहे. अश्यातच सामाजिक कार्यकर्ते निलेश यशवंत वाळुंज यांनी हा गैरप्रकार उघडकीस आणला आहे.

अन्नापुर येथील शेतकरी तथा सामाजिक कार्यकर्ते निलेश यशवंत वाळुंज यांनी दिनांक २४ फेब्रुवारी रोजी अन्नापूर येथील यशवंत ॲग्रो येथे फ़ोन करून युरिया आहे का? याबाबत विचारणा केली असता संबंधित दुकानात युरिया शिल्लक नसल्याचे सांगण्यात आले,यानंतर वाळुंज यांनी शिरूर येथील बढे ॲग्रो एजन्सी शिरूर येथे जाऊन चौकशी केली असता तेथे युरिया उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले परंतु त्यासाठी ३००/- रु लागतील असे सांगण्यात आले, वाळुंज यांनी ही रक्कम इतर यूपीआयद्वारे दुकानदार यांना क्यूआर कोड द्वारे ऑनलाइन पद्धतीने पाठवली. सुरवातीला साधे बील देण्यात आले होते. वाळुंज यांनी संगणक बिलाची मागणी केली. त्यानंतर बील देण्यात आले आणि एक गोणी युरिया छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ असलेल्या गोदामातून देण्यात आली. युरियाची अनुदान वजा विक्री किंमत २६६.५ आहे परंतु यासाठी जवळपास ३४/- रुपये एका गोणी मागे जास्त घेतले गेले, असल्याने याप्रकरणी वाळुंज यांनी फोन आणि व्हॉट्स ॲप च्या माध्यमातून लेखी तक्रार तालुका कृषी अधिकारी शिरूर सुवर्णा आदक, जिल्हा कृषी विकास अधिकारी जि.प. अजित पिसाळ, यांच्याकडे केली आहे. तसेच तालुका कृषी अधिकारी सुवर्णा आदक यांच्या कार्यालयात भेटूनही तक्रार देत यामुळे शेतकरी कसा भरडला जातो याची व्यथाच मांडली.

"चढ्या युरिया विक्री करणाऱ्या संबंधित दुकानी जाऊन खात्री करून घेतली आहे आणि त्यांना योग्य ती समज देण्यात आली असून, याप्रकरणी व अन्नापुर येथील यशवंत अग्रो या दुकानदारानी ४.०५ मे.ट. युरिया शिल्लक असूनही त्यांनी युरिया शिल्लक नसल्याचे सांगितल्याप्रकरणी पुढील कारवाई करण्यात येणार आहे."
**— सुवर्णा आदक,** तालुका कृषी अधिकारी

# खा. डॉ कोल्हे यांचे खोटे आश्वासन

## माजी सरपंच कुंडलिक कोहिनकर यांचा सणसणीत आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खासदार डॉ अमोल कोल्हे यांनी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घ्यायला भाग पाडले. मात्र, दिल्या शब्दाप्रमाणे त्यांनी तो प्रश्न संसदेत उपस्थित केला नाही. असा थेट आरोप करून शिरूरचे खासदार डॉ अमोल कोल्हे यांच्यावर नाराजी व्यक्त करून याबाबत पुराव्यानिशी तक्रार अर्ज देवुनही कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने येत्या शुक्रवारी (दि. २८ ) मुंबई येथील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा सरपंच परिषदेचे पुणे जिल्हा समन्वयक व खेड तालुक्यातील आदर्श गाव कोहिनकरवाडीचे सरपंच कुंडलिक कोहिनकर यांनी बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिला.

देशातील सुमारे अडीच लाख ग्रामपंचायती ब्रॉडबॅण्ड नेटवर्कने जोडण्यात येणार होत्या. त्यासाठी केंद्र व राज्य सरकाने ३४ हजार कोटी रुपये निधी खर्च केला. ही योजना मध्येच बंद झाली. यात मोठा भ्रष्टाचार झाला आहे. त्यासाठी २० ऑगष्ट २०२४ रोजी खेड पंचायत समितीपुढे उपोषण केले. उपोषणाच्या आठव्या दिवशी खासदार डॉ अमोल कोल्हे यांनी भेट घेऊन आश्वासन दिले. हा प्रश्न संसदेच्या अधिवेशनात मांडू. मात्र त्यांनी या प्रश्नांकडे पाठ फिरवली. खासदार डॉ. कोल्हे यांनी कोणतीच कारवाई केली नाही. त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र प्रतिसाद दिला नाही. 'संसदरत्न' म्हणून त्यांच्याकडे आम्ही पाहतो. संसदेत केवळ भाषणे करण्यासाठी खासदार जातात का ? यात आपले खासदार जर संसदेत आवाज उठवत नसतील तर महत्वाचे प्रश्न कसे सुटतील? असे कोहिनकर यांनी म्हटले आहे.

"राष्ट्रीय संपत्ती म्हणून घोषित" केलेली ही योजना अमलात आली नाही. भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेड माध्यमातून देशातील सुमारे अडीच लाख ग्रामपंचायती ब्रॉडबँडने जोडण्यासाठी ३४ हजार २२५ कोटी ११ लाख रुपये निधी उपलब्ध केला होता. त्यासाठी ०५ ऑगष्ट २०१४ ते २५ जुलै २०२२ हा कालावधी देण्यात आला होता. ही योजना शासनाकडून राबविण्यात आली होती. या योजनेची अंमलबजावणी शासनाने सुरू केली. देशातील अनेक ग्रामपंचायती पर्यंत ब्रॉडबँडची ऑप्टिकल केबल टाकल्या. ग्रामपंचायत पासून पंचायत पंचायत समित्या, जिल्हा परिषदांना ऑप्टिकल केबलने जोडल्या. मात्र ही योजना इथपर्यंतच थांबली. प्रत्यक्षात कोणत्याच ग्रामपंचायतीमध्ये ब्रॉडबँड नेटवर्क सुरूच झाली नाही.

या संदर्भात कुंडलिक कोहिनकर यांनी राजगुरुनगर येथे आज बुधवारी पत्रकार परिषद घेतली. यावेळी सातकरस्थळचे माजी सरपंच मारुती सातकर, रामदास पाचारणे, कोहिनकरवाडीचे माजी उपसरपंच संदीप उबाळे व इतर उपस्थित होते. पत्रकार परिषदेत बोलताना कुंडलिक कोहिनकर म्हणाले, केंद्र, राज्य शासन आणि भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेड यांच्यात या योजनेसाठी "राष्ट्रीय संपत्ती" म्हणून करार झाला. ही योजना सुरु झाली, मात्र अर्ध्यावर बंद झाली. ३४ हजार कोटी रुपयांचा निधी केंद्र आणि राज्य सरकारने उपलब्ध केला. अर्धे काम झाले पुढे ते बंद झाले यात मोठा आर्थिक अपहार झाला आहे. जनतेचा पैसा वाया गेला आहे. पाठपुरावा केला मात्र शासनाकडून कोणतीच माहिती दिली जात नाही.

### सुविधा सुरू झालीच नाही

केंद्र आणि राज्य शासनाचा महत्वकांक्षी प्रकल्प व देशातील सर्व ग्रामपंचायती ऑनलाईन होण्यासाठी ब्रॉडबॅण्ड नेटवर्क लि. बीएसएनएल मार्फत ग्रामपंचायतींना देण्यात येणारी नेटवर्किंग सुविधा सुरूच झालीच नाही. यासाठी शासकीय स्तरावर कुंडलिक कोहिनकर यांनी पाठपुरावा केला मात्र यश आले नाही. सरपंच कोहिनकर यांनी ३ ऑगष्ट २०२२ पासून योजनेबाबत केंद्र राज्य सरकार आणि संबंधित कंपनीकडे पाठपुरावा केला. यासाठी दि.९ऑगष्ट २०२३ रोजी पुणे जिल्हा परिषदेसमोर आत्मक्लेश आंदोलन केले. दि.२० ऑगष्ट २०२४ पासून ८ दिवसांचे खेड पंचायत समितीपुढे उपोषण केले होते. खासदार डॉ अमोल कोल्हे यांनी याबाबत आश्वासन दिल्यानंतर त्यांनी आमरण उपोषण मागे घेतले होते. आता थोर समाजसेवक अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच परिषदेच्या माध्यमातून आझाद मैदानावर येत्या शुक्रवारी (दि २८) रोजी आमरण उपोषणास बसणार आहे. याची दखल न घेतल्यास देशभर आंदोलन करण्यात येणार आहे.

**- कुंडलिक कोहिनकर,** समन्वयक सरपंच परिषद पुणे.



# उन्हाळा सुरू होताच वाजु लागले सर्वत्र रसवंती गृहाचे घुंगरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोण-धामणी :** उन्हाळ्याची चाहूल लागताच ग्रामीण भागात ठिकठिकाणी रसवंतीची दुकाने सुरू झाली आहेत. उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी नागरिकांनी उसाच्या रसाला पसंती दिली आहे.

फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापासूनच उन्हाची तीव्रता मोठ्या प्रवाणात जाणवू लागली आहे. उन्हाळा आला की रसवंत्या नजरेस पडतात. यंदा देखील शहरांसह ग्रामीण भागात मुख्य रस्त्यांवर उसाच्या रसाची दुकाने थाटली गेली आहेत. उन्हाची दाहकता व आरोग्यासाठी चांगला असल्याने रसवंतीवर नागरिकांची गर्दी होत आहे. मागील काही दिवसांपासून थंडीने काढता पाय घेतल्याने उन्हाचे चटके वाढू लागले आहेत. दिवसा उकाडा तर रात्री थंडी असे सध्याचे वातावरण आहे. तापमानाची वाटचाल ३१ ते ३२ अंश सेल्सिअसकडे सुरू झाली आहे. उन्हाची दाहकता वाढल्याने, लोकांचा कल उसाच्या रसाकडे वाढल्याचे चित्र आहे.

आंबेगावच्या पूर्व भागातील निरगुडसर, पारगाव, लोणी, पोंदेवाडी,लाखणगाव आदी गावांमध्ये सध्या घुंगरांच्या छमछम आवाजात उसाची रसवंती गृहाची दुकाणे थाटल्याचे चित्र दिसत आहे. लोणी (ता.आंबेगाव ) येथील रसवंती गृह चालक संदिप रोकडे म्हणाले कि, ग्राहकांना ऊसाचा चांगला व थंड रस देण्यासाठी मोठा फ्रीज विकत घेतला. डीफ्रीज मध्ये साधारण ५०-६० किलो बर्फ तयार होतो व तोच बर्फ ऊसाच्या रसात वापरला जातो. साधारण माघी पौर्णिमेनंतर रसवंती गृह चालू केले जाते व जून मध्ये पावसाळा सुरू झाल्यावर बंद करतो. साधारण चार ते पाच महिने हे रसवंती गृह सुरू असते. या काळात जागेची पट्टी व पाणीपट्टी ग्रामपंचायत मध्ये भरावी लागते.


लोणी (ता.आंबेगाव ) येथे रसवंती गृहात ऊसाचा रस पिण्यासाठी जमलेले ग्राहक.

### उसाच्या रसाचे फायदे

● उसाच्या रसात मोठ्या प्रमाणात असलेले फायबर आपल्या पोटाला जास्त काळ तृप्त ठेवते आणि अतिरिक्त वजन घटवण्यास मदत करते. इतकेच नव्हे तर शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी कमी करून आपले हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते. उसाचा रस चेहऱ्यावरील पुरळ कमी करण्यासाठी मदत करतो.

# दरेकरवाडीच्या उपसरपंचपदी संगिता भोसले बिनविरोध



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** दरेकरवाडी ता. शिरुर ग्रामपंचायतच्या उपसरपंचांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदाच्या निवडीत उपसरपंचपदी संगीता अशोक भोसले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

दरेकरवाडी ता. शिरुर ग्रामपंचायतचे उपसरपंच ज्ञानेश्वर चकोर यांनी त्यांचा पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी सरपंच कमल दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रामविकास अधिकारी सोमनाथ घाडगे यांच्या नियंत्रणाखाली उपसरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच कमल दरेकर, मावळते उपसरपंच ज्ञानेश्वर चकोर, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ दरेकर, सिमा दरेकर, विक्रम दरेकर, आशा दरेकर, संगीता भोसले व श्रीमती दरेकर यावेळी उपसरपंच पदासाठी संगीता भोसले यांनी अर्ज दाखल केला, तर त्यांच्या विरोधात अन्य कोणाचाही अर्ज न आल्याने उपसरपंचपदी संगीता अशोक भोसले यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी सोमनाथ घाडगे यांनी जाहीर केले.

दरम्यान निवडीबद्दल नवनिर्वाचित उपसरपंच संगीता भोसले यांचा ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी पोपट दरेकर, संपर दरेकर, दिलीप दरेकर, संभाजी भोसले, सुनील दरेकर, संदीप दरेकर, बाबुराव भोसले, चंद्रकांत दरेकर, संजय दरेकर, अक्षय भोसले, निखील दरेकर, प्रमिला दरेकर, चंद्रभागा भोसले, यमुनाबाई भोसले यांसह आदी उपस्थित होते, तर निवडीनंतर बोलताना गावातील सर्वांना विश्वासात घेऊन गावचा विकास करणार असल्याचे नवनिर्वाचित उपसरपंच संगीता भोसले यांनी सांगितले.

# स्वराज्य सप्ताह अंतर्गत तोरणावर स्वच्छता मोहिम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित 'स्वराज्य सप्ताह' अंतर्गत महाराष्ट्र प्रदेश गडकिल्ले संवर्धन सेल तर्फे आयोजित गडकिल्ले स्वच्छता अभियानात तोरणा गडावरील मंदीरांसह, शिवकालीन व ऐतिहासिक महत्व असलेल्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनिलजी तटकरे तसेच राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित 'स्वराज्य सप्ताह' राज्यभरात साजरा होतोय. महाराष्ट्र प्रदेश गडकिल्ले संवर्धन सेलचे प्रदेशाध्यक्ष योगेश शेलार यांच्या संकल्पनेतून 'स्वराज्य सप्ताह' गडकिल्ल्यांवर स्वच्छता अभियान राबवून साजरा करण्यात आले. या अभियानाचाच भाग म्हणून तोरणा गडावरील तोरणेश्वर मंदिर, मेंगाई देवीचे मंदिर व महादेव मंदीरात व आवाराची स्वच्छता करून पूजा करण्यात आली.

पर्यटकांकडून टाकण्यात आलेल्या प्लास्टिक बाटल्या व प्लास्टिकच्या पिशव्या गोळा करण्यात आल्या पाण्याच्या टाक्यांच्या परिसरातील कचरा गोळा करण्यात आला. गड किल्ले संवर्धन सेलच्या कार्यकर्त्यांसोबत राजगड तालुका अध्यक्ष कोकाटे व आरएमडी कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. सेल चे प्रदेश उपाध्यक्ष समीर धुमाळ, जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव राजगड तालुका अध्यक्ष वल्लभ कोकाटे, हवेली तालुका उपाध्यक्ष, अमित नागपुरे, मयुरेश पासलकर, राकेश तांबे यांनी संयोजन केले होते.



# खेड तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची उद्या सोडत




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत गुरुवारी (दि. २७ फेब्रुवारी) जिल्हाधिकारी कार्यालयात होणार असल्याची माहिती तहसीलदार ज्योती देवरे यांनी दिली. ग्रामविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांनी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार ५ मार्च २०२० च्या अधिसुचनेद्वारा ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी फेर आरक्षण निश्चित करणे आवश्यक असल्याने १ जानेवारी २०२४ ते ४ मार्च २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत निश्चित करण्यात आले.

पुणे जिल्हयातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग, महिला राखीव, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग यातील महिलांसह जिल्हास्तरावर तालुकानिहाय सरपंच पदाकरिता आरक्षण सोडत निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आरक्षण सोडती काढण्यात येणार आहेत, अशी माहिती निवासी नायब तहसीलदार मदन जोगदंड यांनी दिली.

खेड तालुक्यातील खराबवाडी, जऊळके खुर्द, कोहींडे बु., सोळू, वडगाव घेनंद, धामणे, गुळाणी, रौंधळवाडी, आसखेड बु., आंबेठाण, वाशेरे, सायगाव, कंडाचीवाडी, बोरदरा, पाईट, कोये, खालुंब्रे, टेकवडी या ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत होणार आहे. आरक्षण सोडतीला खेड तालुक्यातील सर्व आजी-माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतीच्या सदस्यासह, राजकीय पक्षाचे पदाधिकारी ग्रामस्थांनी उपस्थित रहावे, असे आवाहन प्रांत अनिल दौंडे यांनी केले आहे



## मुस्लिम मावळ्यांकडून शिवजयंती साजरी

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथील माहेर संस्थेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्ताने मुस्लिम मावळ्यांच्या वतीने अनाथ, गोरगरिब व वंचितांना अल्पोहारासह मिठाईचे वाटप करुन शिवजयंती साजरी करण्यात आली आहे. सणसवाडी ता. शिरुर येथील माहेर संस्थेमध्ये आयोजित शिवजयंती निमित्त आयोजित कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी माहेर संस्थेच्या संस्थापिका लुसि कुरियन होत्या. याप्रसंगी मुस्लिम मावळा शिवरायांचा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रिजवान बागवान, नजीरभाई तांबोळी, चाँदसहाब खुटामबुजे, करिमभाई शेख, जावेदभाई मनियार, मुनिरभाई आतार, अन्वरभाई शेख, सणसवाडीचे उपसरपंच राजेंद्र दरेकर, माजी सरपंच दत्ताभाऊ हरगुडे, शिवाजीराव दरेकर, कॉंग्रेसचे शिरूर तालुकाध्यक्ष वैभव यादव, रामदास धुमाळ, अमोल नवले, नवनाथ भोसले, पवन राऊत, तात्याराम मोरे, गोविंद मोरे, सोमनाथ नवले, रविंद्र पवार, श्याम शिंगे, राजेंद्र नवले, माहेर संस्थेचे व्यवस्थापक विजय तवर, प्रकाश कोठावळे, रमेश चौधरी, प्रशांत गायकवाड, वैभव शिंदे, शांताराम मोरे, मोतीराम भूमरे, श्याम शहा, सुनिल पाडळे, तुकाराम कातकडे, विकास दरेकर, विठ्ठल परदेशी, ज्ञानेश्वर जाधव यांसह आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक रिजवान बागवान यांनी केले तर नजीरभाई तांबोळी यांनी आभार मानले.

## कंपनीत राडा; ६ जणांना मारहाण

**महाळुंगे :** चाकण एमआयडीसी मधील खराबवाडी येथील एका कंपनीत शिरून सहा जणांना बेदम मारहाण करण्यात आली. तसेच एक मोटार लोखंडी रॉडने फोडण्यात आली. या प्रकरणी गौरव पटेल, विकास सोनकर, संदेश सोनकर, अजय पटेल, रोहित पटेल आणि हर्षद चौधरी आदींवर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची बाब समोर आली आहे. सदरची घटना मंगळवारी २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सातच्या सुमारास खराबवाडी हद्दीत घडली आहे. या प्रकरणी कंपनीच्या वतीने अंकुर दिवाकर कुलकर्णी (वय -४२ वर्षे), रा. मोशी यांनी महाळुंगे एमआयडीसी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. कंपनीतील ठेकेदारीशी संबंधित वादातून सदरची घटना घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

## शिरूर तालुक्यातील दोन रस्ते खुले

**शिरूर :** शिरूर तालुक्यातील तब्बल जवळपास ४० वर्षे बंद असलेले कवठे येमाई – पांडव करी गणेशनगर ते फाकटे आणि निमगाव म्हाळुंगी – कासारी हे दोन महत्त्वाचे रस्ते अखेर शिरूर तहसिल कार्यालयाच्या विशेष प्रयत्नांमुळे खुले झाले आहेत. या निर्णयामुळे शेकडो शेतकऱ्यांना शेतीकामासाठी आणि शेतमाल वाहतुकीसाठी मोठा दिलासा मिळणार आहे. कवठे येमाई येथील पांडव करी गणेशनगर ते फाकटे हा १.५ किमी लांबीचा पाणंद रस्ता जवळपास ४० वर्षांपासून अतिक्रमण आणि अडथळ्यांमुळे बंद होता. महसूल प्रशासनाने विशेष पुढाकार घेत अखेर हा रस्ता खुला केला आहे. तसेच, निमगाव म्हाळुंगी ते कासारी हा ५ किमी लांबीचा शिवरस्ता तब्बल २५ वर्षांपासून बंद होता. प्रशासनाने आतापर्यंत २ किमी अंतराचा रस्ता मोकळा केला असून उर्वरित ३ किमी लवकरच पूर्ण केला जाणार आहे. रस्ते खुले झाल्याने शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीसाठी सोय निर्माण झाली आहे. हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात महसूल प्रशासनाने मोठी भूमिका बजावली आहे. या उपक्रमात मंडल अधिकारी माधुरी बागले, मंडल अधिकारी तावरे मॅडम, ग्राम महसूल अधिकारी रामदास आरदवाड, मनिषा राऊत, मनिषा भालेराव, आबासाहेब रूके, संतोष पोटावळे यांसह ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील, तंटामुक्ती समिती आणि शेतकऱ्यांचा मोठा सहभाग होता. लवकरच या भागातील सर्व प्रमुख रस्ते खुले होतील, अशी आशा ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## जुन्या वादातून दांपत्याला मारहाण

**शिक्रापूर :** धामारी ता. शिरुर येथील शिवाजी डफळ हे शेतात काम करत असताना त्यांचा भाऊ रामदास त्यांच्या पत्नी व मुलासह शेतात आले त्यांनी शिवाजी यांना धक्काबुक्की करत मारहाण करु लागले. दरम्यान, शिवाजी यांची पत्नी कमल पतीला सोडवण्यासाठी गेल्या असता त्यांना देखील तिघांनी दगडाने मारहाण करत जखमी केले. याबाबत कमल शिवाजी डफळ (वय ४२, रा. डफळापूर धामारी ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी रामदास बाबुराव डफळ, दत्तात्रय रामदास डफळ व अनिता रामदास डफळ (सर्व रा. डफळापूर धामारी ता. शिरुर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.





# बालांगण



## विक्रमांसाठी काहीपण...

गंमत जंमत

मित्रमैत्रिणींनो, प्रत्येकाला नवेनवे विक्रम विक्रम करायची हौस असते. त्यासाठी त्यांची काहीही करायची तयारी असते. काही किस्से तर अजब असतात. कोणी लांब केस वाढवतात. कोणी लांब नखे वाढवतात. तर कोणी लोखंडाचे तुकडे गिळतात. म्हणून यांच्या असामान्य कामगिरीची नोंद गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड घेते. आजवर या बुकमध्ये हजारो विक्रमांची नोंद झाली आहे.



✽ चेन्नईमध्ये कप केकचा सर्वात उंच मनोरा तयार करण्यात आला. ४१ फूट आठ इंच उंचीचा हा मनोरा लक्षवेधी ठरला. १८,८१८ कप केक्सपासून हा मनोरा उभारण्यात आला होता. यातल्या प्रत्येक कप केकचं वजन ७० ग्रॅमच्या आसपास होतं. या मनोऱ्याचं एकूण वजन १.४ टन इतकं भरलं.

✽ इंग्लंडच्या ज्युली फेल्टॉन या जगातल्या सर्वात लांब पावलं असणाऱ्या महिला आहेत. त्यांच्या उजव्या पावलाची लांबी ३२.९ सेंटीमीटर तर डाव्या पावलाची लांबी ३२.७ सेंटीमीटर आहे. त्यांच्या पायात बसणारी पादत्राणं मिळत नसल्याने त्यांना पुरुषांची पादत्राणं घालावी लागतात.

✽ सिरियाच्या मेरी इलियासने अनोखा विक्रम केला आहे. त्यांनी कुत्र्यांची चित्र असणाऱ्या वस्तूंचा साठा केला आहे. त्यांच्याकडे अशा १४९६ वस्तू आहेत. यात कुत्र्यांचे पुतळे, किचेन, चादरी, उशीचे अभ्रे, मग आणि दागिने यांचा समावेश आहे. त्यांचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवण्यात आलं आहे.

✽ मुंबईतल्या एका शाळेच्या मैदानात ४०० तरुणांनी कपडे धुण्याचे धडे घेतले. एकाच वेळी एवढ्या तरुणांनी कपडे धुण्याचे धडे घेणं हा जागतिक विक्रम आहे. याची दखल गिनिज बुकने घेतली.



पुरुषांनीही घरातल्या कामांमध्ये हातभार लावावा, यासाठी एका कंपनीने मोहीम सुरू केली आहे. त्या अंतर्गत कपडे धुण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. महिलांबरोबर पुरूषांचा ही घरकामात हातभार असावा हा मूळ उद्देश होता.

## श्रीमंती थाटाचा लक्झम्बर्ग

सफर देशांची

लक्झम्बर्ग हा युरोप खंडातला छोटासा देश आहे. क्षेत्रफळ कमी असलं तरी त्या देशाला समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लाभला आहे. बेल्जियम, जर्मनी आणि फ्रान्स हे लक्झम्बर्गचे शेजारी. ९९९ चौरस मैल एवढाच त्याचा आकार आहे. पश्चिम युरोपातल्या या देशाचा आकार अमेरिकेतलं सर्वात छोटं राज्य 'ऱ्होडे आईसलँड'पेक्षाही कमी आहे. एवढासा देश असूनही वैशिष्ट्य म्हणजे देशातील नागरिक अतिशय मेहेनती आहेत. चारही बाजूंनी जमिनीने वेढलेल्या आणि बेटासारख्या असणारया या देशात घनदाट जंगलं, टेकड्या आणि कमी उंचीच्या पर्वतरांगा आहेत. देशाच्या उत्तर भागातील जमीन शेतीसाठी फारशी उपयोगी नाही, मात्र दक्षिणेकडचा भाग त्यादृष्टीने 'सुजलाम सुफलाम' आहे.

'हौटे श्युअर' हा या देशातला सर्वात मोठा तलाव आहे. येथील हवामान सर्वसाधारण असते. कोणत्याही ऋतुचा फारसा परिणाम नेहमीच्या वातावरणावर पडत नाही. लक्झम्बर्गच्या डोंगराळ भागात शाकाहारी तसेच काही हिंस्र प्राणी आढळतात. कंद प्रजातीच्या भाज्या मूख्यत्वेकरून येथे पिकवल्या जातात. जर्मन आणि फ्रेंच भाषा मुख्यत्वे बोलल्या जातात. या देशाची स्वत:ची अशी





कोणती भाषा नाही. एक आदर्श देश म्हणून या देशाकडून बऱ्याच गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. देशाचे दरडोई उत्पन्न उच्चतम ठेवण्यासाठी प्रत्येक नागरीक सदैव प्रयत्नशील असतो. शेजारी राष्ट्रांशी अतिशय सौदार्हपूर्ण संबंध ठेवण्याच्या दृष्टीने हे राष्ट्र नेहमी प्रयत्नशील असते.

## कसे असतात बॅक्टेरिया?

हेल्थ वेल्थ


या पृथ्वीवरचा सर्वात छोटा जीव असला तरी कधी अति संहारक तर कधी अतिशय उपयोगी बॅक्टेरिया हा सजीव, सगळीकडे असतो. चराचरात तो सगळ्या ठिकाणी आढळतो. आपल्या भोवताली देखील असंख्य बॅक्टेरिया असतात. इलेक्ट्रीक वस्तू, खण्यापिण्याचे जिन्नस अशा प्रत्येक ठिकाणी हे सजीव अगदी आरामात रहातात. म्हणूनच स्वच्छतेला प्राधान्य देण्याची अत्यंत आवश्यकता असते. जेवताना हात धुण्याचा सल्ला दिला जातो. काही बॅक्टेरिया आपल्या आरोग्यासाठी चांगले असतात तर काहींमुळे विविध आजार होतात.



बॅक्टेरिया हे एकपेशीय सजीव आहेत. या पेशीमध्ये कॉम्प्युटरमधल्या प्रोग्रामप्रमाणे काम करणारे डीएनए असतात. बॅक्टेरियांना जगवण्यासाठीची सगळी माहिती या डीएनएमध्ये समाविष्ट असते. या पेशीभोवती कठीण भिंत असते. यामुळे बॅक्टेरियांचं रक्षण होतं. काही बॅक्टेरियांना बाहेरच्या बाजूला कवच असतं. त्याला 'पिली' असं म्हणतात. हालचालीसाठी त्यांच्या शरीरात लांब धाग्यासारखे अवयव असतात. त्यांना शास्त्रीय भाषेत 'फ्लॅगेल्ला' असं म्हणतात.

हे सजीव समुहाने रहातात. त्यांची संख्या झटपट वाढते. सध्या पृथ्वीवर दहा हजार प्रजातींचे बॅक्टेरिया आहेत. बॅक्टेरियांची तीन विभागांमध्ये विभागणी केली जाते. 'कोक्की बॅक्टेरिया' गोलाकार असतात. 'बॅसिली' बॅक्टेरियांचा आकार सरळ असतो. 'स्पायरल बॅक्टेरिया' कॉर्कस्क्रू पास्तासारखे दिसतात.

ठिपके जुळवा



दोस्त हे मस्त

### जग हत्तींचे



हत्ती हा भूतलावरचा सर्वात महाकाय प्राणी आहे. शिवाय तो शुध्द शाकाहारी आहे. दिसायला अतिशय शांत पण राग अनावर झाल्यास अतिशय संहारक असा प्राणी म्हणून प्रसिद्ध आहे. पाण्यामध्ये डुंबणे हा त्याचा आवडता छंद आहे. सहसा कळपाने राहणे पसंद करतो. सिंहाची ओळख जंगलाचा राजा म्हणून असली तरी खरी ऐट ही हत्तीचीच असते.

खादाडी

### थंड घ्या पण तब्येतीला.

नुकतीच हिवाळा ऋतु संपून उन्हाळ्याची चाहुल लागली आहे. आत्तापासूनच रसवंती गृहांकडे नागरिकांची पाउले वळू लागली आहेत. तसा पिताना थंडगार वाटणारा उसाचा रस उष्ण असल्याने त्याला पर्याय म्हणूनच नीरेला जास्त मागणी असते. निरा हे बहूगुणी पेय आहे. पित्तशामक शिवाय प्रकृतीला पाचक म्हणून निरेला ग्राहकांची प्रथम पसंती दिसून येते.

उच्चभ्रु ग्राहकांची नेहमीप्रमाणे शितपेयांना मागणी आहेच. अशी शितपेये पिताना तार्त्पुता थंडावा मिळत असला तरी काहीवेळाने घशाला कोरड पडते. कोंकणातील प्रसिध्द सोलकढी हे देखील जेवणानंतर शरीराला पाचक आणि पोषक म्हणून उत्तम पेय आहे.

स्टडी टिप्स

### अभ्यासाची विभागणी करा



मुलांनो, तुम्हाला आता शाळेचे वेध लागले असतील. बऱ्याच मुलांच्या शाळा सुरूही झाल्या असतील. त्यामुळे सुट्टी मागे सोडून अभ्यासाला लागायला हवं. भरपूर अभ्यास असेल तर काळजी करू नका. अभ्यासाची विभागणी करा. परीक्षेला तीन धडे असतील तर एका वेळी एक धडा समजून घ्या. त्यावरची उत्तरं तयार करा. मगच पुढे जा. यामुळे तुमच्यावर ताण येणार नाही.

योगा टाईम



### लाभदायी ताडासन

योगासनांचे अनेक फायदे आहेत, तसेच योगासने ही अनेक प्रकारची आहेत. शरीर निरोगी आणि सशक्त राहण्यासाठी नियमित योगासनांचा सराव असणे आवश्यक आहे. ताडासन हे त्यापैकीच एक आसन म्हणावे लागेल. शरीराला जास्त ताण न घेता सहज करता येईल.

## जपा नखांचे आरोग्य

जाणून घ्या

हातापायांच्या नखांची स्वच्छता किती महत्त्वाची आहे हे तुम्ही जाणताच. नखांमध्ये घाण अडकलेली असेल तर अन्नाद्वारे ती पोटात जाते आणि विविध आजार उद्भवतात. म्हणूनच आई-बाबा किंवा शिक्षक आपल्याला वारंवार नखं स्वच्छ ठेवण्याचा, वेळोवेळी कापण्याचा सल्ला देत असतात. चला आपण आज नखं स्वच्छ आणि निरोगी ठेवण्याचे काही सोपे उपाय बघू या.



आहारात पौष्टिक घटक असतील तर शरीरातील अन्य अवयवांप्रमाणे नखंही निरोगी राहतात. आहारातील लोहाची पर्याप्त मात्रा नखांच्या आरोग्यासाठी आवश्यक असते. म्हणूनच लोहयुक्त आहार घ्यावा. यासाठी तुम्ही आहारात बीन्स, सोया, मासे, लाल मांस, अंड, सालासह धान्य, बेदाणे, खजूर आदींचा वापर वाढवू शकता. बीटामध्येही नखांना उपकारक ठरेल अशी कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी ची पर्याप्त मात्रा असते. म्हणूनच दिवसातून एकदा बीटाचं सेवन करावं.

नखं स्वच्छ, बळकट आणि आरोग्यसंपन्न रहावी यासाठी त्यांची निगा राखायला हवी. यासाठी काही उपाय करता येतील. एका बाऊलमध्ये कोमट पाणी घ्या. त्यात लिंबाचा रस मिसळा. एका कॉटन बॉलनं हे पाणी नखांवर पसरवून हलक्या हातानं मॉलिश करा. आठवड्यातून एकदा हा उपाय केला तरी, नखांवर डाग राहणार नाहीत त्याचप्रमाणे नखांमध्ये घाण राहणार नाही. नखं बळकट करण्यासाठी गरम पाण्यामध्ये ऑलिव्ह ऑईलचे काही थेंब टाकून काही काळ त्यात बोटं बुडवून बसणं हा देखील एक चांगला उपाय आहे. विशेषत: वारंवार नखं तुटण्याचा अथवा दुभंगण्याचा त्रास असेल त्यांनी हा उपाय अवश्य करावा. नखं गोलाकार आकारात कापावी. नखांना वेगवेगळे शेप देण्याच्या भानगडीत पडू नये.




## करिअरच्या विविध संधी

कोण होणार?

दहावीनंतर करिअर कोणते निवडावे हा मुलांसमोर गहन प्रश्न असतो. बहुतांश मुलांचा एम.बी.ए., अकाउंट्स, फायनान्स अशा क्षेत्रांकडे कल असतो. सीए म्हणजे चार्टर्ड अकाउंटन्सी हा आभ्यासक्रम अतिशय अवघड मानला जातो. तसाच सीएमए म्हणजे कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटन्सी हा देखील महत्वाचा आभ्यासक्रम मानला जातो. पुढील संधींच्या दृष्टिने ही क्षेत्र महत्वाची मानली जातात. शास्त्र शाखेशिवाय ईतरही आभ्यासक्रमात करिअरच्या दृष्टिने विविध संधी आहेत, हे बऱ्याच जणांना माहीत नसते, यामुळे विद्यार्थ्यांना गोंधळ उडू शकतो. अशावेळी पालकांनी त्यानां मार्गदर्शन करणे आवश्यक असते.

सीए परीक्षांचं आयोजन 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडिया' ही संस्था करते तर 'इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंट्स ऑफ इंडिया' ही संस्था सीएमए अभ्यासक्रमाचे नियम ठरवते. सीएला अकाउंटिंग, ऑडिटिंग आणि टॅक्सेशन या विषयांची सगळी माहिती असते. इंटरनल ऑडिट, स्टॅच्युटरी ऑडिट, डायरेक्ट आणि इनडायरेक्ट टॅक्सेशन, गुंतवणुकीबाबतचे निर्णय घेण्यात सीए महत्त्वाची भूमिका बजावतात. सीएमएला कॉस्ट आणि आर्थिक व्यवस्थापनाच्या माध्यमातून कंपनीचा खर्च आणि उपलब्ध साधनांमध्ये संतुलन साधायचं असतं. कंपनीशी संबंधित प्रकल्पातले फायदे आणि तोटे जाणून घेण्याचं काम सीएमए करतात. भावी करिअर निवडीसाठी गुरूजनही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.



## धाडसाला आवर घाला

जीवाला जपा

छोट्यांनो, आधुनिक जमाना हा विविध प्रकारच्या शोधांबरोबरच विविध स्टाईल्सचा आहे. कपड्यांपासून ते किंमती वाहनांपर्यंत रोज नवनवीन शोध लागतात तसेच कुठल्या ना कुठल्या स्टाईल्स दिसून येतात. आपला विषय हा सध्याच्या सेल्फी फोटो आणि रील्स या आधुनिक स्टाईलबद्दल आहे. कुठल्याही समारंभात अथवा सहलीच्या ठिकाणी जा, तरूणवर्गच नाही अबालवृध्दांना सेल्फीचे आकर्षण दिसून येते. मित्रमैत्रिणींचा घोळका असेल किंवा एखादे कुटुंब असेल, एका छोटयाशा फोटोमध्ये निसर्गाबरोबरच सर्व उपस्थितांचा सेल्फी घ्यायचा मोह कोणालाच आवरत नाही.



अशीच व्हिडिओ रील बनवायची नवी स्टाईल तरुण वर्गामध्ये निर्माण होऊ लागली आहे. पण कैक वेळेस या स्टाईल आणि त्यांचा मोह तरुणवर्गासाठी जीवघेणा ठरत आहे. सहलीच्या ठिकाणी खोल दरीच्या कडांवर असे सेल्फी घेत असताना कैक युवक-युवतींचे बळी गेले आहेत. तरुण मुले काही क्षणाचे धाडस दाखवण्यासाठी जीवाची पर्वा न करता भरधाव मोटारसायकलींवरून स्टंट्स करताना दिसतात. परमेश्वराने दिलेले बहुमोल आयुष्य अशी क्षणिक चेष्टा करून मातीमोल करण्याला धाडस नाही तर शुद्ध वेडेपणा म्हणतात.

## कसे असतात सी टर्टल?

मुके सोबती

मुलांनो, तुम्हाला कासव बघायला आवडतं ना! काही कासवं जमिनीवर राहतात तर काही पाण्यात राहतात. काही जमीन आणि पाणी अशा दोन्ही ठिकाणी राहतात. पाण्यातल्या कासवांची एक जात म्हणजे 'ग्रीन सी टर्टल'. चला, आज त्यांच्या जगात भ्रमंती करुन येऊ.

✽ या कासवांच्या पिलांची लांबी फक्त पाच सेंटीमीटर असते. पण त्यांची लांबी पाच फुटांपर्यंत वाढू शकते. तसंच त्यांचं वजनही ३०० किलोपर्यंत वाढतं. यामुळेच समुद्री कासवांमधलं 'ग्रीन सी टर्टल' हे आकारानं सर्वात मोठं कासव आहे. या कासवाच्या पाठीवरचं कवच करड्या रंगाचं असतं. त्वचेच्या हिरवट रंगामुळे या कासवांना ग्रीन सी टर्टल असं म्हटलं जातं.



धोक्याची सूचना मिळाल्यावर अन्य कासवं तोंड आत घेतात. पण ग्रीन सी टर्टल्स मात्र अशाप्रकारे आपलं तोंड आत घेत नाहीत.

✽ ही कासवं बराच काळपर्यंत श्वास रोखून धरू शकतात. ही कासवं शीतरक्ती म्हणजेच थंड रक्ताची असतात. पाण्याच्या तापमानामुळे त्यांना आपला श्वास रोखून धरता येतो. पाणी थंड असेल तेवढा ते श्वास रोखून धरू शकतात. ही कासवं पाण्यामध्ये अत्यंत जलद गतीनं पोहू शकतात. मात्र जमिनीवर त्यांची गती कमी होते. त्यामुळेच ही कासवं सहसा जमिनीवर येत नाहीत. ही कासवं जमिनीवर फक्त अंडी घालण्यासाठी येतात. दर दोन ते चार वर्षांनी कासवांची मादी अंडी घालते. एकावेळी साधारणपणे १०० ते २०० अंडी घातली जातात. ✽ ग्रीन सी टर्टलच्या दोन जाती असतात. एक म्हणजे 'अटलांटिक ग्रीन टर्टल' आणि 'इस्टर्न पॅसिफिक ग्रीन टर्टल'. खेकडे, जेलीफिश हे या कासवांचं अन्न असतं.

✽ ग्रीन सी टर्टलचा समावेश नामशेष होणाऱ्या प्रजातींमध्ये करण्यात आला आहे. शिकारीमुळे त्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे त्यांच्या संरक्षणासाठी प्रयत्न करणं गरजेचं आहे.

जिज्ञासा

### ओळखा पाहू

१) जागतिक पर्यावरण दिन कधी असतो?
२) भारताच्या नव्या अर्थमंत्री कोण?
३) आंतरराष्ट्रीय योग दिवस कधी असतो?
४) लढायांचं शहर कोणाला म्हटलं जातं?
५) व्हॅली ऑफ द किंग्ज कुठे आहे?
६) एकदिवसीय क्रिकेटचा विश्वचषक सर्वाधिक वेळा जिंकणारा देश कोणता?
७) जगातला सर्वात मोठा मानवनिर्मित कालवा कोणता?
८) युरोपियन युनियनच्या सदस्य देशांमध्ये कोणतं चलन वापरलं जातं?
९) जगातला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा खंड कोणता?
१०) सर्वात जुनं राष्ट्रगीत कोणत्या देशाचं आहे?

उत्तर : १) ५ जून २) निर्मला सीतारामन ३) २१ जून ४) पानिपत ५) इजिप्त ६) ऑस्ट्रेलिया ७) सुएझ कालवा ८) युरो ९) आफ्रिका १०) जपान

## पाकिस्तान-बांगलादेश सामना रद्द

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेत गुरुवारी ९ वा सामना पाकिस्तान विरुद्ध बांगलादेश संघात रावळपिंडी येथे होणार होता. हा दोन्ही संघांचा या स्पर्धेतील अखेरचा सामना होता. त्यामुळे त्यांना विजय मिळवून प्रतिष्ठा राखण्याचे आव्हान होते. मात्र हा सामना पावसामुळे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे दोन्ही संघांना एक-एक गुण देण्यात आला आहे. परंतु, त्यांच्यासमोरील विजयाचं खातं रिकामंच राहिलं आहे. बांगलादेश आणि पाकिस्तान या दोन्ही संघ अ गटात होते. मात्र त्यांना पहिल्या दोन्ही सामन्यात भारत आणि न्यूझीलंड संघांनी पराभूत केलं होतं. त्यानंतर आता त्यांचा एकमेकांविरूद्धचा सामनाही पावसामुळे रद्द झाल्याने त्यांची मोहिम त्यांना विजयाशिवायच संपवावी लागली आहे. अ गटातून भारत आणि न्यूझीलंड या संघांनी सेमीफायनल गाठली आहे. गुरुवारी होणाऱ्या सामन्यात नाणेफेकही झाली नाही. पाऊस थांबण्याची बराचवेळ वाट पाहाण्यात आली.

# अफगाणिस्तानचा थरारक विजय

## रुट लढला, शतक केलं; इंग्लंड सेमीफायनलच्या शर्यतीतून बाहेर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लाहोर :** अफगाणिस्तानने यंदाच्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत एका धक्कादायक विजयाची नोंद केली आहे. अफगाणिस्तानने इंग्लंडचा ८ विकेट्सने पराभव केल्यामुळे ब गटातील सेमीफायनलचं गणित क्लिष्ट झाले आहे. पण या पराभवामुळे इंग्लंडचे चॅम्पियन्स ट्रॉफीतील आव्हान मात्र संपुष्टात आले असून अफगाणिस्तानचा संघ अजूनही उपांत्य फेरी गाठण्याच्या शर्यतीत कायम आहे. अफगाणिस्तानकडून अझमतुल्ला उमरझाईने ५ विकेट्स तर इब्राहिम झादरानने १७७ धावांची खेळी केली. अफगाणिस्तानच्या आजच्या विजयाचे हे दोन खेळाडू हिरो ठरले.

इब्राहिम झद्रानचे (१७७) शानदार शतक आणि अझमतुल्ला ओमरझाई (४१ धावा आणि ५ विकेट) याच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर अफगाणिस्तानने शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या या सामन्यात इंग्लिश संघाचा अवघ्या ८ धावांच्या फरकाने पराभव केला.

अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि अफगाणिस्तानने पहिल्यांदाच एखाद्या आयसीसी स्पर्धेत ३०० धावांचा पल्ला गाठला. अफगाणिस्तानने इंग्लंडविरुद्ध तब्बल ३२५ धावांचा डोंगर रचला. इब्राहिम झादरानची १७७ धावांच्या वादळी खेळीने संघाच्या या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. अखेरच्या दोन षटकांमध्ये म्हणजेच १२ चेंडूंत इंग्लंडला १६ धावांची गरज होती. फजलहकने त्या षटकात आर्चरला बाद करत ३ धावा दिल्या. तर अखेरच्या षटकात उमरझाईने प्रत्येक चेंडूवर एकेक धाव देत पाचव्या चेंडूवर आदिल रशीदला बाद करत इंग्लिश संघाला सर्वबाद केले आणि संघाला दणदणीत विजय मिळवून दिला. लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात दोन्ही संघांची सुरुवात खराब झाली. पण अफगाणिस्तानने जोरदार पुनरागमन करत ३२५ धावा केल्या. झादरानने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये अफगाणिस्तानसाठी पहिलं शतक झळकावलं आणि त्यानंतर या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मोठी खेळी खेळताना १७७ धावा केल्या. अफगाणिस्तानने ९व्या षटकातच ३ विकेट गमावल्या.

स्टार वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने हे तिन्ही गडी बाद करत अफगाणिस्तानला अडचणीत आणले. पण इथून इंग्लंडच्या गोलंदाजीची अवस्था बिकट झाली आणि अफगाणिस्तानने पुनरागमन केले.

अफगाणिस्तानने ३७ धावांत ३ गडी गमावल्यानंतर इब्राहिम झादरानने कर्णधार हशमतुल्ला शाहिदीबरोबर शतकी भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. शाहिदीने ४० धावा केल्या. तर यानंतर अझमतुल्ला ओमरझाईने ४१ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. यानंतर मोहम्मद नबीने तर इंग्लिश संघाची धुलाई करत २४ चेंडूत ३ षटकार आणि २ चौकारांसह ४० धावा केल्या.




## मुंबईचा तिसरा विजय, पॉइंट्स टेबलमध्येही 'टॉप'



**बंगलूरु :** वूमन्स प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत बुधवारी मुंबई इंडियन्सने युपी वॉरियर्स संघाला ८ विकेट्सने पराभूत केले. हा मुंबई इंडियन्सचा ४ सामन्यांतील हा तिसरा विजय आहे. त्यामुळे मुंबई इंडियन्सने आता गुणतालिकेतही ६ गुणांसह अव्वल क्रमांक मिळवला आहे. मुंबईच्या विजयात नतालिया सायव्हर-ब्रंट विजयाची शिल्पकार ठरली, तिला हेली मॅथ्यूजकडून चांगली साथ मिळाली. या सामन्यात युपी वॉरियर्सने मुंबई इंडियन्ससमोर १४३ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. या लक्ष्याचा पाठलाग मुंबईने १७ षटकातच २ विकेट्स गमावत पूर्ण केला. मुंबईकडून हेली मॅथ्युज आणि यास्तिका भाटीया यांनी डावाची सुरुवात केली होती. पण यास्तिका चौथ्याच षटकात शून्यावरच बाद झाली. पण सुरुवातीच्या संघर्षानंतर मात्र मुंबईला लक्ष्याचा पाठलाग करणे कठीण गेलं नाही. एक बाजू मॅथ्युजने सांभाळलेली असताना दुसऱ्या बाजूने नतालियाने आक्रमक खेळ करत चौकारांचा पाऊस पाडला.

## फलंदाज रविंद्र जाधवचा विश्वविक्रम;
## एकाच डावात २८ षटकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** क्रिकेट विश्वात एक नवीन विक्रम घडला आहे. एका डावात तब्बल २८ षटकार मारण्याचा विक्रम पुण्याचा खेळाडू रविंद्र जाधव याने केला आहे. धानोरीतील किंग्ज स्पोर्टस क्लब मैदानावर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निमंत्रित साखळी क्रिकेट स्पर्धेत सर्वाधिक षटकारांचा विक्रम रविंद्रने मोडला.निमंत्रित साखळी क्रिकेट स्पर्धेत दोन दिवसीय (ता.२४-२५) नॉर्थ झोन विरूद्ध युनायटेड क्लब च्या सामन्यात फलंदाजी करीत रविंद्रने एका डावात २८ षटकार आणि १७ चौकार लगावत २७८ धावांची खेळी खेळली. रविंद्रच्या खेळीमुळे यूनायटेड ची स्थिती भक्कम झाली. याच खेळीच्या आधारे यूनायटेडने एक डाव आणि १३८ धावांनी सामना जिंकला.



काही वर्षांपूर्वी पुण्याचा फलंदाज प्रीतम पाटील यांने एकाच डावात २६ षटकार लगावत विक्रम रचला होता. प्रीतमचा हा विक्रम रविंद्रने मोडीस काढला.रविंद्रच्या विक्रमी खेळीसाठी इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.अशा खेळाडूंची दखल क्रिकेट विश्वात सर्वच स्तरातून घेणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.आयपीएल मध्ये रविंद्रला संधी मिळावी, असे देखील पाटील म्हणाले. आयपीएल दर्जाचा खेळ खेळणाऱ्या अनेक खेळाडूंना आजही संधी मिळत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. अशात भारतीय क्रिकेट संघाचे प्रशिक्षक, निवडक यांनी अशा 'टॅलेन्ट'ला हेरून त्यांना आणखी मोठे व्यासपीठ उपलब्ध करवून देत त्यांच्या खेळाला न्याय मिळवून देण्याची मागणी पाटील यांनी यानिमित्ताने केली आहे.

## टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत दक्ष पाटील, धनुष बेल्लापुरा, ध्रुवी, प्रार्थना यांची आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** फर्ग्युसन कॉलेज यांच्या वतीने व शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने आयोजित एमएसएलटीए फर्ग्युसन कॉलेज पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज 16 वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत एकेरीत दक्ष पाटील, धनुष बेल्लापुरा, ध्रुवी आद्यंथया, प्रार्थना खेडकर यांनी मानांकित खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

फर्ग्युसन कॉलेज टेनिस अकादमी येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉमध्ये उपांत्यपूर्व फेरीत मुलांच्या गटात आठव्या मानांकित महाराष्ट्राच्या दक्ष पाटीलने आपला राज्य सहकारी दुसऱ्या मानांकित आराध्य म्हसदेचा 6-3, 6-2 असा सरळ सेटमध्ये पराभव केला. कर्नाटकाच्या बिगरमानांकीत धनुष बेल्लापुराने गुजरातच्या चौथ्या मानांकित मलय मिंजरोलाचा 6-1, 6-0 असा सहज पराभव करून अनपेक्षित निकालाची नोंद केली. सहाव्या मानांकित महाराष्ट्राच्या वरद उंद्रेने प्रद्युम्न ताताचरवर टायब्रेकमध्ये 6-7(5), 6-3, 6-2 असा संघर्षपूर्ण पराभव करून आगेकूच केली. अव्वल मानांकित मनन अग्रवाल याने आर्यन किर्तनेचा 6-7(4), 6-2, 6-2 असा कडवा प्रतिकार केला.

मुलींच्या गटात महाराष्ट्राच्या ध्रुवी आद्यंथया हिने तिसऱ्या मानांकित रिशीता पाटीलचा 6-2, 6-4 असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. पाचव्या मानांकित प्रार्थना खेडकर हिने चौथ्या मानांकित व्रण्डिका राजपूतचे आव्हान 6-3, 7-6(3) मोडीत काढले. अव्वल मानांकित स्वानिका रॉयने श्रावी देवरेला 6-4, 7-6(8) असे पराभूत केले. तामिळनाडूच्या सातव्या मानांकित मित्राविंदा सतीश हिने महाराष्ट्राच्या रित्सा कोंडकरचा 7-6(2), 1-6, 6-4 असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली.

दुहेरीत मुलांच्या गटात आर्यन कीर्तने याने प्रद्युम्न ताताचरच्या साथीत चौथ्या मानांकित धनुष बिल्लापुरा व राजवर्धन उंद्रेचा 7-5, 6-7(4), 10-8 असा पराभव केला. मुलींच्या गटात तामिळनाडूच्या के नल्याझिनी व ई सरित्रा या जोडीने कर्नाटकाच्या तिसऱ्या मानांकित धनवी बोपण्णा व रीत झवर यांचा 2-6, 6-1, 10-7 असा पराभव केला.

## विशाल बनसोडे, राणी मुचांडी, धुळदेव, रविना यांना विजेतपद



**पुणे :** पुण्यातील लोकप्रिय युवा सामाजिक कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक सनी विनायक निम्हण यांच्या वाढदिवसानिमित्त सोमेश्वर फाउंडेशनच्या वतीने "सुपर सनी विक" या क्रीडा महोत्स वा अंतर्गत आयोजित पुणे ट्वीन सिटी मॅरेथॉन रन फॉर अमृतकाल स्पर्धेत विशाल बनसोडे, राणी मुचांडी, धुळदेव घागरे, रविना गायकवाड यांनी आपापल्या गटात अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले. स्पर्धेत एकूण 25,783 धावपटूंनी आपला सहभाग नोंदवला होता. पुणे व पिंपरी चिंचवड शहरास जोडणारी, व्यसनमुक्तीचा संदेश देणारी पुणे ट्वीन सिटी मॅरेथॉन, रन फॉर अमृतकाल स्पर्धेचे आयोजन पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक संघटनेच्या मान्यतेने व सहकार्याने करण्यात आले होते. स्पर्धेत 21किलोमीटर मुलांच्या गटात विशाल बनसोडेने 01:05:24सेकंद वेळ नोंदवत विजेतेपद पटकावले. तर, रामेश्वर मुंजाल (01:08:29से) याने दुसरा आणि बबलू चव्हाण(01:11:12से) याने तिसरा क्रमांक पटकावला. मुलींच्या गटात राणी मुचांडी हीने 01:22:03 सेकंद वेळ नोंदवत पहिला क्रमांक पटकावला. तर, शितल तांबे(01:26:23से) हीने दुसरा आणि संगीता पी (01:33:57से) हीने तिसरा क्रमांक पटकावला. 10 किलोमीटर मुलांच्या गटात धुळदेव घागरेने 29 मिनिटे 21सेकंद वेळ नोंदवत प्रथम क्रमांक पटकावला. तर, अतुल बर्डे (29:24से) व दाजी हुबले (30:43से) यांनी अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान पटकावले. मुलींच्या गटात रविना गायकवाडने 35 मिनिटे 58सेकंद वेळ नोंदवत विजेतेपद पटकावले. ही मॅरेथॉन स्पर्धा 21 किमी, 10 किमी, 5 किमी आणि 3 किमी प्रकारात पार पडली. म्हाळुंगे - बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलमध्ये पहाटे 5 वाजता सुरू झाली. स्पर्धेतील विजेत्यांना करंडक व 5,55,555 रुपयांची पारितोषिक देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण आमदार सिद्धार्थ शिरोळे, सोमेश्वर फाउंडेशनच्या संचालिका स्वाती निम्हण, माजी नगरसेवक सनी निम्हण, मधुरा निम्हण, पीसीएमसीचे नगरसेवक अमित गावंडे, एव्हरेस्टर किशोर धनकुडे, एअर व्हाइस मार्शल नितीन वैद्य(निवृत्त), महाबळेश्वर देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

## टेनिस स्पर्धेत सेजल जाधव, आदिरा भगत, अंशुल पुजारी, वीर जोशीलकर यांना विजेतपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए मानांकन फर्ग्युसन कॉलेज टेनिस अकादमी टेनिस ब्रॉन्झ सिरिज टेनिस 2025 स्पर्धेत सेजल जाधव, आदिरा भगत, अंशुल पुजारी, वीर जोशीलकर यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले.

फर्ग्युसन कॉलेज टेनिस अकादमी, येथील टेनिस कोर्टवर पार पडलेल्या या स्पर्धेत १२ वर्षाखालील मुलींच्या गटात अंतिम फेरीत अव्वल मानांकित सेजल जाधवने तिसऱ्या मानांकित आदिरा भगतचा ४-२, ५-३ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. याच मुलांच्या गटात अंशुल पुजारी याने अभिमन्यू चव्हाणचा ४-२, ४-० असा पराभव करून विजेतेपद मिळवले. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात तिसऱ्या मानांकित वीर जोशीलकरने अव्वल मानांकित तनिश पाटीलचा ५-३, ४-१ असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. मुलींच्या गटात आदिरा भगत हिने आराध्या मेंडकेपाटीलचा ४-२, ५-३ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. सेजल आणि आदिरा सरदार वॉरियर्स टेनिस अकादमी येथे प्रशिक्षक सरदार सिंग ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात.

स्पर्धेतील विजेत्यांना करंडक, प्रशस्तिपत्रक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण माजी माजी डेव्हीसपटू व भारतीय टेनिस संघाचे माजी प्रशिक्षक नंदन बाळ, संग्राम चाफेकर यांच्या हस्ते करण्यात आले

## पाकिस्तानात सुरक्षेचे तीन-तेरा; पोलिसांचे निलंबन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लाहोर :** तब्बल २९ वर्षांनंतर पाकिस्तानमध्ये होत असलेली आयसीसीची ही चॅम्पियन्स करंडक स्पर्धा पाकिस्तानसाठी प्रतिष्ठेची आहे. सुरक्षिततेची चोख हमी त्यांना यातून दाखवून द्यायची आहे; परंतु न्यूझीलंड-बांगलादेश सामन्यादरम्यान एक प्रेक्षक मैदानात घुसल्यामुळे १०० हून अधिक पोलिसांना तत्काळ निलंबित करण्यात आले आहे.

पंजाब पोलिसांच्या एका प्रवक्त्याने पीटीआय वृत्तसंस्थेशी बोलताना या वृत्तला दुजोरा दिला. पाकिस्तानमध्ये खेळणे सुरक्षित आहे, हे या स्पर्धेच्या निमित्ताने पाकिस्तान सरकार आणि त्यांच्या क्रिकेट मंडळाला सिद्ध करायचे आहे; परंतु एका प्रेक्षकाच्या घुसखोरीने सुरक्षा व्यवस्थेतील ढिलाई असल्याचे सिद्ध झाले. खेळाडूंच्या सुरक्षिततेचे कारण देत भारतीय संघाने पाकमध्ये जाण्यास नकार दिलेला आहे.

खेळाडू राहत असलेल्या हॉटेलपासून ते स्टेडियमपर्यंत कडक सुरक्षा तैनात करण्यात आलेली आहे; परंतु सामना सुरू असताना मैदानात घुसलेल्या प्रेक्षकाला रोखण्यासाठी सीमारेषेबाहेर तैनात असलेल्या पोलिसांनी दुर्लक्ष केल्यामुळे हा प्रकार घडला, असे पंजाब पोलिसांच्या प्रवक्त्याने या वेळी सांगितले.

## युवा पर्व चषक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अजिंक्य क्रिकेट क्लबचा विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** पवार फाउंडेशन आणि युवा पर्व फाउंडेशन आयोजित युवा पर्व चषक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत विरेन आटोळे(२०३धावा) व युवराज रामरूपे (१६५धावा) यांनी केलेल्या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर अजिंक्य क्रिकेट क्लब संघाने जेके क्रिकेट क्लब संघाचा ४१० धावांनी पराभव करून दणदणीत विजय मिळवला.

राजगड स्पोर्टस अकादमी, आव्हाळवाडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना अजिंक्य क्रिकेट क्लब संघाने ४३षटकात ७बाद ५४९धावा केल्या.

यात विरेन आटोळेने १२४चेंडूत २८चौकाराच्या मदतीने २०३ धावांची द्विशतकी खेळी केली. त्याला युवराज रामरूपेने ७४चेंडूत २७चौकारासह १६५धावा काढून साथ दिली. या जोडीने पाचव्या विकेटसाठी १५१चेंडूत ३३५धावांची भागीदारी करून संघाला भक्कम धावसंख्या उभारून दिली.

याच्या उत्तरात जेके क्रिकेट क्लब संघ २४.५षटकात सर्वबाद १३९धावाच करू शकला. यात पी रूद्र(८४धावा) याने थोडासा प्रतिकार केला. विजयी संघाकडून प्रिन्स दाभड(२-१९), प्रशांत निंबाळकर(२-२४) यांनी सुरेख गोलंदाजी करत संघाला ४१०धावांनी विजय मिळवून दिला.

## सिग्मय फुटबॉल क्लब, फाल्कन्स् फुटबॉल ॲकॅडमी,
## स्टेपओव्हर फुटबॉल ॲकॅडमी संघांची आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** हॉटफुट स्पोर्टस यांच्या तर्फे आयोजित आठव्या 'अपोलो हॉटफुट करंडक' युवा साखळी फुटबॉल स्पर्धेच्या १३ वर्षाखालील गटामध्ये सिग्मय फुटबॉल क्लब, फाल्कन्स् फुटबॉल ॲकॅडमी आणि स्टेपओव्हर फुटबॉल ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

बावधन येथील हॉटफुट ॲकॅडमीच्या मैदानावर झालेल्या सामन्यामध्ये १३ वर्षाखालील गटात मॅथ्युज् फुटबॉल ॲकॅडमी आणि बीएफसी एलिट ब्ल्युज् यांच्यातील सामना २-२ असा बरोबरीत सुटला. मॅथ्युज् फुटबॉल ॲकॅडमीकडून हर्ष काकडे आणि शोर्य चव्हाण यांनी तर, बीएफसी एलिट ब्ल्युज् संघाकडून तनुश शहा आणि गौतम भट यांनी गोल नोंदविले. तनवीश पवार आणि उझैर खान यांनी केलेल्या गोलांच्या जोरावर स्टेपओव्हर फुटबॉल ॲकॅडमीने सिटी एफसी पुणेचा ३-० असा सहज पराभव केला. आरव चव्हाण आणि आरूष काळे यांनी नोंदविलेल्या गोलांमुळे सिग्मय एफसीने एसयुएफसी संघाचा २-१ असा पराभव केला. आद्य जोशी आणि नीरवन देशपांडे यांच्या गोलपूर्ण कामगिरीमुळे फाल्कन्स् फुटबॉल ॲकॅडमीने स्पोर्टीक्यु एफए संघाचा २-० असा पराभव केला.

१५ वर्षाखालील गटामध्ये स्पोर्टस मेनिया संघाने चेतक इलेव्हनचा ४-० असा सहज पराभव केला. विजयी संघाकडून तेजस सबनीस, परम हुलहरणी आणि सौरभ पवार यांनी गोल नोंदविले. मानव कोहली याने केलेल्या दोन गोलांच्या जोरावर सिग्मय एफसी संघाने मेट्रोसिटी फुटबॉल ॲकॅडमीचा २-१ असा पराभव केला. आरूष बर्वे आणि आरव कुलकर्णी यांनी नोंदविलेल्या गोलांच्या जोरावर फाल्कन्स् फुटबॉल ॲकॅडमीने कॉन्शन्ट्स स्पोर्टस पुणे संघाचा २-१ असा पराभव केला.

#रा